कृषीवल
रायगड, मंगळवार, दि. २९ ऑक्टोबर २०२४
किंमत ४ ₹

## प्रीतम म्हात्रे आज अर्ज दाखल करणार

**रायगड :** उरण विधानसभेसाठी शेकापचे उमेदवार प्रीतम म्हात्रे हे मंगळवारी आपला उमेदवारी अर्ज दाखल करणार आहेत. गेल्या पाच वर्षामध्ये उरण मतदार संघामध्ये भाजपा पुरस्कृत उमेदवार महेश बालदी यांनी कोणतीही ठोस विकास कामे केलेली नाहीत. या विरोधात मतदारांमध्ये प्रचंड प्रमाणात रोष आहे. प्रीतम म्हात्रे यांच्याकडे मतदार मोठ्या आशेने पाहत आहेत. उरण विधानसभा मतदार संघामध्ये सोमवारी ४ उमेदवारांनी ४ नामनिर्देशन पत्र दाखल केली आहेत. सुनील मारुती गायकवाड (बहुजन समाज पार्टी), मनोहर भोईर (शिवसेना, उबाठा), निलम मधुकर कडू (अपक्ष), बाळकृष्ण धनाजी घरत (अपक्ष) यांचा समावेश आहे

## विजांची रोषणाई, ढगांचे फटाके अन् पाऊस

**पुणे :** गेल्या काही दिवसांमध्ये हवेतील बाष्पाचे प्रमाण कमी झाले. कोरड्या हवेमुळे रात्री आणि पहाटे चांगला गारवा जाणवू लागला आणि ऐन दिवाळीत गुलाबी थंडी पडण्याची शक्यता निर्माण झाली होती. मात्र दाना चक्रीवादळ ओडिशाच्या किनाऱ्याला धडकल्यानंतर हवेतील बाष्प पश्चिमेकडे येत आहे. त्यामुळे दिवाळीत राज्याच्या अनेक भागांत विजांचे फटाके आणि ठिणग्यांची आतषबाजी करणाऱ्या पावसाऐवजी खराखुरा पाऊस अनुभवावा लागणार आहे. मोसमी वारे माघारी फिरल्यानंतरही ऑक्टोबरचे पहिले दोन आठवडे राज्यभरात पान २ वर

**आजचा अग्रलेख**
**रांची-लखनौची सुचिन्हे**

**वेधक**

### कोटींच्या मालमत्तेसाठी पतीची हत्या

**तेलंगणा :** एका व्यावसायिकाचा मृतदेह पोलिसांना अपूर्ण जळालेल्या अवस्थेत सापडला होता. या व्यावसायिकाची हत्या कुणी केली असेल? याचा शोध पोलीस घेत होते. या प्रकरणात पोलिसांनी व्यावसायिकाच्या दुसऱ्या पत्नीला आणि आणखी दोघांना अटक केली आहे. तेलंगणाच्या व्यावसायिकाचा मृतदेह पोलिसांना कोडागु जिल्ह्यात सापडला होता. कर्नाटक पोलिसांनी हे गूढ उकललं आहे. या व्यावसायिकाच्या दुसऱ्या पत्नीने व्यावसायिकाची आठ कोटींची मालमत्ता हडप करण्यासाठी त्याला ठार केलं. त्यानंतर त्याचा मृतदेह ती ८४० किमी लांब घेऊन गेली. पान २ वर

### सिंगल बोअर, काडतुसे जप्त

**रसायनी :** चौक गावच्या हद्दितील मुंबई -पुणे रस्त्यालगत असलेल्या हॉटेल तेजस पार्किंगजवळून पेट्रोलींग करीत असताना स्थानिक गुन्हे शाखेचे सहाय्यक फौजदार राजेश पाटील यांना माहिती मिळताच रिस येथील सौरभ जगदिश प्रसाद (वय २३) याला मुद्देमालासह रंगेहाथ पकडण्यात आले. ही कारवाई सहाय्यक फौजदार राजेश पाटील, संदिप पाटील, यशवंत झेमसे, रविंद्र मुंढे, विकास खैरनार, सचिन शेलार, भरत तांदळे, सचिन वावेकर यांच्या पथकाने केली.यात ३५ हजार रूपये किमतीचा एक देशी बनावटीचा शिंगल बोअरचा कट्टा १ हजार रूपये किंमतीचे दोन जिवंत काडतूस असा एकूण ३६००० हजार रूपये किमतीचा मुद्देमाल मिळून आला.

# मला माफ करा




### तुम्हाला बाप आहे कि, नाही; गायकवाडांचे बेताल वक्तव्य

आ. दळवी यांच्या सभेत रिपब्लिकन पक्षाचे कोकण प्रदेशाध्यक्ष जगदिश गायकवाड यांची भाषणात जीभ घसरली. भर उन्हात उपस्थितांकडून हवा तसा प्रतिसाद मिळत नसल्याने 'अरे तुम्हाला बाप आहे, की नाही' असे बेताल वक्तव्य करीत मतदारांचा अपमान केला. त्यामुळे दळवींच्या व्यासपीठावर गायकवाडांनी केलेल्या बेताल वक्तव्यावर मतदारांनी तीव्र नाराजी व्यक्त केली आहे.

## बंडखोरी खपवून घेणार नाही | दिलीप भोईर यांना महेश मोहिते यांचा इशारा

**सध्या महायुतीमध्ये भाजपा आणि शिवसेना शिंदेगट यांच्यामध्ये राडा पहायला मिळत आहे. अलिबाग विधानसभा मतदार संघामध्ये गेल्या १२ वर्षामध्ये भाजपची बांधणी मी केली आहे. काल परवा भाजपमध्ये आलेले भाजपची बांधणी मी केल्याचा दावा करीत आहेत. भाजप, शिंदे गट शिवसेना, अजित पवार गट राष्ट्रवादी ही महायुती आहे. महेंद्र दळवी यांच्यासोबत महायुती आहे. भाजपचे असंख्य कार्यकर्ते त्यांच्यासोबतच आहेत. बंडखोरी करून दिलीप भोईर मंगळवारी उमेदवारी अर्ज भरणार आहेत. ही बंडखोरी पक्ष कधीही खपवून घेणार नाही. बंडखोरी करणाऱ्यांना जागा दाखविली जाणार आहे. त्यानंतर पक्ष पुढील भूमिका घेईल, असा टोला भाजपचे जिल्हा उपाध्यक्ष दिलीप भोईर यांना महेश मोहिते यांनी लगावला आहे.**

। अलिबाग । प्रतिनिधी ।

मागील निवडणूकीत जिंकून येण्यासाठी जनतेला जी आश्वासने दिली होती. त्या आश्वासनांची पूर्ती करण्यास आमदार महेंद्र दळवी अपयशी ठरले आहेत. गेल्या पाच वर्षात अलिबाग-मुरुड विधानसभा मतदार संघातील बेराजगारी दूर करण्यात अपयशी ठरलो, युवकाच्या हाताला काम देऊ शकलो नाही, अशी कबूली देत आ.महेंद्र दळवी यांनी उमेदवारी अर्ज भरण्यापूर्वी मतदारांची माफी मागितली. मात्र जनता सुज्ञ आहे. पुन्हा फसवणूक करण्याची संधी देणार नसल्याचा चंग जनतेनं बांधला असून पुन्हा अशा अकर्तृत्ववान व्यक्तीला निवडून द्यायचे नाही, असा निर्धार मतदारांनी केल्याचे चित्र आहे.

राज्यात सुरुवातीला महविकास आघाडी सरकारमध्ये सत्ता उपभोगत असताना शिंदे गटाने फारकत घेत भाजपासोबत वेगळी चुल मांडली. त्यानंतर अजित पवार गटालासोबत घेतले. गेल्या अडीच वर्षात सत्ता भोगताना जनतेच्या कामाकडे महायुती सरकारचे दुर्लक्ष झाले. पाडापाडीच्या राजकारणातच त्यांचा अधिक वेळ गेला. त्यामुळे जनतेचा विकास करण्याचे राहून गेले. विशेष म्हणजे अलिबाग-मुरुड मतदार संघाचे महायुतीचे उमेदवार महेंद्र दळवी यांनी याची कबुली दिली आहे.

उमेदवारी अर्ज भरताना त्यांनी शक्तिप्रदर्शन करण्याचा प्रयत्न केला. त्यावेळी पार पडलेल्या सभेत ते बोलत होते. गेल्या पाच वर्षात अलिबाग-मुरुड विधानसभा मतदार संघातील बेराजगारी दूर करण्यात अपयशी ठरलो, अशी कबूली महायुतीचे उमेदवार आमदार महेंद्र दळवी यांनीच दिली. तसेच आमदारकीच्या कालावधीत काही पान २ वर

### भाजपच्या पदाधिकाऱ्यांना धमकी

**दळवींच्या प्रचाराला तसेच सभांना येत नसल्याच्या कारणावरुन भाजपचे ॲड. महेश मोहिते यांनी भाजपच्याच पदाधिकाऱ्याला बेदम मारहाण केली. याबाबत पोलीस ठाण्यात गुन्हाही दाखल करण्यात आला आहे. असे असतानाही पक्षाच्याच अधिकाऱ्यांना शिंदे गटाच्या व्यासपीठावरुन पुन्हा धमकी देण्याचा प्रताप ॲड. महेश मोहिते यांनी केला आहे. यावरुन मोहिते स्व:पक्षाला भीक घालत नसल्याचे स्पष्ट झाले.**




# आता महायुतीचे झेंडेही रुसले

## घटक पक्षाचे मनोमिलन झाले नसल्याचे चित्र स्पष्ट

**महायुतीत मोठा भाऊ असणाऱ्या भाजपचे जिल्हा उपाध्यक्ष दिलीप भोईर उमेदवारी अर्ज भरणार असल्याने महायुतीच्या मतदारांमध्ये आता संभ्रम निर्माण झाला असून कोणता झेंडा हाती घ्यावा, या विचारात मतदार आहेत.**

। रायगड । खास प्रतिनिधी ।

अलिबाग येथे सोमवारी पार पडलेल्या प्रचारसभेत महायुतीमध्ये काहीच आलबेल नसल्याचे दिसून आले. शिवसेना शिंदे गटाचे उमेदवार महेंद्र दळवी यांना पाठींबा देण्यासाठी महायुतीमधील नेते, पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांना हजर राहण्याचे फर्मान त्यांच्या-त्यांच्या पश्रेष्ठींनी दिले होते. मात्र प्रत्यक्षात पार पडलेल्या तोकड्यासभेत भाजपाचे दोन आणि राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गटाचा एक झेंडा दिसून आला. त्यामुळे महायुतीमधील घटक पक्षाचे मनोमिलन झाले नसल्याचे त्यानिमित्ताने अधोरेखित झाले.

अलिबाग-रोहा-मुरुड विधानसभेच्या निवडणुकीत शेकापच्या कणखर आणि तडफदार उमेदवार चित्रलेखा पाटील उर्फ चिऊताई यांच्याविरोधात शिवसेना शिंदे गटाने आ. महेंद्र दळवी यांना उमेदवारी दिली आहे. दळवी यांना उमेदवारी दिल्याने गुडघ्याला बाशिंग बांधून बसलेले भाजपाचे जिल्हा उपाध्यक्ष दिलीप भोईर हे नाराज झाले आहेत. त्यांनी अपक्ष उमेदवारी अर्ज दाखल करण्याचा निर्णय घेतला आहे. ते मंगळवारी आपला उमेदवारी अर्ज भरणार आहेत. भाजपाचा त्यांना छुपा पाठींबा असल्यानेच ते एवढे मोठे धाडस करत असल्याचे आता लपलेले नाही. अलिबाग विधानसभा मतदारसंघात भाजपा निवडणुकीत उरण पॅटर्न राबवणार असल्याचे बोलले जाते. त्यामुळे त्याचा थेट परिणाम महायुतीचे उमेदवार महेंद्र दळवी यांच्यावर होणार असल्याने त्यांच्या तंबूत घबराट पसरली आहे.

महायुतीमधील घटक पक्षातील नेते, पदाधिकारी आणि कार्यकर्ते यांचे मनोमिलन झाल्याचे ठासून सांगण्यात येते. मात्र त्याचे हे सत्य सोमवारी पार पडलेल्या प्रचारसभेत उघडे पडले आहे. दळवी यांच्या तोकड्या सभेत त्यांच्याच पक्षाचे झेंड अधिक संख्येने दिसून आले, तर भाजपाचे दोन आणि राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गटाचा एकच झेंडा दिसून आला.

# दोन बसच्या धडकेत एक ठार

। वरवंड । प्रतिनिधी ।



पुणे-सोलापुर राष्ट्रीय महामार्गावर वरवंड (ता.दौंड) येथे दोन एसटी बस गाड्यांची समोरासमोर धडक होवून भीषण अपघात झाला. यामध्ये एक महिलेचा मृत्यू तर गंभीर व किरकोळ असे तब्बल ६९ प्रवासी जखमी झाले. सोमवारी सव्वाएक वाजता हा अपघात झाला. सुवर्णा होले (रा.पाटस ता.दौंड ) असे मयत झालेल्या महिलेचे नाव आहे.

दोन्ही एसटीत रक्ताचा पडलेला सडा, अडकलेले प्रवासी, रडण्या-ओरडण्याचा आवाज या भयायनक दृष्याने नागरिकांचे अक्षरशः काळीज पिळवटून गेले. यावेळी तात्काळ उपस्थित झालेल्या तब्बल १० ते १२ रुग्णवाहिकेतून जखमींना उपचारासाठी तालुक्यातील काही दवाखान्यात दाखल करण्यात आले.सध्या दिवाळीच्या सुट्ट्यांमुळे महामार्गावर वाहनांची वर्दळ वाढली आहे.सोमवार दोन एसटी वाहनांच्या अपघातात हादरुन गेला.

महामार्गाने जामखेड-पुणे ही एसटी (एमएच ११ बीएल ९४११) जामखेडहुन पुण्याकडे जात होती.तर पुणे-तुळजापूर एसटी (एमएच१४ बीटी) तुळजापुरकडे चालली होती. दुपारी सव्वा एक वाजता वरवंड येथील कौठीचा मळा भागात पुण्याकडे जाणारी जामखेड एसटी अचानक दुभाजकामधून पलिकडच्या मार्गावर गेली. त्याचवेळी समोरुन तुळजापूर एसटी येत होती. या दोन्ही एसटींची समोरासमोर धडक होवून भीषण अपघात झाला. जामखेड एसटी अपघातानंतर महामार्ग सोडून काही अंतर उत्तर दिशेला जाऊन थांबली. दोन्ही एसटीत एकुण १०५ प्रवासी होते. अपघाताचा प्रचंड आवाज होताच परिसरातील नागरिकांनी घटनास्थळी धाव घेऊन जखमींना मदत करण्यास सुरुवात केली. पान २ वर

# महाराष्ट्राची शान धुळीस मिळवली | चित्रलेखा पाटील यांचा सरकारवर घणाघात

। अलिबाग । शहर प्रतिनिधी ।

आताच्या महायुती सरकारने दिल्लीसमोर झुकून महाराष्ट्र राज्याची शान धुळीस मिळवली आहे. गुंडगिरी, दहशत व महागाईला मतदार कंटाळले आहेत. अलिबाग, मुरूड व रोहा विधानसभा मतदार संघात विरोधकांनी फलक लावून विकास फक्त बोर्डावर केला आहे. प्रत्यक्षात मात्र कामच दिसत नाही. त्यामुळे जनता संतप्त झाली आहे. खोटे गुन्हे दाखल करणे, न लागणाऱ्या नोकऱ्यांमुळे कार्यकर्ता त्रस्त झाला आहे. शेतकरी कामगार पक्षाची उमेदवारी ही लाल बावट्याच्या सच्च्या शिलेदाराची आहे. महाराष्ट्राच्या स्वाभिमान व अभिमानासाठी निष्ठेचा झेंडा फडकविण्याची आता वेळ आली आहे, असे प्रतिपादन शेकापच्या अधिकृत उमेदवार चित्रलेखा पाटील उर्फ चिऊताई यांनी केले.

अलिबाग तालुक्यातील मेढेखार येथील रविवारी (दि.२७) संपन्न झालेल्या शेतकरी कामगार पक्षाच्या प्रचारादरम्यान त्या बोलत होत्या. पुढे चित्रलेखा पाटील उर्फ चिऊताई म्हणाल्या की, पन्नास खोक्यांचा शिंदे गट दिल्लीमध्ये जाऊन मोदी-शहांसमोर झुकून त्यांनी महाराष्ट्राची आण, बाण, शान पूर्णपणे धुळीस मिळवल्याचे सांगत त्यांनी सरकारचा चांगलाच समाचार घेतला.

स्थानिक आमदार शिंदे गटाचे असून ते अलिबाग-मुरूड व रोहा विधानसभा मतदारसंघातील बेरोजगारांना नोकरी देण्यासाठी अपयशी ठरलेले आहेत. शेकापने आणलेल्या चारशे नोकऱ्यांवरदेखील विद्यमान आमदारांनी स्थगिती आणली. शेकापचे



सरचिटणीस जयंत पाटील ही स्थगिती नक्कीच उठवतील आणि बेरोजगारांना हक्काची नोकरी मिळवून देतील.

विद्यमान आमदारांनी जे पन्नास खोके आणले, ते गळक्या सिव्हील हॉस्पिटलचे, रखडलेल्या पेन्शनचे, सरकारी नोकरांच्या अडकलेल्या पगाराचे आहेत. शेकापचे सरचिटणीस जयंत पाटील हे स्वतंत्र विचार आणि झेंडा घेऊन तळागाळातल्या लोकांसाठी काम करत आहेत. शेतकरी कामगार पक्षाची एक कार्यकर्ती म्हणून प्रचंड अभिमान वाटतो. युवा व ज्येष्ठ कार्यकर्त्यांचादेखील खूप हेवा वाटतो. शेकापक्षाची आणि झेंड्याची आण, बाण आणि शान राखण्याचे कर्तव्य याच कार्यकर्त्यांच्या हातात आहे. विरोधकांनी शेतकरी कामगार पक्षाचा खोटा प्रचार करून मते मिळवली. त्यावेळी जी चूक झाली, ती आता पुन्हा होणार नाही. पुन्हा एकदा नव्या उमेदीने कार्यकर्त्यांनी कामाला लागून ही निवडणूक लढविण्यासाठी सज्ज व्हा असे आवाहन चित्रलेखा पाटील उर्फ चिऊताई यांनी केले.

### बदला घेण्याची हीच वेळ!

**या मतदारसंघातील अनेक प्रश्न यापूर्वी स्व. मीनाक्षी पाटील, जयंत पाटील, पंडित पाटील यांनी सोडविले आहेत. पोटतिडकीने अधिवेशनात त्यांची बाजू मांडून सर्वसामान्य जनतेला न्याय मिळवून दिला आहे. आताच्या आमदारांनी विकासाच्या फक्त बाता मारण्याचेच काम केले आहे. जयंत पाटील यांचा पराभव होताच गुवाहटीवरून पन्नास खोके आणणारे आमदार चिखलात लोळतात. जय-पराजय हे होत असतात. परंतु, आमदार किती खालच्या खालच्या थराला जाऊ शकतो, हे या मतदारसंघातील जनतेने पाहिले आहे. त्यामुळे आता या सर्वाचा बदला घेण्याची वेळ आली आहे, असे आवाहन चित्रलेखा पाटील उर्फ चिऊताई यांनी मतदारांना केले.**

## इच्छुकांत आकर्षक निवडणूक चिन्हाची क्रेझ

# उमेदवारांना 196 चिन्हांचा पर्याय

सुयोग आंग्रे
। रायगड ।

राजकीय पक्षांची उमेदवारी नसल्यास अपक्ष म्हणून लढताना उमेदवारांना मतदारांवर प्रभाव पडेल किंवा त्यांच्या लक्षात राहील असेच निवडणूक चिन्ह मिळविण्याचा प्रयत्न असतो. आतापर्यंत पारंपरिक चिन्ह जास्त असल्याने त्यात निवडीला वाव नसायचा, त्यात अपक्षांची संख्या जास्त झाली, तर महत्त्वाचे चिन्ह मिळवायची मोठीच स्पर्धा असायची. काही चिन्ह तर शिट्टी, कुकर, पतंग अशी काही चिन्ह खेळणी वाटत असल्याने उमेदवारांचा कल नसायचा. मात्र आता घसघशीत १९६ चिन्हांचे पर्याय उपलब्ध झाले आहेत. विशेष म्हणजे, नुसतीच चिन्हच वाढलेली नाही तर त्यात नावीन्यता आली आहे.

राष्ट्रीय पक्ष वाढले राष्ट्रीय व राज्य पक्षांची मान्यता वाढलेल्या पक्षांमुळे यावेळी पक्षांच्या चिन्हात वाढ झाली आहे. पारंपरिक भारतीय राष्ट्रीय काँग्रेस (पंजा), भारतीय जनता पक्ष (कमळ), राष्ट्रवादी काँग्रेस (घड्याळ), भारतीय कम्युनिस्ट पक्ष (कनीस-विळा), शिवसेना (धनुष्यबाण), महाराष्ट्र नवनिर्माण सेना (इंजिन), बहुजन समाज पार्टी (हत्ती) या पारंपरिक चिन्हांत आता तृणमूल काँग्रेस



**राजकीय पक्ष वाढले, चिन्हात आली वैविधता**

(फुल-गवत), मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्ष (हातोडा-विळा-तारा), नॅशनल पीपल्स पार्टी (पुस्तक) या पक्षांच्या चिन्हाची भर पडली आहे.

**निवडणूक चिन्हांत खाद्य पदार्थांच्या वस्तूंची रेलचेल आहे. जेवणाच्या ताटापासून ब्रेड टोस्टर, सफरचंद, बिस्कीट, केक, फळांची टोपली, पाव, बिस्कीट, केक, ब्रेड टोस्ट अशा बेकरी पदार्थांसह आइस्क्रिम, द्राक्ष, भुईमुगाच्या शेंगा यांसह भाज्यांचा समावेश आहे. फणस, भेंडी, कलींगड, अक्रोड आदी फळांना निवडणूक चिन्हांमध्ये स्थान देण्यात आले आहे.**

इलेक्ट्रॉनिक्स वस्तूंचा निवडणूक चिन्हांत समावेश झाला आहे. त्यात सीसीटीव्ही, पेनड्राइव्ह, बेबी वॉकर, पेन स्टॅन्ड, रूम कुलर, स्विच बोर्ड, भेटवस्तू, टूथ पेस्ट, इंजेक्शनची सिरीन, दुर्बीण, कॅमेरा, बॅटरी, सायकलचा पंप, क्रेन अशा नानाविध वस्तूंसोबत कालबाह्य झालेलं दळण दळायचं जातं, बांगड्या, चपला, हार, हिरा, कढई, फोन चार्जर, प्रेशर कुकर, कॅमेरा, बुद्धिबळ, हेल्मेट, पत्रपेटी ट्रक, ट्रॅक्टर, मोत्यांचा हार, बॅटरी, बूट, मोजे अशी चिन्हेदेखील आयोगाने उपलब्ध करून दिली आहेत. चाळणीपर्यंत पान २ वर

# फणसाड अभयारण्यात पक्षीगणना

सुधीर नाझरे
। मुरुड जंजिरा ।



**166 पक्ष्यांच्या प्रजातीची नोंद**

मुरुड तालुक्यातील फणसाड अभयारण्यात नुकताच ग्रीन वर्क्स ट्रस्ट आणि एस. बी. आय फाऊंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने, तसेच महाराष्ट्र वन विभाग, ठाणे (वन्यजीव) विभाग यांच्या सहकार्याने फणसाड वन्यजीव अभयारण्य येथे आयोजित करण्यात आलेल्या पक्षी गणनेचा कार्यक्रम यशस्वीपणे संपन्न झाला.

हा कार्यक्रम २५ ते २७ ऑक्टोबर या कालावधीत आयोजित करण्यात आला होता. गणनेत एकूण ५ राज्यांमधून ३५ पक्षी निरीक्षक त्याचप्रमाणे ग्रीन वर्क्स ट्रस्टचे १५ स्वयंसेवक आणि १५ वन कर्मचारी यांनी सहभाग घेतला. ठाणे वन्यजीव विभागाचे उपवनसंरक्षक अक्षय गजभिये, फणसाड अभयारण्याचे सहाय्यक वनसंरक्षक मनोहर दिवेकर, वनपरिक्षेत्र अधिकारी नारायण राठोड यांचे मोलाचे मार्गदर्शन या कार्यक्रमाला लाभले.

वैज्ञानिक पद्धतीने राबविल्या गेलेल्या या गणनेत एकूण १६६ पक्ष्यांच्या प्रजातींची नोंद करण्यात आली. पक्षी गणनेबरोबरच अभयारण्यातील इतर जैवविविधतेची नोंद सहभागी लोकांनी केली. त्यात एकूण ५१ प्रजातींची फुलपाखरे, १८ उभयचर प्राणी, ९ सर्प प्रजाती तसेच १६ सस्तन प्राण्यांची नोंद झाली आहे. अभयारण्याच्या विविध भागात तसेचफणसाडसारख्या जैवविविधता पूर्ण जंगलात निरीक्षकांनी जंगलाच्या विविध भागात जाऊन आपली निरीक्षणे नोंदवली. गणनेआधी सहभागी होणाऱ्यांसाठी कार्यशाळा घेण्यात आली. अभयारण्याच्या पर्यटन संकुलात त्यांचा सरावदेखील घेतला .

अशा प्रकारचे उपक्रम अभयारण्यात वर्षभर राबवविले जाणार असून पुढील पक्षीगणना जानेवारी महिन्यात करण्यात येईल, अशी माहिती डॉ. निखिल भोपळे यांनी दिली.

# पनवेलला मिळेना पूर्णवेळ गटविकास अधिकारी

## वीस दिवसात तिघांकडे पदभार

**। नवीन पनवेल । प्रतिनिधी ।**

**पनवेल पंचायत समितीतील गटविकास अधिकारी संजय भोये यांची बदली झाल्यानंतर अवघ्या वीस ते २५ दिवसात तिघांकडे गटविकास अधिकाऱ्याचा चार्ज देण्यात आला. त्यामुळे आश्चर्य व्यक्त केले जात आहे. पनवेल पंचायत समितीला पूर्णवेळ गटविकास अधिकारी कधी मिळणार हा प्रश्न या बदल्या निमित्ताने उपस्थित होत आहे.**

पनवेल पंचायत समितीचे गट विकास अधिकारी संजय भोये यांची कल्याण पंचायत समितीत बदली झाल्यानंतर पनवेल येथील सहाय्यक गटविकास अधिकारी महेश पांढरे यांच्याकडे मुख्य कार्यकारी अधिकारी भरत बाष्टेवाड यांनी पदभार दिला. मात्र हा पदभार केवळ दिडच दिवसांचा राहिला. त्यानंतर उरण पंचायत समितीचे गटविकास अधिकारी वाठारकर यांच्याकडे पनवेल आणि उरणचा अतिरिक्त कारभार दिला होता. पांढरे हे देखील एमपीएससीतून उत्तीर्ण होऊन सहाय्यक गटविकास अधिकारी झाले आहेत.

मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी केवळ दिडच दिवसात त्यांचा पदभार काढून घेतल्याने त्यांना हा पदभार कशासाठी दिला हे गुलदस्त्यात आहे. तसेच मुख्य कार्यकारी अधिकारी यांचा पांढरे यांच्यावर विश्वास नाही का असा सवाल निमित्ताने उपस्थित झाला. वाठारकर हे उरण आणि पनवेल या दोन्ही ठिकाणी काम पाहत होते. त्यानंतर अवघ्या काहीच दिवसात समीर वाठारकर यांच्या जागी खालापूर येथील गटविकास अधिकारी संदीप कराड यांची कोकण आयुक्त यांच्या पत्राद्वारे प्रतिनियुक्ती करण्यात आली.

विधानसभा निवडणुका सुरू असल्याने त्यांची सहाय्यक निवडणूक अधिकारी म्हणून नेमणूक करण्यात आली. केवळ २० ते २५ दिवसात ३ गट विकास अधिकाऱ्यांकडे पदभार सोपवल्याने पनवेल पंचायत समितीतील हे बदली सत्र थांबेल का असा सवाल नागरिकांकडून विचारला जात आहे.

वीस दिवसात तिघांकडे चार्ज गेल्याने येथील कामांवर त्याचा परिणाम होत आहे.

**आदेश संशयास्पद**

**संदीप वाठारकर यांना ज्या आदेशान्वये पनवेलचा कार्यभार सोपावण्यात आलेला आहे. त्या आदेशावर मंजूर टिप्पणीचा दिनांक नमूद करण्यात आलेला नाही, यावरून हे आदेशच संशयास्पद आहेत.**

> **पांढरे हे नवीन असल्याने त्यांच्या जागी वाठारकर यांची नियुक्ती करण्यात आली होती. पनवेल तालुका मोठा आहे आणि सेन्सिटिव्ह आहे. सध्या निवडणुकी साठी एआरओ म्हणून कराड यांची पनवेल येथे नियुक्ती करण्यात आली आहे.**
>
> **- डॉ. भरत बास्टेवाड, मुख्य कार्यकारी अधिकारी, रायगड जिल्हा परीषद**

वाठारकर यांची पनवेल येथे नियुक्ती करण्यापूर्वी महाराष्ट्र विधानसभेच्या निवडणुका होऊ घातल्या होत्या.

त्यामध्ये १८८ पनवेलचा ही समावेश आहे, व त्याठिकाणचे पनवेल पंचायत समितीचे गटविकास अधिकारी हे सहाय्यक निवडणूक निर्णय अधिकारी म्हणून आहेत ह्या गोष्टीची कल्पना मुख्य कार्यकारी अधिकारी यांना नसणे ही न पटण्यासारखी बाब आहे. ह्या सर्व बदल्या प्रक्रियेमध्ये काहीतरी शिजत असल्याचा संशय बळावत आहे.

## शब्दवेल दिवाळी अंकाचे प्रकाशन

**रसायनी :** सर्जनशील शब्दवेल साहित्य संघाच्या शब्दवेल दिवाळी अंक बोलीभाषा विशेषांकाचे प्रकाशन रायगडभूषण प्रा. एल.बी. पाटील यांच्या हस्ते उत्साहात पार पडले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक मच्छिंद्रनाथ म्हात्रे यांनी केले. याप्रसंगी बोलीभाषांमधील साहित्य खऱ्या अर्थाने अभिजात असल्याचे मत प्रा. एल. बी. पाटील यांनी व्यक्त केले.

या दिवाळी अंकाच्या संपादकपदाची जबाबदारी देवेंद्र इंगळकर, अतिथी संपादक प्रा. प्रतिभा सराफ, कार्यकारी संपादक मनीषा शिरटावले, उपसंपादक अश्विनी कोठावळे, सहसंपादक विलास पुंडले व रामदास गायधने, व्यवस्थापक अमोल चरडे, शब्दवेलच्या सचिव अश्विनी अतकरे यांनी यशस्वीपणे पार पाडली.

## संजय राजिवले यांच्या गाडीची अज्ञात इसमांकडून तोडफोड



**। कोलाड । वार्ताहर ।**

रोहा तालुक्यातील वरसगाव ग्रामपंचायतीचे माजी सरपंच संजय राजिवले यांच्या गाडीची अज्ञात इसमांकडून तोडफोड करण्यात आली आहे.या घटनेमुळे परिसरात घबराटीचे वातावरण पसरले आहे.

रविवारी ( ता.२७ ) रोजी संजय राजीवले हे आपल्या मालकीची (नं.एम एच ०६ बीजी ७७७०) ही गाडी आपल्या राहत्या निवासस्थानी नेहमीच्या जागेवर पार्क करून ठेवली होती. त्याच दिवशी मध्यरात्रीच्या सुमारास अंधाराचा फायदा घेत अज्ञातांनी गाडीवर दगडफेक करून गाडीची मोडतोड केली. सदरची दुर्दैवी घटना दुसऱ्या दिवशी सकाळी त्यांच्या निदर्शनास आली. या घटनेचे वृत्त परिसरात वाऱ्यासारखे पसरले. चार चाकी गाडीवर झालेल्या दगड फेकीमुळे गाडीचे नुकसान झाले असून या झालेली दगडफेक करण्याचा मागचा नक्की हेतू काय? या घटने मागे कोणाचा हात आहे? हे मात्र अद्याप समजू शकले नाही. घडलेला प्रकार हा अत्यंत निंदनीय असून या घटनेबद्दल वरसगाव परिसरात संतापाची लाट पसरली असून या घटनेची माहिती संजय राजवले यांनी कोलाड पोलिसांना देत घटनेची चौकशी करावी अशी मागणी केली आहे..

# नागोठणे परिसरात भातकापणीची लगबग

## मजुरांची कमतरता, प्रतिव्यक्ती ४०० ते ५०० रु. खर्च

**। सुकेळी । वार्ताहर ।**

दरवर्षीप्रमाणे यावर्षीदेखील परतीच्या पावसाने शेतकऱ्यांचे मोठ्या प्रमाणात नुकसान केले आहे. जवळपास ऑक्टोबर महिना संपत आला तरी पावसाचा हाहाकार सुरुच होता. परंतु, चार ते पाच दिवसांपासून सर्वत्र पावसाने विश्रांती घेतली आहे. त्यामुळे संपूर्ण नागोठणे परिसरामध्ये शेतकऱ्यांची भातकापणीची मोठ्या प्रमाणात लगबग दिसून येत आहे.



परतीच्या पावसाने शेतातील भाताची सर्व रोपे ही जमिनीवर आडवी पडून सर्वत्र विखुरल्यामुळे भातकापणी करताना मजुरांचे अक्षरशः कंबरडे मोडत आहेत. भातकापणी करताना शेतामध्ये पुन्हा नव्याने उगवलेले भाताचे कोंबदेखील अडथळे ठरत आहेत. ज्या ठिकाणी भातकापणीसाठी दोन ते तीन दिवस लागायचे, त्या ठिकाणी भातकापणी करण्यासाठी आठ ते नऊ दिवस लागत आहेत. त्यातच भातकापणीसाठी लागणाऱ्या मजुरांची कमतरता भासत आहे.

बहुतांशी आदिवासी मजूर हे दरवर्षी आपापल्या शेतीची कामे पूर्ण करुन दुसरीकडे मजुरीसाठी जातात. परंतु, यावेळी मात्र उशिरापर्यंत सुरु राहिलेल्या पावसामुळे भातकापणीची कामे ही सर्वांची एकदमच निघाल्यामुळे मजुरांची कमतरता मोठ्या प्रमाणात भासत आहे. त्यातूनच जरी मजूरकर मिळाले, तरी ४०० ते ५०० रु. एका माणसाची मजुरी, दोनवेळचे जेवण व चहापाण्यासाठी आणखी वेगळे पैसे असा मोठ्या प्रमाणात खर्च शेतकऱ्यांना मजुरांवर करावा लागत आहे. त्यामुळे शेतीसाठी लागणारी महागाईची बी बियाणे, मजुरांचा खर्च व परतीच्या पावसाचा बसलेला फटका अशा सर्व गोष्टींचा विचार करता यापुढे शेती करायची की नाही, असा प्रश्न शेतकऱ्यांसमोर निर्माण झाला आहे.

## पांडुरंग लाड यांचे निधन

**। कोलाड । वार्ताहर ।**

हेदवली येथील रहिवासी पांडुरंग भागोजी लाड यांचे



मंगळवारी(दि.२२) निधन झाले. मृत्यूसमयी ते ८७ वर्षांचे होते. त्यांच्या अंत्यदर्शनासाठी त्यांचे नातेवाईक, सामाजिक, राजकीय, शैक्षणिक क्षेत्रातील असंख्य नागरिक तसेच समस्त हेदवली ग्रामस्थ उपस्थित होते. त्यांच्या पश्चात तीन मुलगे, दोन मुली, सुना, पुतणे, नातवंडे व मोठा लाड परिवार आहे. त्यांचे दशक्रिया विधी गुरुवारी (दि.३१),उत्तरकार्य विधी शनिवारी (दि.२) रोजी होणार आहेत.

# प्रचार साहित्यावर मुद्रक व प्रकाशकांचे नाव छापणे बंधनकारक

## जिल्हाधिकारी किशन जावळे यांचे आवाहन

**। खास प्रतिनिधी । रायगड ।**

जिल्ह्यात विधानसभा सार्वत्रिक निवडणुकीची आचारसंहिता लागू करण्यात आली आहे. या निवडणूक आदर्श आचारसंहिता काळात संबंधित मुद्रक प्रिंटर्सनी प्रचार साहित्य तसेच इतर छपाई बाबत विशेष काळजी घेऊन आचारसंहितेचे पालन करण्याचे आवाहन जिल्हा निवडणूक अधिकारी किशन जावळे यांनी केले आहे.

लोकप्रतिनिधीत्व अधिनियम ानुसार निवडणूक पत्रकांच्या छपाईवर आणि प्रसिद्धीवर निर्बंध घालण्यात आले आहेत. याकडे सर्व राजकीय पक्ष, निवडणूक लढविणारे उमेदवार आणि मुद्रणालयांच्या चालक व मालकांचे लक्ष वेधण्यात आले आहे.

हाताने नक्कल काढण्या व्यतिरिक्त अन्य कोणत्याही प्रक्रियेने छापण्यात किंवा अनेक प्रती काढण्यात आलेले निवडणुकी संबंधीचे प्रत्येक पत्र, हस्तपत्रक, घोषणाफलक किंवा भित्तीपत्रक यांच्या दर्शनी भागावर मुद्रकांचे आणि प्रकाशकाचे नाव व पत्ता प्रसिध्द करणे बंधनकारक आहे. असे कोणतेही पत्रक मुद्रकांने इच्छुक प्रकाशकाकडून त्यांनी ते स्वत: स्वाक्षरीत केलेले आहे, त्या व्यक्तिला व्यक्तिश: ओळखतील अशा दोन व्यक्तींनी साक्षांकित केलेल्या त्या प्रकाशकांची ओळख पटवणारे प्रतिज्ञापत्र (दोन प्रतीमध्ये) घेणे अत्यावश्यक आहे, असे जिल्हाधिकारी जावळे यांनी सांगितले. तसेच दस्तऐवज छापण्यात आल्यावर मुद्रकांने प्रतिज्ञापत्राची एक प्रत व पत्रक आदींच्या चार प्रती संबंधित जिल्हा दंडाधिकाऱ्यांकडे तीन दिवसाच्या आत सादर कराव्यात. या सर्व प्रती मिडीया सेलमधील कक्षात जमा कराव्यात, असा सूचना केल्या आहेत.

या नियमांचे उल्लंघन करणाऱ्यांना सहा महिन्यांपर्यंत कारावास किंवा रुपये दोन हजारांपर्यंत दंडाची अथवा या दोन्ही शिक्षा होऊ शकतात अशी तरतूद या नियमात असल्याचेही जिल्हाधिकारी जावळे यांनी स्पष्ट केले.

## दिवाळी पहाट कार्यक्रमाचे आयोजन

**। चिरनेर । प्रतिनिधी ।**

उरण तालुक्यातील वशेणी येथील हनुमान मंदिरात दिवाळी पहाट, सूर आपल्या माणसांचा या सुरेल गीतांच्या कार्यक्रमाचे आयोजन वशेणी इतिहास संपादकीय मंडळाच्या वतीने करण्यात आले आहे. हा कार्यक्रम दीपावली सणाचे औचित्य साधून, काळानुरूप हरवत चाललेल्या भारतीय संस्कृतीचे जतन करण्याच्या उद्देशाने एक नोव्हेंबर रोजी आयोजित करण्यात आला असून, पहाटे ०५.४५ वाजण्याच्या सुमारास ही सुरेल गीतांची मैफल रंगणार आहे. सूर आपल्या माणसांचा या बहारदार गीतांच्या कार्यक्रमातून प्र. ना. नागडे (ठाणे), रमेश थवई (पेण), रमण पंडित (उरण), संदीप गावंड (उरण), हर्षली म्हात्रे (पेण), अक्षता गोसावी (पनवेल), रमणिक म्हात्रे (उरण), अनिल भोईर (उरण), गौरी कोरेगावकर (उरण), सानिका पाटील (वशेणी), प्रियांका गाताडी (कोप्रोली), किशोर पाटील (सारडे) तसेच शिवपार्वती भजन मंडळ (वशेणी) आदी गायक कलाकारांच्या सुरावटीतून मराठी-हिंदी गीतांचा आनंद रसिकांना घेता येणार असल्याची माहिती वशेणी इतिहास संपादकीय मंडळाचे कार्यवाहक मच्छिंद्र म्हात्रे यांनी दिली.

## लॉकरमधील दागिने पत्नीने चोरले; गुन्हा दाखल

**। नवीन पनवेल । वार्ताहर ।**

पती-पत्नीने संयुक्तपणे लॉकरमध्ये ठेवलेले सात लाख रुपयांचे दागिने लॉकरमधून काढून नेल्याप्रकरणी पत्नी विरोधात गुन्हा दाखल करण्यात आला.

खारघर, कोपरा येथे राहणारे पती-पत्नी यांचे कौटुंबिक वाद सुरू आहेत. सध्या ते वेगवेगळे राहतात. दोघांनी मिळून फेब्रुवारी २०२१ मध्ये बँक ऑफ इंडिया, सेक्टर १०, खारघर येथे लॉकर संयुक्तपणे अर्ज करून उघडला. त्या दिवशी त्यांनी सोन्याचे दागिने व काही कागदपत्र त्यात ठेवली. एप्रिल २०२४ मध्ये ते कागदपत्रे नूतनीकरणासाठी बँकेत गेले.

यावेळी लॉकरची तपासणी केली असता त्यात सोन्याचे दागिने मिळून आले नाहीत. सदरचे लॉकर चार वेळा वापरले गेल्याचे रजिस्टरवरून दिसून आले. याबाबत त्यांनी बँकेकडे तक्रार केली. त्यांच्या पत्नीने त्यांची खोटी नोंद आणि सही करून लबाडीच्या हेतूने सोन्याचे दागिने चोरून नेले.

# जिल्ह्यात आज ३१ नामनिर्देशनपत्र दाखल

## • सात मतदारसंघात ३४ अर्ज दाखल

**। खास प्रतिनिधी। रायगड ।**

विधानसभा निवडणुकीसाठी नामनिर्देशन भरण्यास २२ ऑक्टोबरपासून सुरुवात झाली आहे. आज पाचव्या दिवशी जिल्ह्यातील ७ विधानसभा मतदारसंघात ३१ उमेदवारांची ३४ नामनिर्देशनपत्र दाखल झाली असल्याची माहिती जिल्हाधिकारी किशन जावळे यांनी दिली.

जिल्ह्यातील ७ विधानसभा मतदारसंघात नामनिर्देशन पत्र भरण्याची प्रक्रिया सुरु असून २९ ऑक्टोबर ही शेवटची तारीख आहे. या सर्व अर्जाची ३० ऑक्टोबरला छाननी करण्यात येणार असून ४ नोव्हेंबर २०२४ रोजी अर्ज मागे घेता येणार आहेत. मतदान २० नोव्हेंबरला पार पडणार आहे. २३ नोव्हेंबर २०२४ रोजी मतमोजणी होणार आहे.१८८ - पनवेल विधानसभा मतदार संघामध्ये आज ७ उमेदवारांनी ९ नामनिर्देशन पत्र सादर केले. प्रशांत राम ठाकूर (भारतीय जनता पार्टी) २ अर्ज, कांतीलाल हरिश्चंद्र कडू (अपक्ष), कांतीलाल हरिश्चंद्र कडू (लोकमुद्रा जनहित पार्टी), लीना अर्जुन गरड (शिवसेना, उबाठा), अरुण जगन्नाथ भगत (भारतीय जनता पार्टी), पवन उत्तमराव काळे (भारतीय जन सम्राट पार्टी), गजेंद्र कृष्णदास अहिरे (बहुजन समाज पार्टी), डॉ. वसंत उत्तम राठोड (डिजिटल ऑर्गनायझेशन ऑफ नेशन)यांनी अर्ज सादर केले.

१८९ - कर्जत विधानसभा मतदार संघामध्ये आज ६ उमेदवारांनी ७ नामनिर्देशन पत्र सादर केले. महेंद्र सदाशिव थोरवे (शिवसेना), नमिता सुधाकर घारे (अपक्ष), किरण खंडू ठाकरे (भारतीय जनता पार्टी), किरण खंडू ठाकरे (अपक्ष), नितीन नंदकुमार सावंत (शिवसेना, उबाठा), श्रीराम बळीराम महाडिक (बहुजन समाज पार्टी), सुधाकर यादवराव घारे (अपक्ष) यांनी अर्ज सादर केले.१९० - उरण विधानसभा मतदार संघामध्ये आज ४ उमेदवारांनी ४ नामनिर्देशन पत्र सादर केले. सुनील मारुती गायकवाड (बहुजन समाज पार्टी), मनोहर भोईर (शिवसेना, उबाठा), निलम मधुकर कडू (अपक्ष), बाळकृष्ण धनाजी घरत (अपक्ष) यांनी अर्ज सादर केले.१९१ - पेण विधानसभा मतदार संघामध्ये आज ४ उमेदवारांनी ४ नामनिर्देशन पत्र सादर केले. रविंद्र दगडू पाटील (भारतीय जनता पार्टी), देवेन मारुती कोळी (वंचित बहुजन आघाडी), अतुल नंदकुमार म्हात्रे यांच्यावतीने सूचक प्रतीक सदानंद म्हात्रे (शेकाप), प्रसाद केळुराम भोईर (शिवसेना, उबाठा) यांनी अर्ज सादर केले.

१९२ - अलिबाग विधानसभा मतदार संघामध्ये आज ३ उमेदवारांनी ३ नामनिर्देशन पत्र सादर केले. महेंद्र हरी दळवी (शिवसेना), कुमारी जुईली महेंद्र दळवी (अपक्ष), मंदार एकनाथ गावंड (अपक्ष) यांनी अर्ज सादर केले.१९३ - श्रीवर्धन विधानसभा मतदार संघामध्ये आज ३ उमेदवारांनी ३ नामनिर्देशन पत्र सादर केले. संतोष तानाजी पवार (अपक्ष), राजेंद्र मधुकर ठाकूर (इंडियन नॅशनल काँग्रेस), कृष्णा पांडुरंग कोबनाक (अपक्ष) यांनी अर्ज सादर केले.

१९४ - महाड विधानसभा मतदार संघामध्ये आज ४ उमेदवारांनी ४ नामनिर्देशन पत्र सादर केले. स्नेहल माणिक जगताप (शिवसेना, उबाठा), भरत मारुती गोगावले (शिवसेना), श्रीयश माणिक जगताप (शिवसेना, उबाठा), प्रज्ञा खांबे (अपक्ष) यांनी अर्ज सादर केले.

# रातवड विद्यालयात दीपोत्सव साजरा

**। माणगांव । वार्ताहर ।**

शैक्षणिक क्षेत्रात ज्ञानरचनावादी उपक्रम राबविणाऱ्या छत्रपती शिक्षण मंडळ कल्याण संचालित माध्यमिक विद्यामंदिर रातवड विद्यालयात दीपावली निमित्ताने विविध उपक्रम व दीपोत्सवाचे आयोजन सोमवारी (दि.२८) करण्यात आले होते.

प्रथम सत्र परीक्षेनंतर साजऱ्या होणाऱ्या दीपावली उत्सवाचे औचित्य साधून विद्यालयात आकाशकंदील, भेटकार्ड व किल्ले बनविण्याची कार्यशाळा आयोजित करण्यात आली होती. विद्यार्थी सुट्टीला जाण्यापूर्वी शाळेने प्रतिवर्षी प्रमाणे दीपोत्सवाचे आयोजन केले होते. परीक्षेनंतर दोन दिवस विविध उपक्रम राबविण्यात आले. यामध्ये इयत्ता पाचवी ते आठवीच्या विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला. आकाशकंदील, भेटकार्ड व किल्ले विद्यार्थ्यांनी तयार केले.

विद्यार्थ्यांनी तयार केलेल्या विविध वस्तूंचे प्रदर्शन भरविण्यात आले व सर्व विद्यार्थी एकत्र येऊन बनविलेल्या किल्यांची सजावट करण्यात आली व दीपावली साजरी करून विद्यार्थ्यांनी दीपोत्सव साजरा केला.यानिमित्ताने अनेक विद्यार्थ्यांनी फटाके वाजवून व खाऊ वाटप करून आनंद व्यक्त केला. छत्रपती श्री शिवाजी महाराज व मासाहेब जिजाऊ यांची वेशभूषा विद्यार्थ्यांनी साकारली होती. प्रतापगड किल्ल्यावर औक्षण करून छत्रपती शिवाजी महाराजांची ओवाळणी करण्यात आली.

विद्यालयात प्रतिवर्षी दीपोत्सवाचे आयोजन केले जाते. विद्यार्थी स्वतःहून विविध उपक्रमात सहभागी होतात.विविध किल्ल्यांची पुस्तके पाहतात व आवडलेला किल्ला बांधतात. किल्ल्यासाठी लागणारे साहित्य परिसरातून जमा करतात व आकर्षक अशी सजावट रोषणाई करतात. विद्यालयाच्या या उपक्रमात मुख्याध्यापक संतोष कदम यांचे मार्गदर्शन लाभले. विद्यालयातील श्रीकृष्ण गर्दे यांनी किल्ला बनविण्यासाठी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. इयत्ता आठवीच्या विद्यार्थ्यांनी सुंदर अशी किल्ल्याची प्रतिकृती बनवली होती तसेच विद्यालयातील शिक्षक व शिक्षिका यांनी आकाश कंदील व भेटकार्ड विषयात विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.

पान १ वरून

## मला माफ करा...

कमतरता राहिली अथवा काही चूक झाली असेल, तर जनतेची माफी मागतो, असेही दळवी म्हणाले. दळवी यांच्या या वक्तव्याने मतदारांमध्ये कमालाची आक्रोश पाहायला मिळत आहे. जनतेच्या विकासासाठी, युवकांचे, शेतकऱ्यांचे, कष्टकऱ्यांचे, महिलांचे प्रश्न सोडवण्यासाठी मतदारांनी दळवी यांना २०१९ मध्ये निवडून दिले होते. मात्र त्यांनी पाच वर्षात काहीच केले नसल्याची कबूली दिली आहे. त्यामुळे अशा नाकर्त्या उमेदवाराला पुन्हा विधानसभेत कशाला पाठवायचे, असे मत अलिबाग-मुरुड मतदारसंघातील मतदारांचे झाले आहे.

## विजांची रोषणाई, ढगांचे फटाके अन् पाऊस

पाऊस कायम होता. अरबी समुद्रातील कमी दाबाचे क्षेत्र आणि बंगालच्या उपसागरातील कमी दाबाच्या क्षेत्रामुळे ठिकठिकाणी पाऊस पडला. गेल्या आठवड्याभरात पावसाचे प्रमाण कमी झाले. त्यानंतर तापमानात वाढ होऊन काही ठिकाणी ऑक्टोबर हिट जाणवू लागली. आता हवामान विभागाने २९ ते ३१ ऑक्टोबर या कालावधीत पावसाचा अंदाज वर्तवला आहे. काही ठिकाणी आज, सोमवारपासूनच पाऊस होण्याची शक्यता आहे. आकाश ढगाळ होऊन काही ठिकाणी विजांच्या कडकडाटासह पावसाची शक्यता असल्याचे ज्येष्ठ हवामानशास्त्रज्ञ अनुपम कश्यपी म्हणाले. २९ आणि ३० ऑक्टोबर रोजी छत्रपती संभाजीनगर, अहिल्यानगर, पुणे, रायगड, सातारा, सिंधुदुर्ग, जालना, परभणी, हिंगोली, गडचिरोली, गोंदिया, भंडारा या जिल्ह्यांत तर ३१ ऑक्टोबर रोजी यवतमाळ, चंद्रपूर, वर्धा येथे पिवळा इशारा देण्यात आला आहे.हवेतील धुलिकणांवर हवेची गुणवत्ता अवलंबून असते. गेल्या काही दिवसांत हवामान कोरडे झाल्यामुळे धुलिकणांचे प्रमाण वाढू लागले आहे.

## कोटींच्या मालमत्तेसाठी पतीची हत्या

मात्र पोलिसांनी हे गूढ उकललंच. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार ८ ऑक्टोबरला पोलिसांना एक कोडागू या ठिकाणी असलेल्या कॉफी इस्टेट भागात एक अर्धवट जळालेला मृतदेह आढळून आला. पोलिसांनी या मृतदेहाची ओळख पटवण्याचा प्रयत्न केला तेव्हा हा मृतदेह ५४ वर्षीय रमेश नावाच्या व्यक्तीचा असल्याचं आणि रमेश व्यावसायिक असल्याचं पोलिसांना समजलं. त्यानंतर पोलिसांनी या खुनाचा माग काढत रमेशची दुसरी पत्नी निहारीका आणि तिचे साथीदार डॉ. निखिल राणा आणि अंकुर राणा या दोघांना अटक केली. हे तिघंही बंगळुरुमध्ये वास्तव्य करतात. या तिघांनाही अटक करण्यात आली.

## दोन बसच्या धडकेत एक ठार

एसटीत अनेक प्रवासी गंभीर जखमी तर काही जण अडकलेले होते.दोन्ही एसटीचे चालक गंभीर जखमी झाले.नागरीकांनी मोठ्या शिताफिने प्रवासी बाहेर काढले.माहिती मिळताच पाटस पोलिस, महामार्ग पोलिसांनी घटनास्थळी धाव घेतली. नागरिक व पोलिसांनी पाटस टोल प्लाझा व खासगी दवाखान्यांच्या तब्बल १२ ते १३ रुग्णवाहिकेतून प्राथमिक आरोग्य केंद्र, अक्षय नर्सिंग होम, हर्ष हॉस्पीटल, पाटील हॉस्पीटल व इतर दवाखान्यात उपचारासाठी जखमी प्रवाशांना दाखल केले. एकुण ६९ प्रवासी जखमी झाले.

## उमेदवारांना १९६ चिन्हांचा पर्याय

घरगुती वस्तूंना निवडणूक चिन्हांत स्थान मिळाले आहे.घरगुती वस्तूंशिवाय सार्वजनिक वस्तूंची रेलचेल आहे. त्यात कपाट, एअर कंडिशनर, फुगा, बांगड्या, फलंदाज, दुर्बीण, विटा, कोट, झगा, फुटबॉल, विजेचा खांब, ऊस शेतकरी, गॅस सिलिंडर, हॅट, किटली, चावी, काडेपेटी, लायटर, नेलकटर, गळ्यातील टाय, तंबू, करवत, जेवणाचे ताट, मटार, पेनड्राइव्ह, अननस आदी विविध प्रकारची १९७ मुक्त चिन्हे अपक्षांना उपलब्ध आहेत.

## चार महिन्यानंतरही जातीचा दाखला मिळेना

**। नवीन पनवेल। वार्ताहर ।**

सरकारी काम आणि बारा महिने थांब अशी म्हण प्रचलित आहे. याचा प्रत्यय पनवेलमधील एका आदिवासी बांधवाला आला आहे. तब्बल चार महिने उलटून देखील त्यांना जातीचा दाखला पनवेल तहसील कार्यालयातून मिळाला नाही. त्यामुळे हा दाखला कधी मिळणार याची वाट पाहत आहे. नानोशी-गराडा येथील चंद्रकांत पारधी यांनी विश्वजीत चंद्रकांत पारधी, सुजल चंद्रकांत पारधी यांच्यासाठी १२ जून रोजी जातीचा दाखला काढण्यासाठी सेतू केंद्रातून पावती घेतली. यावेळी ४५ दिवसानंतर दाखला मिळेल असे पावतीवर लिहिले आहे.

मात्र शंभर दिवस उलटून गेले तरी देखील त्यांना जातीचा दाखला मिळाला नाही. दाखला मिळवण्यासाठी त्यांनी सेतू केंद्रात अनेक फेऱ्या मारल्या. त्यांच्या मुलाच्या शिक्षणासाठी त्यांना जातीचा दाखला हवा आहे. मात्र तो त्यांना मिळाला नाही. ४ महिने उलटून गेले तरी देखील जातीचा दाखला मिळत नसल्याने या आदिवासी विद्यार्थ्यांचे नुकसान होणार आहे.

# भटक्या कुत्र्यांची बाजारात दहशत



## नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण

**। नागोठणे । वार्ताहर ।**

नागोठणे शहरात सर्वत्र मोकाट फिरणाऱ्या भटक्या कुत्र्यांची नागरिकांमध्ये मोठी दहशत निर्माण झाली आहे. टोळी-टोळीने फिरणाऱ्या व रहदारीच्या रस्त्यावरच ठाण मांडून बसणाऱ्या या भटक्या कुत्र्यांमुळे नागरिकांना विशेषत: लहान मुले व महिलांना घराबाहेर पडणेही मुश्कील झाले आहे.

सध्या तर या भटक्या कुत्र्यांची नागोठणे बाजारपेठेत भटकंती सुरू असल्याने बाजारात दिवाळीनिमित्त खरेदी करण्यासाठी येणारे नागरिक विशेषतः महिलावर्गात भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. त्यामुळे या मोकाट भटक्या कुत्र्यांचा ग्रामपंचायतीने ठोस उपाययोजनेद्वारे बंदोबस्त करावा, अशी मागणी नागरिकांतून होत आहे.

नागोठणे शहरासह परिसरांत या मोकाट, भटक्या कुत्र्यांची संख्या मोठ्या प्रमाणात वाढली आहे. या कुत्र्यांकडून नागोठणे शहरांत लहान मुले, नागरिक यांच्यावर हल्ला चढवून त्यांना जखमी करण्याचे प्रकारही यापूर्वी घडले आहेत. नागोठणे शहरातील अनेक मुख्य रहदारीचे रस्ते, बाजारपेठ, मटण व मासळी बाजार, तसेच अनेक मोक्याच्या ठिकाणी ही भटकी कुत्री मोठ मोठ्या गटाने एकत्रितपणे उभी राहात असल्याने शाळेत जाणारी मुले, बाजारात कामानिमित्त येणारे नागरिक, महिला, सकाळी-संध्याकाळी मोकळ्या हवेत फिरण्यास बाहेर पडणारे वयोवृध्द नागरिक या सर्वांना रस्त्यावरून चालतांना या भटक्या कुत्र्यांच्या भीतीचे व दहशतीचे एक प्रकारचे मोठे दडपण घेऊनच चालावे लागत आहे.

नागोठण्यात या भटक्या कुत्र्यांनी मोठ्या प्रमाणात दहशत निर्माण केलेली असतानाच त्यांच्या निर्बिजीकरणासंदर्भात कोणताही ठोस निर्णय स्थानिक ग्रामपंचायत प्रशासन घेत नसल्याने या भटक्या कुत्र्यांची संख्या दिवसेंदिवस वाढतच आहे. त्यामुळे आता ग्रामपंचायत यावर भविष्यात कोणती ठोस उपाययोजना करते याकडे नागरिकांचे लक्ष लागले आहे.

निवडक

## आदिवासी कुटुंबांचे तोंड गोड

**पनवेल** : दिवाळी हा सण आपापल्या परिस्थितीनुसार नवीन कपडे, दागिने, फराळ या गोष्टींबरोबर साजरा केला जातो. पण काही कुटुंब अशी आहेत कि ते आर्थिक दुर्बलतेमुळे सण साजरा करू शकत नाहीत. यासाठी कामोठेतील एकता सामाजिक संस्था दिवाळीत साहित्याचे वाटप करीत आहे. संतोष ठाकूर यांच्या माध्यमातून पेण तालुक्यातील बोरगावातील खवसवाडी, काजुवाडी, उंबरमाळवाडी आणि केळीचीवाडी या आदिवासी वाड्यातील कुटुंबाना दिवाळीनिमित्त फराळाचे सामान वाटप करण्यात आले.

## निवडणूक अर्ज दाखल

**पनवेल** : विधानसभा पनवेल मतदार संघासाठी सोमवारी शिवसेना उबाठातर्फे लिना गरड यांनी उमेदवारी अर्ज दाखल केला आहे. प्रांताधिकारी तथा निवडणूक निर्णय अधिकारी पवन चांडक यांच्या दालनात हा निवडणूक अर्ज दाखल केला आहे. यावेळी रामदास पाटील यांच्यासह इतर पदाधिकारी, महिला आघाडी, युवा सेना, युवती सेना व शिवसैनिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. हजारो शिवसैनिकांच्या साथीने हा निवडणूक अर्ज दाखल करण्यात आला आहे.

## मोटार सायकलची चोरी

**पनवेल** : शहरातील रामेश्वर मंदिर परिसरात उभी करून ठेवलेली मोटार सायकल अज्ञात चोरट्यांनी चोरुन नेल्याची घटना घडली आहे. शैलेश पंड्या यांनी त्यांची १५ हजार रुपये किंमतीची काळ्या रंगाची हिरो कंपनीची फॅशन प्रो मोटार सायकल (एमएच-४६-वाय-२९५०) ही रामेश्वर मंदिर परिसरात उभी करून ठेवली असता अज्ञात चोरट्यांनी चोरुन नेल्याने याबाबतची तक्रार पनवेल शहर पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे.

## संघर्षग्रस्त बालक ताब्यात

**पनवेल** : शहरातील जोशी आळी परिसरातून एक ॲक्टीव्हा स्कुटी चोरी प्रकरणी विधी संघर्षग्रस्त बालकाला गुन्हे शाखा कक्ष २ पनवेलने ताब्यात घेतले आहे. पनवेल शहरातील सहयोग नगर येथून स्कुटी (एमएच-४६-एडब्ल्यू-१११०) चोरी झाल्याने या चोरीचा तपास पनवेल पोलिसांसह गुन्हे शाखा कक्ष २ पनवेल समांतर तपास करीत असताना तांत्रिक तपासाच्या आधारे त्यांना विधी संघर्षग्रस्त आरोपीची माहिती मिळाली. त्यानुसार त्याला ताब्यात घेतले असून त्याने चोरी केल्याचे निष्पन्न झाले आहे.

## खर्च निरीक्षकपदी नियुक्ती

**पनवेल** : विधानसभा पनवेल मतदार संघासाठी खर्च निरीक्षक म्हणून आयआरएस रमेश कुमार यांची नियुक्ती करण्यात आलेली आहे. निवडणूकीच्या अनुषंगाने नागरिकांना व मतदारांना खर्च निरीक्षक रमेशकुमार यांची भेट घ्यायची असल्यास जेएनपीटी गेस्ट हाऊस येथे रोज सकाळी ९.०० ते १०.०० या वेळेत भेटता येणार आहे. तसेच, त्यांच्याशी दूरध्वनीद्वारे ७७३८२३९७००, ०२२-६७८१४६४३ संपर्क साधावा, असे निर्देश निवडणूक विभागाच्यावतीने देण्यात आले आहेत.

# स्नेहल जगताप यांचा उमेदवारी अर्ज दाखल

## आ. गोगावले यांच्यावर सडकून टीका

**। महाड । वार्ताहर ।**
**१९४ महाड विधानसभा मतदारसंघातील महाविकास आघाडीच्या अधिकृत उमेदवार स्नेहल माणिकराव जगताप यांनी सोमवारी (दि.२८) आपला उमेदवारी अर्ज दाखल केला. यावेळी भव्य रॅली देखील काढण्यात आली. या रॅलीने महाड मधील परिवर्तनाची नांदी व्यक्त केली. तसेच, आ. गोगावले यांच्यावर सडकून टिका देखील केली आहे.**





महाड विधानसभा मतदारसंघांमध्ये महायुतीकडून आमदार भरत गोगावले हे चौथ्यांदा निवडणूक लढवत असून महाविकास आघाडीकडून स्नेहल जगताप यांना तिकीट देण्यात आले आहे. सोमवारी सकाळी स्नेहल जगताप यांनी आपला उमेदवारी अर्ज दाखल केला. यावेळी जोरदार शक्तीप्रदर्शन करत महाड शहरांमधून भव्य रॅली काढण्यात आली होती. संपूर्ण शहरातून काढलेल्या या रॅलीमुळे राजकीय वर्तुळात चर्चा निर्माण झाली आहे. यावेळी शिवसेना ठाकरे पक्षाचे युवा नेते आदित्य ठाकरे, सुभाष देसाई व महाड विधानसभा क्षेत्रातील सर्व पदाधिकारी उपस्थित होते. यावेळी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे आणि तटकरे यांचे निष्ठावंत बाबुशेठ खानविलकर यांनी कार्यकर्त्यांसह शिवसेना ठाकरे पक्षामध्ये प्रवेश केला आहे. त्याचप्रमाणे चंद्रकांत बुवा जाधव यांनी देखील शिवसेना ठाकरे पक्षात प्रवेश केला आहे.

यावेळी बाबुशेठ खानविलकर यांनी आमदार गोगावले यांची गद्दारी मोडीत काढण्यासाठी आपण या पक्षात प्रवेश केला असल्याचे सांगितले. आमदार गोगावले यांची दादागिरी लोकशाही मार्गाने संपवून टाकू, असा इशारा देखील त्यांनी दिला आहे. तर, स्नेहल जगताप यांनी देखील आमदार गोगावले यांचा कार्यप्रणालीवर टीका केली आहे. पाकिटे घेऊन आणि देऊन विकास होत नसतो, असे सांगून महाड विधानसभा क्षेत्रामध्ये परिवर्तन करण्यासाठी आपण उभे असून स्व. माणिकराव जगताप यांची विकासाची स्वप्नपूर्ती करून दाखवू, असे स्नेहल जगताप यांनी स्पष्ट केले आहे.

# हरिहरेश्वर हिट अँड रन प्रकरण

**। श्रीवर्धन । प्रतिनिधी ।**
श्रीवर्धन तालुक्यातील हरिहरेश्वर या पर्यटनस्थळी ममता होम स्टेचे मालक अभी धामणस्कर व त्या ठिकाणी आलेले पर्यटक यांच्यामध्ये रूमच्या भाड्यावरून वाद झाला होता. यामध्ये अभी धामणस्कर यांची बहीण ज्योती धाम णस्कर यांचा मृत्यू झाला होता. सर्व आरोपीं विरोधात सदोष मनुष्यवधाचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

यावेळी ग्रामस्थांनी पकडून दिलेला एक आरोपी व श्रीवर्धन बस स्थानक परिसरात गाडीमधील दोन आरोपी सकाळी आढळून आले. या तिघांना पोलिसांनी अटक केल्यानंतर उर्वरित आरोपी पुणे येथे फरार झाले होते. परंतु, श्रीवर्धन पोलिसांचे पथक त्या ठिकाणी गेले असता ते पुणे येथून फरार झाल्याने पोलिसांना सापडू शकले नव्हते. हे आरोपी काही दिवस पुणे जिल्ह्यातील दौंड येथे गेल्याची बातमी मिळाली होती. पोलिसांनी त्या ठिकाणी देखील शोध घेतला. परंतु, आरोपी तेथून देखील पसार झाले होते.

यानंतर आरोपी इंदापूर व अकोला येथे गेल्याची बातमी पोलीस पथकाला मिळाली होती. याप्रमाणे पोलीस पथकाने इंदापूर व अकोला येथे जाऊन देखील शोध घेतला होता. परंतु, आरोपी सापडून आले नव्हते. मात्र, यानंतर आरोपी हे आपल्या घरी आल्याची खबर पोलिसांना लागल्यानंतर पोलिसांनी या आरोपींना त्यांच्या घरातून ताब्यात घेतले आहे. यामध्ये आकाश राजू उपरवट (२६), सचिन सुभाष जमादार (२७), आलीम मेहबूब नागोर (२२) यांना पोलिसांनी ताब्यात घेऊन श्रीवर्धन या ठिकाणी आणले आहे.

# थोरवेंकडून निवडणूक आचारसंहिता भंग

**। नेरळ । प्रतिनिधी ।**
कर्जत विधानसभा निवडणुकीत महायुतीचे उमेदवार महेंद्र थोरवे हे २९ ऑक्टोबर रोजी नामांकन अर्ज दाखल करणार आहेत. उमेदवाराचे छायाचित्र असलेल्या साड्यांच्या पिशव्या मतदारांना देण्यात येत असल्याचे व्हिडिओ समाज माध्यमांवर व्हायरल झाले असून त्याबाबत अपक्ष उमेदवार यांचे प्रतिनिधी केतन बेलोसे यांनी तक्रार दाखल केली आहे.कर्जत विधानसभा निवडणूक निर्णय अधिकारी यांच्याकडे तशी तक्रार दाखल करण्यात आली आहे.

कर्जत विधानसभा म तदारसंघात सध्या रणधुमाळी सुरू आहे. महायुतीचे उमेदवाराकडून आचारसंहिता भंग केल्याची तक्रार निवडणूक आयोगाकडे करण्यात आली आहे. शिवसेना पक्षाच्या उमेदवाराचा निवडणूक अर्ज भरण्याच्या दिवशी जोरदार शक्तीप्रदर्शन करण्याची जय्यत तयारी सध्या सुरु आहे. याच अनुषंगाने यावेळी महिला वर्गाने जास्तीत जास्त प्रमाणात सहभाग घ्यावा, यासाठी मतदारसंघामध्ये महिलांना साडी वाटप करण्यात येत आहेत. त्याबद्दल केतन बेलोसे यांनी एक व्हिडिओ आणि आपली तक्रार निवडणूक निर्णय अधिकारी यांच्याकडे दाखल केली आहे.



राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे माजी पदाधिकारी आणि सामाजिक कार्यकर्ते केतन बेलोसे यांनी सदर तक्रार निवडणूक निर्णय अधिकारी यांच्याकडे लेखी स्वरुपात दाखल केली आहे. या तक्रारीसोबत त्यांनी एक व्हिडीओ जोडला आहे. या व्हिडीओ मध्ये, महायुतीच्या उमेदवाराचा फोटो आणि पक्षाचं चिन्ह लावलेल्या प्लास्टिकच्या पिशव्यांमध्ये साड्या ठेवण्यात आल्याचे स्पष्टपणे दिसत आहे. या साड्यांसोबत एक स्टीकर आहे आणि त्यावर ''आपल्या दुसऱ्या विकासपर्वाचे भागीदार व्हा, उमेदवारी अर्ज भरायला माझ्या सोबत चला'' असा मजकूर लिहिला आहे.आपल्या तक्रारीमध्ये केतन बेलोसे यांनी, ही घटना लोकशाहीला काळिमा फासणारी आहे, असे म्हटले आहे. तसेच सर्व प्रकरणाची चौकशी करून तत्काळ कार्यवाही करण्यात यावी असे निवेदन त्यांनी निवडणूक आयोगाला केले आहे.विधानसभा निवडणुकीची तारीख जाहीर झाल्यापासून राज्यात आदर्श आचारसंहिता लागू करण्यात आली आहे. आचारसंहिता लागू झाल्यानंतर आपल्या पक्षाचा प्रचार-प्रसार करने आणि मतदारांना आमिष दाखवणंहे आचारसंहिता भंग सम जला जातो.याबद्दल महायुतीचे उमेदवाराकडून मतदारांना भेटवस्तूंचे आमिष दाखवून आचारसंहिता भंग केल्याचा आरोप करण्यात आला आहे.

## पनवेलमध्ये उमेदवारी अर्ज दाखल

**। पनवेल । विशेष प्रतिनिधी ।**
उबाठा गटाकडून माजी नगरसेविका लीना गरड यांनी आपल्या समर्थकांसोबत सोमवारी (दि.२८) आपला उमेदवारी अर्ज दाखल केला. गरड यांच्यासोबत भाजपचे आमदार प्रशांत ठाकूर यांनी देखील अर्ज दाखल केला असून, अपक्ष म्हणून निवडणूक रिंगणात उतरलेले कांतीलाल कडू यांनी देखील आपला अर्ज दाखल केला आहे. यावेळी अपक्ष म्हणून उमेदवारी अर्ज दाखल केलेल्या कांतीलाल कडू यांनीदेखील अर्ज दाखल करण्यापूर्वी आपल्या समर्थांकांची रॅली शहरातून काढली होती. कडू यांची रॅली प्रांत अधिकारी कार्यालयाजवळ येताच तिथे आधीच उपस्थित असलेले भाजप समर्थक आणि कडू समर्थक यांच्यात घोषणाबाजी

# तरुण उमेदवारांना पसंती

**। मुरूड-जंजिरा । वार्ताहर ।**
महाराष्ट्राच्या विधानसभा निवडणुकीत उमेदवारी अर्ज भरण्याची प्रक्रिया सुरू आहे. सर्व राजकीय पक्षात उमेदवारी अर्ज दाखल करण्यासाठी चढाओढ पहायला मिळत असून अनेक ठिकाणी बंडखोरी देखील होत आहे. यामुळे सर्वच राजकीय पक्षात घमासान आहे. तसेच, राजकीय पक्षांनी शहरांपेक्षा ग्रामीण भागांवर अधिक लक्ष केंद्रित केले असून काही ठिकाणी आश्वासनांची खैरात केली जात असल्याचे दिसत आहे. परंतु, यावेळी तरुण उमेदवारांना अधिक प्राधान्य देणार असल्याची प्रतिक्रिया ग्रामीण भागतुन येत आहेत.

आजच्या काळात तेच तेच उमेदवार स्वीकारायला नवीन पिढी तयार नाही असे स्पष्ट दिसून येत आहे. तरुण पिढीला सोशल मीडियामुळे आधुनिक भारताच्या विकासाची पाळेमुळे कळत आहेत. अनुभवी नेत्यांनी सल्लागार म्हणून मार्गदर्शन करताना नव्या पिढीकडे सूत्रे सोपवण्यात यावी, असे तरुण पिढीला वाटत आहे. जनमताचा कौल महत्वाचा असल्याने प्राप्त परिस्थितीला जो पक्ष एकूणच विचार स्वीकारून करुन सामोरा जाईल तो भविष्यात यशस्वी होईल, अशा चर्चा होत आहेत.

तसेच, निर्भीड, सचोटी, धडाडीने कार्य करणाऱ्या सुशिक्षित महिला राजकारणात आल्या पाहिजेत, असे मत सर्वत्र ऐकायला मिळत आहे. भारताच्या स्वातंत्र्य पूर्व काळात किंवा स्वातंत्र्य मिळाल्यानंतर अनेक महिलांनी राजकारणात अनेक पदे भूषविली आहेत. करवीर निवासिनी ताराऊ, अहिल्याबाई होळकर, राणी लक्ष्मीबाई, कीतूरची राणी चलम्मा स्वातंत्र्य प्राप्तीनंतर भारतीय राजकारणातील नेत्या इंदिरा गांधी, सुषमा स्वराज, शालिनीत पाटील, ममता बॅनर्जी, प्रतिभा पाटील, सुप्रिया सुळे, वसुंधरा राजे सिंदिया, मायावती, जयललिता, शीला दीक्षित, मिनाक्षी पाटील अशा अनेक महिलांनी राजकारणात येऊन प्रभावीपणे समाजकारण यशस्वी केलेले आपण पाहिले आहे. नवीन पिढी देखील त्याचे अवलोकन करीत महत्व ओळखून आहे.

राजकारणात महिलेला प्रतिनिधित्व करण्याची संधी मिळाली तर ती ध्येय गाठून संधीचं सोनं करेल एवढी महिलांचा आत्मविश्वास आणि जिद्द नक्कीच आहे, अशा प्रतिक्रिया शहरी, ग्रामीण भागातील महिलांनी व्यक्त केल्या आहेत.

# कर्जतमध्ये महायुतीत बंडखोरी

**। नेरळ । प्रतिनिधी ।**
कर्जत विधानसभा मतदारसंघात महायुतीमध्ये बंडखोरी झाली असून भाजपचे निवडणूक प्रमुख किरण ठाकरे यांनी बंडखोरी करीत अपक्ष म्हणून अर्ज दाखल केला आहे. तर शिवसेना उबाठा पक्षाचे नितीन सावंत यांनी प्रचंड शक्ती प्रदर्शन करीत अर्ज दाखल केला आहे. मात्र, कर्जत विधानसभा मतदारसंघातील तुल्यबळ अपक्ष उमेदवार सुधाकर परशुराम घारे यांचे नामसाधर्म्य असलेले सुधाकर घरे हे अपक्ष उमेदवार जालना जिल्ह्यातून आयात करण्यात आले आहेत. कर्जत विधानसभा मतदारसंघात शिवसेना पक्ष आणि महायुतीचे उमेदवार महेंद्र थोरवे यांचा नामांकन अर्ज त्यांच्या



नामांकन अर्जाचे सचिव हर्षद विचारे यांनी सादर केला. यानंतर शिवसेना उबाठा पक्षाचे उमेदवार नितीन नंदकुमार सावंत यांनी तालुका प्रमुख उत्तम कोळंबे यांच्यासोबत येत नामांकन अर्ज दाखल केला. यानंतर नितीन सावंत हे महाविकास आघाडीच्या नेत्यांच्या आणि हजारो समर्थक यांच्यासोबत शक्तिप्रदर्शन करीत नामांकन अर्ज दाखल करण्यासाठी निवडणूक निर्णय अधिकारी यांच्या दालनात पोहचले. सकाळी कर्जत शहरातील रॉयल गार्डनमध्ये जाहीर सभा घेत निवडणूक लढविण्याचे स्पष्ट करीत किरण ठाकरे यांनी भारतीय जनता पक्षाच्या कार्यकर्त्यांसह अर्ज दाखल केला. यावेळी किरण खंडू ठाकरे यांनी महायुतीत बंडखोरी करत भारतीय जनता पक्षाचे उमेदवार म्हणून तसेच अपक्ष उमेदवार असे दोन अर्ज दाखल केले आहेत. यामुळे कर्जतमध्ये महायुतीत बिघाडी झाल्याच्या चर्चा आता रंगू लागल्या आहेत.

## मनोहर भोईर यांचा अर्ज दाखल

**। चिरनेर । प्रतिनिधी ।**
मविआचे शिवसेना ठाकरे गटाचे उमेदवार माजी आ. मनोहर भोईर यांनी सोमवारी (दि.२८) आपला उमेदवारी अर्ज दाखल केला. यावेळी मोठ्या संख्येने पदाधिकारी, कार्यकर्ते उपस्थित होते. जसखार येथील रत्नेश्वरी देवीच्या मंदिरात रत्नेश्वरी देवीचे दर्शन घेत, घोषणांच्या निनादात मिरवणूक काढण्यात आली. शेकापचे राजेंद्र पाटील, सुधाकर पाटील, शरद पवार गटाच्या भावना घाणेकर, कॉ. मधुसूदन म्हात्रे, सुधाकर पाटील आदींनी भोईर यांना पाठींबा दिला आहे. नरेश रहाळकर, संतोष ठाकूर, दिनेश पाटील, भास्कर मोकल बी.एन. डाकी, रुपेश पाटील, धनेश ठाकूर तसेच आघाडीचे अन्य कार्यकर्ते उपस्थित होते.

# विचारांची मशाल पेटणार

## विरोधकांची झोप उडणार : स्नेहल जगताप

**। महाड । प्रतिनिधी ।**
महाड तालुक्यातील सांदोशी व आमडोशी गावातील नागरिकांनी स्व. मा. आ. माणिकराव जगताप यांनी केलेल्या विकास कामांची पोचपावती म्हणून शिवसेना ठाकरे पक्षाच्या उमेदवार स्नेहल जगताप यांच्या विचारांवर प्रेरित होऊन रविवारी (दि.२७) ठाकरे गटात पक्ष प्रवेश केला आहे. यावेळी बोलताना सुभाष मोरे यांनी स्वर्गीय माणिकराव जगताप यांच्या काळातच सांदोशी खोऱ्याचा खऱ्या अर्थाने विकास झाला आहे. विरोधकांनी कितीही थापा मारल्या तरी या गावातील असंख्य ग्रामस्थ शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाच्या पाठीशी ठाम असल्याची ग्वाही त्यांनी दिली आहे.



महाड तालुक्यातील अनेक गावांचे पक्ष प्रवेश झाले असून विचारांची मशाल पेटणार, विरोधकांची झोप उडणार असल्याचे प्रतिपादन स्नेहल जगताप यांनी केले आहे. यावेळी शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाच्या उमेदवार स्नेहल जगताप, महाड विधानसभा नेते हनुमंत जगताप, विधानसभा संपर्क प्रमुख अमित मोरे, आशिष फळसकर, रघुवीर देशमुख, सुभाष मोरे, राजु कोरपे, सरपंच चैतन्य म्हामुणकर, किशोर सर्कले, निलेश धुमाळ, प्रफुल्ल धोंडगे, राजू मोरे यांसह विविध पदाधिकारी उपस्थित होते.

यावेळी बबन डावले, विनोद हिरवे, एकनाथ होगाडे, सचिन होगाडे, रामचंद्र होगाडे, बाळाराम ढेपे, आशिष डावले, सतिष डावले, अमित डावले, अजय हिरवे, सुरेश हिरवे, मानू हिरवे, अनिल हिरवे, कोंडीराम होगाडे, लक्ष्मी होगाडे, दर्शन हिरवे, मनिष चव्हाण, शिवाजी गोरे इत्यादी प्रमुखांसह शेकडो कार्यकर्त्यांनी स्नेहल जगताप यांच्या विचारांशी प्रेरीत होऊन शिंदे गटातून शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षात प्रवेश केला आहे.

## कार्यकर्त्यांचा डोळ्यात तेल घालून प्रचार

# समाजमाध्यमांवर निवडणूक फिवर

**। रायगड । प्रतिनिधी ।**
**ग्रामीण भागात होर्डिंग, पोस्टर, बॅनर, प्रचारपत्रक तथा घर चलो अभियानाच्या माध्यमातून मतदारांच्या घरापर्यंत सर्वपक्षीय प्रचारक पोहोचत आहेत. यावेळी प्रथमच विधानसभा निवडणुकीत समाजमाध्यमांचा आक्रमकपणे प्रचारासाठी वापर केला जात आहे. यामुळे प्रत्येकापर्यंत पक्षीय उमेदवाराला पोहोचणे सहज शक्य होत आहे. लोकसभेपेक्षा आताच्या विधानसभा निवडणुकीत हे तंत्र अधिकच प्रभावीपणे वापरले जात आहे. ग्रामीण भागातही समाजमाध्यमांवर निवडणुकीचा फिवर रंगला आहे.**

समाजमाध्यम हे आजकाल सर्वांच्याच ओळखीचे झाले आहे. यामुळे निवडणुकीत या आधुनिक तंत्राचा वापर मोठ्या प्रमाणात होत आहे. काळज्ञनुसार आचारसंहितेचे नियम अधिक कडक झाले आहेत. यामुळे प्रचाराचा कालावधी कमी झाला आहे. पारंपरिक प्रचाराची जागा आता समाजमाध्यमाने घेतली आहे. आदर्श आचारसंहिता लागू होताच विविध पक्षांच्या कार्यकर्त्यांनी समाज माध्यमांवर 'आमचाच नेता आमदार होणार', अशी टॅगलाइन सुरू केली आहे.




निवडणुकांच्या काळात पदयात्रा, मतदारांशी वैयक्तिक संपर्क, चौक सभा यांचे महत्त्व आजसुद्धा कमी झालेले नाही. तथापि, फेसबुक, व्हॉट्सॲप, ट्विटर, इन्स्टाग्राम यांसारख्या माध्यमांतून विधानसभेच्या उमेदवारांचे समर्थक पोस्ट टाकले जात आहेत. समाजमाध्यम म्हणजे प्रत्येक पक्षाच्या उमेदवारासाठी प्रचारदूतच बनला आहे. दिवसरात्र समाजमाध्यमांवर सक्रिय राहत हे प्रचारदूत आपल्या नेत्याचा प्रचार डोळ्यांत तेल घालून करीत आहेत.

## कार्यकर्त्याला दुय्यम वागणूकीची भावना

**काही वर्षांपूर्वी विरोधी गटातील लोकांशी दोन हात करणाऱ्या कार्यकर्त्यांना चांगली किंमत होती. नेत्यांची मर्जी राखण्यासाठी गर्दी जमविण्यापासून पोस्टर चिकटवण्यापर्यंत हरतऱ्हेचे काम करत होते. पण, आता सोशल हँडलर्स नेत्याला समाज माध्यमांवर सक्रीय ठेवत आहेत. तो नेत्याला आणि कार्यकर्त्यांना सल्ला देण्याचे काम करत असतो. यामुळे नेत्यांकडून त्यांना विशेष किंमत दिली जात असल्याने कार्यकर्त्याला दुय्यम वागणूक मिळत असल्याची भावना आहे. यामुळे उमेदवारांसाठी काम करणाऱ्यांमध्ये दोन गट पडले आहेत.**

# कर्जतमध्ये सात अर्ज दाखल

**। कर्जत । प्रतिनिधी ।**
विधानसभा सार्वत्रिक निवडणुकीसाठी नामनिर्देशन भरण्यास दि.२२ ऑक्टोबर पासून सुरुवात झाली आहे. सोमवारी (दि.२८) नामनिर्देशनपत्र दाखल करण्याच्या पाचव्या दिवशी कर्जत विधानसभा मतदासंघात ६ उमेदवारांची ७ नामनिर्देशनपत्र दाखल झाले असल्याची माहिती निवडणूक निर्णय अधिकारी प्रकाश संकपाळ यांनी दिली आहे. यावेळी महेंद्र सदाशिव थोरवे (शिवसेना), नमिता सुधाकर घारे (अपक्ष), किरण खंडू ठाकरे (भारतीय जनता पार्टी), किरण खंडू ठाकरे (अपक्ष), नितीन नंदकुमार सावंत (उबाठा), श्रीराम बळीराम महाडिक (बहुजन समाज पार्टी), सुधाकर यादवराव घारे (अपक्ष) असे एकूण सात जणांनी नामनिर्देशनपत्र दाखल केले आहेत.

विधानसभा मतदारसंघात नामनिर्देशन पत्र भरण्याची प्रक्रिया सुरु असून दि.२९ऑक्टोबर ही शेवटची तारीख आहे. या सर्व अर्जाची दि. ३० ऑक्टोबरला छाननी करण्यात येणार असून दि.४ नोव्हेंबर रोजी अर्ज मागे घेता येणार आहे. मतदान दि.२० नोव्हेंबरला होत असून दि.२३ नोव्हेंबर रोजी मतमोजणी होणार आहे.

# रांची-लखनौची सुचिन्हे

महाराष्ट्रासोबत झारखंडमध्येही निवडणुका होत आहेत. शिवाय उत्तर प्रदेशासह काही ठिकाणी पोटनिवडणुकांचे मतदान होणार आहे. लोकसभा निवडणुकांमध्ये या सर्वच ठिकाणी भाजपला झटका बसला होता. उत्तर प्रदेशात तर भाजप समाजवादी पक्षाच्या मागे राहिला होता. जनता मोदींच्या विरोधात व विरोधकांच्या बाजूने उभी राहिली होती. हे वातावरण विरोधक टिकवू शकतील का हा महत्वाचा प्रश्न आहे. लोकसभेनंतर इंडिया आघाडी काहीशी विस्कळित झाली. हरियाणा निवडणुकीत आघाडीला तडे गेले. काँग्रेसने बरेच प्रयत्न केले. मात्र आम आदमी पक्षाने वेगळी चूल मांडली. त्याचा दणकून फटका आपलाच बसला व तो पक्ष साफ झाला. समाजवादी व इतर पक्षही वेगळे राहिले. काश्मीरमध्ये पीडीपीवर जवळपास बहिष्कार टाकला गेला. त्याचा फार फटका बसला नाही. मात्र काँग्रेसला जम्मूमध्ये कामगिरी उंचावता आली नाही. झारखंड विधानसभेत काँग्रेस दुय्यम पक्ष आहे. झारखंड मुक्ती मोर्चासोबत तो सत्तेत आहे. मात्र या दोन्ही पक्षांच्या जागावाटपामध्ये बऱ्याच अडचणी आल्या. एकूण ८१ जागा आहेत. मात्र काही ठिकाणी मैत्रीपूर्ण लढती होतील तर अन्य काही ठिकाणी बंडखोरी होईल. हेमंत सोरेन यांना मोदी-शाह यांच्या पोलिसांनी खुनशीपणा करून भ्रष्टाचाराच्या प्रकरणात अडकवले. मुख्यमंत्रिपदी असताना अटक केली असे देशातले ते पहिले उदाहरण. सोरेन आठ महिने तुरुंगात राहिले. या दरम्यान भाजपने त्यांचा पक्ष फोडण्याचे प्रयत्न केले. त्याला थोडेफार यश आले. हेमंत यांच्या अनुपस्थितीत ज्यांना मुख्यमंत्री करण्यात आले होते ते चंपई सोरेन आता नाराज होऊन भाजपच्या वळचणीला गेले आहेत. हेमंत तुरुंगातून बाहेर आल्यानंतर चंपई यांना राजीनामा देण्यास जवळपास भाग पाडण्यात आले. याचा फायदा भाजपने उठवला. आता भाजपचे बहुमत आले तर चंपई मुख्यमंत्री झाले तरी आश्चर्य वाटायला नको. जे चंपई कालपर्यंत झारखंड मुक्ती मोर्चाच्या शिबू सोरेन यांचे अत्यंत जवळचे व म्हणून भाजपचे विरोधक होते ते आता भाजपला प्यारे झाले आहेत.

### भाजपची घराणेशाही

पण यात नवल काही नाही. भाजपची ही सर्व देशातील रणनीती आहे. चंपई यांना काही काळ मोठे करून नंतर बाजूला फेकले जाईल. हेमंत सोरेन यांना अटक केल्यामुळे त्यांच्याबाबत सहानुभूती आहे. त्याचा फायदा होऊन त्यांना बहुमत मिळेल अशी सर्वसाधारण भावना आहे. मात्र प्रचंड पैसा व आयात उमेदवार यांच्या जोरावर भाजप बाजी पलटवू शकतो. भ्रष्टाचाराच्या आरोपाखाली तुरुंगवास झालेले माजी मुख्यमंत्री मधू कोडा यांच्या पत्नी गीता कोडा यांना भाजपने तिकिट दिले आहे. याच रीतीने त्यांनी झारखंड मुक्ती मोर्चा व काँग्रेसमधून लोक आयात केले आहेत. अशा वेळी भाजपला नीतीतत्वे, भ्रष्टाचाराविरुध्दची लढाई इत्यादींचा सोईस्कर विसर पडतो. महाराष्ट्रात आपण हे रोज पाहतो आहोतच. ज्या काँग्रेसच्या अशोक चव्हाणांच्या आदर्श घोटाळ्याबाबत इतकी बोंबाबोंब केली त्यांच्याच मुलीला आता भाजपने उमेदवारी दिली आहे. राज्यात बहुतेक ठिकाणी पराभवाच्या भीतीने जुनेच उमेदवार कायम ठेवण्यात आले आहेत. काँग्रेसच्या घराणेशाहीच्या विरोधात मोदी बोलतात. आपल्या नाकाला लागलेली घाण इतरांना दिसत नाही असा त्यांचा समज असावा. माजी मुख्यमंत्री रघुवर दास यांची सून पूर्णिमा साहू तसेच माजी केंद्रीय मंत्री अर्जुन मुंडा यांची पत्नी मीरा मुंडा, चंपई सोरेन यांच्यासोबतच त्यांचा मुलगा बाबूलाल सोरेन यांनाही उमेदवारी मिळाली आहे. शिबू सोरेन यांची मोठी सून सीता सोरेन हिला भाजपने आधीच फोडले होते व तिला आता जमताडामधून तिकिट मिळाले आहे. एकूण फोडाफोडी करायची आणि भाजपचा विजय झाला असे दाखवायचे हे सगळीकडचे धोरण आहे. कर्नाटकात अवघ्या तीन जागी पोटनिवडणुका आहेत. पण त्यातील दोनवर भाजपचे उमेदवार घराणेदार आहेत. माजी मुख्यमंत्री बसवराज बोम्मई यांची खासदार म्हणून निवड झाल्याने त्यांच्या जागेवर आता पोटनिवडणूक होणार आहे. तिथे बसवराज यांचा मुलगा भारत याला उमेदवारी देण्यात आली आहे. शिवाय चन्नपाटण मतदारसंघात माजी मुख्यमंत्री कुमारस्वामी यांचे चिरंजीव निखिल यांना भाजप आघाडीतर्फे उतरवण्यात आले आहे.

### काँग्रेसची चांगली चाल

तिकडे उत्तर प्रदेशात योगी आदित्यनाथांची अस्तित्वाची लढाई सुरू आहे. लोकसभेला हरल्यानंतर योगींना हटवण्याची मोहिम तीव्र झाली होती. त्यांच्याच सरकारातले उपमुख्यमंत्री जाहीर मेळावे घेऊ लागले होते. मोदी व शाह यांची फूस असल्याखेरीज हे घडणे अशक्य होते. पण भाजप कार्यकर्त्यांमध्ये योगींची लोकप्रियता अधिक आहे. त्यामुळे शेवटी त्यांना आणखी एक संधी दिली गेली. आता उत्तर प्रदेशात नऊ पोटनिवडणुका होणार आहेत. त्या जिंकणे हा योगींसाठी जीवनमरणाचा प्रश्न निर्माण झाला आहे. त्यातच काँग्रेसने कधी नव्हे तो वेगाने व अचूक निर्णय घेतला आहे. त्यांनी या सर्व नऊ जागांवर समाजवादी पक्षाला पाठिंबा देण्याचे जाहीर केले आहे. आधी या जागांचे वाटप करण्याबाबत चर्चा सुरू होत्या. त्यात साहजिकच काही तणाव होते. पण बहुदा हरियाणातील निवडणुकांनंतर सावध झालेल्या काँग्रेसने निवडणुकीतून अंग काढून घेऊन भाजप विरुध्द समाजवादी अशा थेट लढतीचा मार्ग मोकळा केला आहे. लोकसभेप्रमाणे आता यावेळीही अखिलेश यादव योगींना वरचढ ठरतात का हे पाहावे लागेल. गंमत म्हणजे लोकसभेला महाराष्ट्राप्रमाणेच मोदींनी उत्तर प्रदेशातही तुफानी सभा घेतल्या होत्या. पण बहुतेक सर्व जागी भाजपला पराभव पत्करावा लागला होता. त्यामुळे आता या पोटनिवडणुकांसाठी मोदी, शाह किंवा अन्य केंद्रीय नेत्यांना प्रचारासाठी न बोलावण्याचा निर्णय योगींनी घेतला आहे. एका अर्थाने भावी संकटातून त्या नेत्यांना वाचवण्याचा प्रकार म्हणायला हवा. कदाचित मोदी व शाह यांनीच बहुदा तसे जाहीर करण्याचा आदेश योगींना दिला असेल. या निवडणुकीतील यशापयश हे योगींचे असेल. योगी अपयशी ठरले तर त्यांना घालवण्याच्या हालचाली पुन्हा सुरू होतील. इंडिया आघाडी एकसंध लढून रांची आणि लखनौवर कबजा करण्यास उत्सुक आहे हे शुभचिन्ह आहे.

विचार

# आसाम करार- महत्वाचा निवाडा

***१९८५ मध्ये आसाम कराराच्या निमित्ताने अस्तित्वात आलेले, बेकायदा स्थलांतराच्या समस्येवर आधारित असलेले कलम - ६ अ अखेर सर्वोच्च न्यायालयाने वैध ठरवले. स्थलांतरितांची देशातील सर्वात जास्त लोकसंख्या असलेल्या, आसाम आणि पश्चिम बंगाल राज्यांच्या दृष्टीने हा महत्वाचा निर्णय म्हणावा लागेल. कारण यामुळे देशात बेकायदेशीरपणे राहणाऱ्यांची ओळख करायच्या कामाला गती येईल.***



**शंतनु चिंचाळकर**

आसाममधील नागरिकत्वाच्या प्रश्नावर देशभर बरीच चर्चा झाली. बांगलादेशमधून प्रचंड संख्येने भारतात शिरणाऱ्या घूसखोरांच्या समस्येने मोठी अस्वस्थता निर्माण केली. हा प्रश्न गेल्या अनेक वर्षांपासून चर्चेत असल्याने कोणता पक्ष रास्त आहे, यावरुन बऱ्याच चर्चा झडल्या. त्याला हिंदू विरुध्द मुस्लिम संघर्षाचाही कंगोरा होता. याच प्रश्नावरुन आसाम सन्मिलित महासंघ आणि इतर स्वयंसेवी संस्थांनी नागरिकत्व कायद्याच्या कलम ६ ला विरोध केला आणि सर्वोच्च न्यायालयात आव्हान दिले. ही याचिका निकाली काढताना सर्वोच्च न्यायालयाने कायद्याची वैधता उचलून धरल्याने एक म हत्वाचा निर्वाळा मिळाला.

भारताची राज्यघटना १९५० मध्ये लागू झाली. त्यात प्रस्तावना आणि ४७० कलमे आहेत, जी २२ भागांमध्ये गटबद्ध आहेत. संविधानाच्या भाग २ मध्ये कलम ५ समाविष्ट आहे. त्यात नागरिकत्वाबद्दल स्पष्ट निकष विषद केले आहेत. भारत आणि पाकिस्तान यांच्यातील फाळणीच्या वेळी पाकिस्तानमधून भारतात स्थलांतरित झालेल्या व्यक्तींच्या नागरिकत्वाबद्दल काही अर्हता नमूद करण्यात आल्या आहेत. घटनेच्या कलम ६ मधील तरतुदीनुसार पाकिस्तानमधून भारताच्या हद्दीत स्थलांतरित झालेली व्यक्ती भारताची नागरिक मानली जाईल, असे म्हटले आहे. अर्थात देशाच्या इतर काही भागांमध्ये या पलिकडे काही प्रश्न उभे राहिले आहेत. उदाहरणादाखल आसामकडे पाहता येते. आसाममध्ये राहणाऱ्या बेकायदेशीर बांगलादेशी स्थलांतरितांची ओळख पटवण्याच्या आणि त्यांच्या हद्दपारीच्या प्राथमिक मागणीसाठी आसाममधील विद्यार्थ्यांचे सहा वर्षे (१९७९-१९८५) आंदोलन चालले होते. ऑल आसाम स्टुडंट्स युनियन आणि ऑल आसाम गणसंग्राम परिषद यांच्या नेतृत्वाखाली हे अहिंसक आंदोलन सुरू झाले होते. नंतरच्या टप्प्यात त्याला हिंसक वळण लागले. त्यावेळी केंद्र सरकार, आसाम सरकार आणि आंदोलनकर्त्यामध्ये झालेल्या करारातील कलम-५ नुसार जानेवारी १९६६ ते मार्च १९७१ दरम्यान भारतात आलेल्यांची ओळख निश्चित केली जाणार होती. त्यानंतर आलेल्यांचे भारतातील वास्तव्य बेकायदा ठरवून भारताबाहेर पाठवण्यात येणार होते. एका माहितीनुसार केवळ आसाम आणि पश्चिम बंगालमध्ये मिळून ९५ लाखांच्या आसपास बेकायदा स्थलांतरित आहेत. त्यामुळे या प्रश्नाकडे अवघ्या देशाचे लक्ष वेधले गेले होते. १ जानेवारी १९६६ पूर्वी बांगलादेशमधून आसाममध्ये प्रवेश केलेल्या सर्व स्थलांतरितांना कलम ६अ (२) नुसार नागरिकत्व दिले गेले आहे. पुढे, त्यात नमूद करण्यात आले आहे की १ जानेवारी १९६६ ते २४ मार्च १९७१ दरम्यान आसाममध्ये प्रवेश केलेल्या स्थलांतरितांना दहा वर्षांसाठी मतदानाचा विशेषाधिकार नसताना भारतीय नागरिक मानले गेले. नागरिकत्वाची वैधता ठरवण्यासाठी १९ जुलै १९४८ ही कट ऑफ तारीख निश्चित केली गेली होती. कलम ६ मधील तरतुदीनुसार एखाद्या व्यक्तीने दोन अटींचे पालन केल्यास भारताच्या हद्दीत स्थलांतरित झालेला परदेशी भारताचा नागरिक असल्याचे समजले जाईल. भारत सरकार कायदा, १९३५ नुसार ती व्यक्ती स्वत: किंवा तिचे आई-वडील किंवा आजी-आजोबा भारतात जन्मलेले असणे अपेक्षित आहे. संबंधित व्यक्तीने १९ जुलै १९४८ पूर्वी स्थलांतर केले असेल आणि २६ जानेवारी १९५० रोजी भारतीय राज्यघटना अंमलात येण्यापूर्वी नागरिकत्वासाठी अर्ज केला असेल तर भारतीय नागरिकत्व मिळेल, असे हे दोन मुद्दे.

आसाम सन्मिलित महासंघ आणि इतर स्वयंसेवी संस्थांनी नागरिकत्व कायद्याच्या कलम ६ ला विरोध केला. त्याला सर्वोच्च न्यायालयात आव्हान देताना युक्तिवाद केला की, कलम ६ असंवैधानिक आणि भेदभावपूर्ण आहे आणि ते आसामी लोकांच्या सांस्कृतिक, भाषिक आणि राजकीय हक्कांचे संरक्षण करण्याच्या अधिकाराचे उल्लंघन करते. त्यांनी युक्तिवाद केला की या तरतुदीमुळे अवैध स्थलांतरितांचा ओघ वाढला. त्यामुळे राज्याच्या आर्थिक आणि विकासात्मक उद्दिष्टांवर ताण आला. निवाड्याप्रसंगी न्यायमूर्ती धनंजय चंद्रचूड यांनी कलम २९ अंतर्गत याचिकाकर्त्यांचे दावे नाकारले, जे वांशिक आणि सांस्कृतिक अल्पसंख्याकांच्या हक्कांचे रक्षण करते. त्यांनी नमूद केले की आसाममध्ये विविध जातीय गटांची उपस्थिती कलम २९(१) चे उल्लंघन केल्याचा दावा करण्यासाठी अपुरी आहे. कलम २९ लागू करण्यासाठी याचिकाकर्त्यांना हे सिद्ध करावे लागेल की जातीय समूह यापुढे दुसऱ्या गटाच्या उपस्थितीमुळे आपली संस्कृती किंवा भाषा संरक्षित करू शकत नाही. निवाडा करणारे अन्य न्यायमूर्ती कांत यांच्या मते याचिकाकर्ते आसामी संस्कृतीवर कृतीयोग्य प्रभाव दाखवण्यात किंवा कलम ६ चा त्यांना अपेक्षित असा अन्वयार्थ लावण्यात अयशस्वी ठरले आहेत.

सर्वोच्च न्यायालयात युक्तिवाद करताना याचिकाकर्त्यांनी म्हटले की, कलम ६ मुळे आसाममध्ये मोठ्या प्रमाणात स्थलांतरित येण्यास मदत होते. कारण ही तरतूद केव्हा संपली याची कोणतीही अंतिम तारीख नाही. पुढील तरतुदीमध्ये नमूद केलेल्या तारखांच्या आधी एखादी व्यक्ती किंवा त्यांचे पालक किंवा त्यांचे आजी-आजोबा आसाममध्ये स्थलांतरित झाले आहेत की नाही, याची पडताळणी करण्यासाठी त्या ठिकाणी असलेल्या यंत्रणा पुरेशा मजबूत नाहीत. परिणामी, त्यांनी असा युक्तिवाद केला की मोठ्या प्रमाणात स्थलांतरण झाल्यामुळे आसामची लोकसंख्या आणि संस्कृती प्रभावित झाली. घटनेच्या कलम २९ अंतर्गत त्यांच्या सांस्कृतिक अधिकारांचे उल्लंघन झाले. शेवटी, त्यांनी युक्तिवाद केला की आसामला इतर राज्यांमधून वेगळे करण्याची तरतूद घटनेच्या कलम १४ चे उल्लंघन करते. न्यायालयाने दिलेल्या निवाड्यानुसार २५ मार्च १९७१ पूर्वी भारतात स्थलांतरित झालेल्यांना नागरिकत्वासाठी अर्ज करता येतील. त्याद्वारे बेकायदेशीरपणे भारतात राहणाऱ्यांची ओळख करता येईल. त्याच्या जोडीला या प्रक्रियेद्वारे भारतातील प्रत्येक व्यक्तीच्या नागरिकत्वाची स्थिती त्यांनी प्रदान केलेल्या कागदपत्रांच्या आधारे तपासणे सोपे जाईल. आसाममध्ये प्रथम ही चाचणी घेण्यात आलेल्या ठिकाणी १.९ दशलक्ष लोकांना नागरिक म्हणून वगळण्यात आले होते. यावरून भारतात बेकायदेशीर वास्तव्य करणाऱ्यांच्या संख्येचा अंदाज येऊ शकतो.

राजघटनेच्या कलम ६अ द्वारे १९७१ च्या पाकिस्तानसोबतच्या युद्धादरम्यान बांगलादेशमधून आसाममध्ये स्थलांतरित झालेल्या बेकायदेशीर स्थलांतरितांची ओळख होते. हा आसाममधील एक संवेदनशील मुद्दा आहे, कारण देशाच्या पूर्व सीमेवरून मोठ्या प्रमाणात लोक घुसखोरी करत असल्यामुळे आसामी संस्कृती नष्ट होत चालली आहे. सुप्रीम कोर्टाच्या या महत्वाच्या निर्णयाचे संपूर्ण देशातून स्वागत केले जात आहे. मुख्य कलम ६ अ द्वारे बेकायदेशीरपणे भारतात राहणाऱ्या बंगलादेशी नागरिकांची ओळख पटवणे आता सोपे झाले आहे. कायदा राबवण्याचा पाया म्हणून कलम ६ अ च्या वैधतेच्या निकालाकडे पाहिले जाईल. या निकालाचा काय परिणाम होणार याची लागलीच चर्चा सुरू झाली आहे. १९८५ मधील आसाम रेकॉर्ड आणि नागरिकता कायद्याचे कलम ६ सर्वोच्च न्यायालयाने ४:१ अशा बहुमताने योग्य ठरवले आहे. त्यानुसार, १ जानेवारी १९६६ ते २५ मार्च १९७१ दरम्यान पूर्व पाकिस्तानमधून (आताचे बांगलादेश) आसाममध्ये आलेल्या निर्वासितांची नागरिकता कायम असणार आहे. त्यानंतर आलेले लोक मात्र बेकायदेशीरपणे भारतात आल्याचे सिध्द होईल. त्यामुळे त्यांना बांगलादेशमध्ये परत पाठवले जाईल. आसाममध्ये राहणाऱ्या एका वर्गाला बंधुत्वाचे तत्त्व निवडकपणे लागू केले जाऊ शकत नाही, असे पाच न्यायाधीशांच्या खंडपीठाचे प्रमुख मत लिहिणारे न्यायमूर्ती सूर्यकांत यांनी म्हटले. एकंदरीत, या निकालामुळे एक बहुचर्चीत आणि नागरिकत्वाच्या प्रश्नाचे विविध कंगोरे स्पष्ट करणारे प्रकरण निकाली निघाले आहे.

आजकाल

# बोनस मिळणे न मिळणे- एक अन्वयार्थ



**संजीव चांदोरकर**

काही दशकांचा काळ होता ज्यावेळी वर्षाच्या याच काळात, देशातील औद्योगिक कामगारांना त्यांच्या हक्काचा बोनस जाहीर व्हायचा; मुंबई मध्ये कामगार वस्त्या मध्ये हा: विषय फक्त कामगारांमध्ये नाही तर स्त्रिया, घराघरात घुमायचा. अनेक दिवसांचे प्लॅन्स पुनर्जीवित व्हायचे.

खूप पाणी वाहून गेले आहे आणि त्यात बोनस हा शब्द देखील वाहून गेला आहे.

पण खरेच वाहून गेला आहे? नाही. त्याने आता नवीन अवतार घेतला आहे. तो आता बोनस कामगार/श्रमिकांना नाही मिळत तर औद्योगिक भांडवलाला मिळतो आणि भांडवलाच्या व्यवस्थापकांना याची मुळे देशाच्या राजकीय अर्थव्यवस्थेत झालेल्या मूलभूत बदलापर्यंत जाऊन भिडतात;

१. भांडवल आणि मानवी श्रम यांच्या संयोगातून तयार झालेल्या वाढाव्यात भांडवलाला आणि मानवी श्रमाला किती वाटा मिळणार या रस्सीखेचीत भांडवलाची सरशी झाली आहे; कारण भांडवलने राजकीय सत्ताधारी आपलेसे केले आहेत;

२. बोनस म्हणजे डिफर्ड वेजेस जाऊद्या, नेहमीचे वेजेस देखील धड दिले जात नाहीयेत. मानवी श्रमांना कमीतकमी मोबदला दिला कि भांडवलावर जास्तीतजास्त परतावा मिळत असतो; त्यामुळे कामगारांना परंपरागत बोनस नाकारला जात आहे.

३. कायम पगारी कामगार हि संज्ञा मोडीत काढली गेली; त्यांच्या कामगार संघटना मोडीत काढल्या. किंवा कमकुवत केल्या; कामगार कायद्यातील सुधारणा, लेबर/मुख्य कोर्टात श्रमिक विरोधी तयार केस लॉ ची तटबंदी केली गेली आहे.

४. आता संघटनेचा अधिकार नसणारे बदली कामगार, आउट सोर्सिंग, सब कॉंट्रॅकींग; कंत्राटी कामगार, आता तर गिग इकॉनॉमी मध्ये प्रत्येक श्रम देणाऱ्यांशी वेगळे ॲग्रिमेंट ;

५. बोनस देण्यामागे औद्योगिक भांडवलाचे देखील हितसंबंध असायचे. कारण कामगार वर्गाची क्रयशक्ती वाढून मागणी वाढायची. आता नागरिकांची क्रयशक्ती कृत्रिमपणे वाढवण्याचे काम मुबलक प्रमाणात उपलब्ध केली गेलेली रिटेल, मायक्रो, अंसिक्यूर्ड कर्जे करत आहेत. म्हणजे वित्त भांडवल तेव्हढे मजबूत झाले आहे. औद्योगिक भांडवलाला पूरक रोल करत आहे.

आता देखील बोनस दिला जात आहे

१. औद्योगिक भांडवल मॅनेज करणारे व्यवस्थापक याना भरघोस परफॉर्मन्स बोनस; ज्याचे आकडे ऐकले कि डोळे विस्फारतील.

त्यातील अजून उच्च पदस्थांना स्टॉक ऑप्शनस; जे विकून ते वार्षिक पगारापेक्षा जास्त मिळकती करू शकतात; लक्षात घ्या मानवी श्रमाला कमी पगार/ किंवा बोनस नाही दिला तर उत्पादन खर्च कमी, म्हणजे नफा जास्त, नफा जास्त म्हणजे अर्निंग पर शेअर जास्त, म्हणजे कंपनीच्या शेअरची किंमत जास्त म्हणजे स्टॉक ऑप्शन्स विकून जास्त पैसे.

२. कमी उत्पादन खर्चातून जास्त नफा, संचित नफा वाढत राहतो, त्यातून गुंतवणूकदारांना म्हणजे वित्त भांडवलाला बोनस शेअर्स दिले जातात.

यासगळ्यात अर्थात औद्योगिक भांडवलाला वित्त भांडवलाची साथ आहे; आता तर भारतीयच नव्हे तर जागतिक.

तरुणांनो, बोनस हे निमित्त आहे.

जल, जंगल, जमीन, खनिजे, नैसर्गिक, वित्तिय म्हणजे अर्थसंकल्पीय साधनसामग्री, तयार होणारा सरप्लस आणि तयार केल्या जाणाऱ्या संध्या यांचे वाटप, त्याच्या यंत्रणा आणि सर्वांत महत्त्वाचे त्या सगळ्याला तोलून धरणारी राजकिय आर्थिक विचारधारा. हा विषयाचा गाभा आहे. तो चिरंतन आहे. राहील. राजकीय अर्थव्यवस्था/ पोलिटिकल इकॉनॉमीकडे बघायचा चष्मा (जो विकत मिळत नाही) कष्टाने चढवलात तर अनेक छोट्या मोठ्या गोष्टींचे अन्वयार्थ लावता येतात; या मोहिमेत सामील व्हा; कोट्यवधी लोकांना अर्थसाक्षर बनवण्याच्या मोहिमेत सामील व्हा; हे काम फक्त समुदायिकपणेच होऊ शकते.

लोकसंसद

## मिठाईतील भेसळीवर नियंत्रण ठेवा



सध्या सर्वत्र दिवाळीची धामधूम सुरू आहे. सर्वात मोठा सण म्हणून दिवाळीला मिठाईची देवाणघेवाण होत असते. सणासुदीच्या दिवसात मिठाईला प्रचंड मागणी असते. त्यामुळेच अनेक दुकानदार भेसळयुक्त मिठाईची विक्री करतात. अन्न प्रशासन विभाग अशा भेसळयुक्त मिठाईच्या दुकानांवर छापे घालत असतात. आताही या विभागाची छापेमारी चालू आहे. या विभागाने ज्या दुकानांतून भेसळयुक्त मिठाई जप्त केली, त्या मिठाईत प्रतिबंधित रासायनिक घटकांचा अंश आढळून आला. काही ठिकाणी भेसळयुक्त खवा जप्त करण्यात आला. सणांच्या दिवसात असे भेसळीचे प्रकार वाढीस लागतात. ग्राहकांच्या आरोग्याचा विचार न करता भरपूर फायदा मिळवण्याच्या हेतूने असे कुप्रकार केले जातात. अन्न प्रशासन विभागाने भेसळयुक्त मिठाई विकणाऱ्या दुकानांवर बारीक लक्ष ठेवावे. ग्राहकांनीही मिठाई खरेदी करताना ताजी व दर्जेदार मिठाई खरेदी करावी. स्वतः चा फायद्यासाठी ग्राहकांच्या आरोग्याशी खेळणाऱ्या या नतद्रष्ट दुकानदारांवर कारवाई व्हायलाच हवी.

**- श्याम ठाणेदार, दौंड**

## मराठी साहित्यिक दिनविशेष

**२९ ऑक्टोबर**

**१८९५ :-** वादविवादपटू, मराठीतील महत्त्वाचे ख्रिस्ती धर्मविवेचक, निबंधकार, संस्कृतचे जाणकार आणि वेद-उपनिषदांचे गाढे अभ्यासक नीळकंठशास्त्री शिवरामशास्त्री गोरे यांचे निधनख्रिस्ती धर्मविचाराचे खंडन करायला निघालेल्या नीळकंठशास्त्रांनी स्वत:च ख्रिस्ती धर्म स्वीकारल्याने त्याकाळी मोठी खळबळ उडाली होती. ख्रिस्ती धर्म हाच मानवाला तारणारा एकमेव सत्य धर्म आहे, असे प्रतिपादन करणारे पत्रही गाजले. १४ पुस्तके आणि २० हून अधिक पुस्तिका त्यांच्या नावावर आहेत. **१९००:-** संपादक, समीक्षक डॉ. रामकृष्ण गणेष हर्षे यांचा जन्म **१९१७:-** 'व्यवस्थापन सल्लागार' अशी ओळख असणारे लेखक, कथा-कादंबरीकार आनंद महादेव केळकर यांचा जन्म. ह्यांची 'अवर्णा', 'पालवी' या कादंबरीसह 'कालांतर आणि इतर कथा' हा कथासंग्रह प्रसिद्ध झाला आहे. **१९२५:-**संगीतावर नियतकालिकांतून लेखन करणारे लेखक प्रा. नारायण विनायक पटवर्धन यांचा जन्म. 'गाण्याची गोडी' हे पुस्तक त्यांच्या नावावर आहे. **१९३०:-** 'प्रपंच', 'मानिनी', 'रुपा' या मासिकांचे संस्थापक- संपादक माधव राजाराम कानिटकर यांचा जन्म. त्यांनी १५ वर्षात ५० कादंबऱ्या आणि शंभरावर कथा लिहिल्या. 'चंदनाची वीणा', 'आषाढमेघ', 'कथामाधव' ही त्यांच्या कथा संग्रहांची तर 'ग्रीष्माची चाहूल', 'जिंदगी', 'तृष्णा' ही प्रकाशित कादंबऱ्यांची काही नावे. याशिवाय कानिटकरांनी 'भारताचे भाग्यविधाते डॉ. आंबेडकर' 'म. गांधी', 'लो. टिळक', 'जयप्रकाश नारायण', 'पं.नेहरु', 'राजेंद्रप्रसाद', 'विनोबा भावे' आदींची मिळून १५ हून अधिक थोर पुरुषांची चरित्र लिहिलीत. **१९३१:-** ज्यांच्या कथांवर अनेक मराठी आणि 'बीवी ओ बीवी' हा हिंदी चित्रपट निघाले, ते प्रा.प्रभाकर तामणे यांचा जन्म. 'पुनर्मीलन', 'रात्र कधी संपू नये', 'जीवनचक्र' आदी कादंबऱ्या लिहिणारे तामणे गाजले ते विनोदी कथाकार म्हणून. महाविद्यालयीन जीवनातच लेखनाचा शुभारंभ करणाऱ्या तामणे यांनी या कविता, वाड्:मयशोभा' या मासिकातून प्रसिद्ध झाली. 'निनावी धक्कान्तिका' ही त्यांची पहिली कथा. विनोदी, रहस्य आणि प्रणय कथाही त्यांनी लिहिल्या. 'सांगू नको सजणी', 'मध्यरात्री चांदण्यात', 'तो स्पर्श तो सुगंध', 'दिनू' हे त्यांचे नावाजलेले कथासंग्रह. त्यांच्या 'बोल राधा बोल' या नाटकाची दस्तुरखु राजकपूरला भुरळ घातली. त्यावरच आधारित त्याने 'बीवी ओ बीवी' हा चित्रपट काढला. वाचकांचा आनंद हाच हेतू ठेवून त्यांनी लेखन केले. **१९३३:-** लेखक तसेच उद्यानशास्त्र आणि वनस्पतीशास्त्राचे अभ्यासक शामकांत प्रभाकर दिक्षित यांचा जन्म. 'आपले भवितव्य वृक्षांच्या हाती' हा वनस्पतीविषयक शास्त्रीय माहिती देणारा ग्रंथ त्यांचा प्रकाशित झाला आहे. **१९५०:-** लेखक वामन शंकर तावडे यांचा जन्म. यांच्या नावावर काही एकांकिका 'मुद्रा' ह्या चित्रपटाची पटकथा आणि 'छिन्न' हे नाटक अशी साहित्य संपदा.**१९६१:-** कवी दिलीप विश्वनाथराव मोयर यांचा जन्म. 'अव्यक्त' हा काव्यसंग्रह त्यांचा प्रकाशित झाला आहे. **१९७१:-** कादंबरीकार रंगनाथ देशपांडे यांचे निधन. पेशाने डॉक्टर असणाऱ्या देशपाड्यांनी परस्परविरोधी भावना मानवी व्यक्तिमवात कसे आढळतात याचा शोध त्यांनी आपल्या लेखनातून घेतला. 'वेडी बाभळ' हा ग्रामीण विश्व रेखाटणारी कादंबरी तसेच 'आग्यामोहोळ' ही आणखी एक कादंबरी त्यांच्या नावावर आहे. **१९७२:-** लेखक गोविंद विंझे यांचा जन्म. ह्यांच्या ग्रंथसंपदेत 'इंग्रजी काव्यसूक्तींची 'पाणपोई-भाग १ व २', 'संस्कृत मराठी सुभाषित कोश-भाग १ व २','गंगा लहरी', 'भर्तृहरीत नीतिशास्त्र','भर्तृहरीत शतकत्रयी', 'ऋग्वेदी संध्या व पुरुषसूक्त' प्रसिद्ध झाले आहे. **१९९३:-** पत्रकार, हिंदुत्ववादी विचारवंत आत्माराम दामोदर दिक्षित यांचे निधन. **१९९६:-** चंद्रपूर जिल्ह्यातील मूल तालुक्यातील पहिले दलित लेखक अशी ओळख असणारे साहित्यिक पत्रूजी लहुजी खोब्रागडे यांचे निधन.

**- संजय वझरेकर**
**९७५५७६६७५**

**अभिष्टचिंतन ज्येष्ठ नागरिकांचे**

**२९ ऑक्टोबर**

१) श्रीम. रामचंद्र लक्ष्मण रोकडे
२९-१०-१९४१ चेंढरे-अलिबाग

## कृषीवलच्या वाचकांना आवाहन




अलिबाग येथील श्री कच्छी जैन भवन चॅरिटेबल ट्रस्टच्या वतीने अन्नदानासाठी एक अभिनव योजना आखली आहे.जिल्हा रुग्णालयात दाखल असलेल्या रुग्णांच्या एका नातेवाईकाला जेवणाची सोय करण्यात आली आहे. या योजनेत दररोज किमान ७०/८० लोक जेवत असतात. या जेवणाचा खर्च प्रति दिवस रु. ३००० असून ही देणगी देणाऱ्याचा फोटो कृषीवलमध्ये छापला जाईल. तरी जास्तीत जास्त लोकांनी अन्नदान सेवेचा लाभ घेऊन या सामाजिक उपक्रमात सहभागी व्हावे असे आवाहन कृषीवल करीत आहे.

**संपर्क-** ८०५५३२५६७८
**बीपीन राठवा)**
९२२६०५५१५५
**(अमित शहानंद)**
**- मुख्य संपादक, कृषीवल**

**आजचे अन्नदाते**

**मातोश्री प्रमिलाबेन जितेंद्र शाह, वाढदिवस मुंबई**

**गौरव गिरीश देढीया, वाढदिवस, मुंबई**



**कै. दत्तात्रय लक्ष्मण घरत, स्मरणार्थ अलिबाग**

# आरोग्य केंद्रात पाणीटंचाई

## ■ कोल्हारे, नेरळ ग्रामपंचायतीकडून पाणीपुरवठ्यास अडचणी

**। नेरळ । प्रतिनिधी ।**
**कर्जत तालुक्यात सर्वाधिक रुग्णसेवा असलेल्या नेरळ प्राथमिक आरोग्य केंद्र तेथील पाणीटंचाईमुळे चर्चेत आले आहे. तेथे पाणीपुरवठा करणाऱ्या कोल्हारे आणि नेरळ ग्रामपंचायतीमधील नळपाणी पुरवठा योजनेचे पाणी वेळेवर मिळत नाही. त्यामुळे रुग्णांना नेरळ स्थानकात जाऊन पिण्याचे आणि वापरासाठी पाणी आणावे लागते. दरम्यान, कोल्हारे ग्रामपंचायतीकडून तेथील सर्व पाणी जलवाहिन्यांची तपासणी सुरू असून, नेरळ प्राथमिक आरोग्य केंद्राचा पाणीपुरवठा पूर्ववत होईल, असा विश्वास कोल्हारे ग्रामपंचायतीकडून व्यक्त करण्यात आला आहे.**




मध्य रेल्वेचे नेरळ रेल्वे स्थानकाला लागून असल्याने नेरळ प्राथमिक आरोग्य केंद्रात तालुक्यातील इतर आरोग्य केंद्राच्या तुलनेत मोठ्या प्रमाणावर रुग्ण येत असतात. रुग्णांची संख्या आणि तेथे होणारे शस्त्रक्रिया लक्षात घेऊन प्राथमिक आरोग्य केंद्रात पाणीपुरवठ्यासाठी दहा हजार लीटर पाणी क्षमता असलेल्या पाण्याच्या टाक्या ठेवण्यात आल्या आहेत. हे प्राथमिक आरोग्य केंद्र कोल्हारे ग्रामपंचायत हद्दीत येत असून, तेथे येणारे रुग्णांसाठी नेरळ ग्रामपंचायत आणि कोल्हारे ग्रामपंचायत यांच्याकडून पिण्याच्या पाण्याची व्यवस्था व्हावी म्हणून नळजोडण्या देण्यात आल्या आहेत. मात्र, गेल्या महिन्यापासून या दोन्ही ग्रामपंचायतींकडून येणारे पिण्याचे पाणी मुबलक प्रमाणात येत नाही. त्यामुळे शस्त्रक्रिया करण्यासाठी आलेले रुग्णांना प्रसंगी बाहेरून पाणी आणावे लागते. काही रुग्ण नेरळ रेल्वे स्थानकात जाऊन पाणी आणताना अनेक लोकांनी पाहिले आहे. त्यामुळे समाज माध्यमांवर नेरळ प्राथमिक आरोग्य केंद्रावर टीका होऊ लागली आहे.

नेरळ येथील प्राथमिक आरोग्य केंद्रात रुग्णांसाठी आवश्यक असलेल्या मूलभूत सुविधांचा मोठा अभाव आहे. केंद्रात पिण्याचे पाणी उपलब्ध नाही आणि स्वच्छतेचीही पुरेशी काळजी घेतली जात नाही. अनेकदा महिला प्रसूतीसाठी येथे दाखल असतात. पण, त्यांच्यासाठीही आवश्यक सोयी-सुविधा नसल्याने त्यांना अडचणींचा सामना करावा लागतो. मागील पंधरा दिवसांपासून पिण्याचे पाणी उपलब्ध नसल्याने रुग्णांना आणि त्यांच्यासोबत आलेल्या नातेवाईकांना त्रास सहन करावा लागत आहे. पाणी आणण्यासाठी त्यांना दूरवर जावे लागते. विशेषतः ग्रामीण आणि आदिवासी भागातील लोक उपचारासाठी येतात, कारण नेरळ परिसरातील गरीब जनतेसाठी हे एकमेव सरकारी उपचार केंद्र आहे. वारंवार तक्रारी करूनही आरोग्य केंद्रातील कर्मचारीवर्गाच्या उदासीनतेमुळे रुग्णांच्या तक्रारींवर लक्ष दिले जात नाही. स्थानिक लोकांनी या समस्येबाबत तातडीने कार्यवाहीची मागणी केली आहे.

नेरळ प्राथमिक आरोग्य केंद्रामधील पाणीपुरवठा करण्यात येत असलेल्या नळपाणी योजनेचे पाणी पोहोचत नाही. त्यासाठी कोल्हारे आणि नेरळ ग्रामपंचायतीकडून जलवाहिन्या खोदून पाण्याची गळती कुठे आहे काय? हे तपासण्याचे काम करीत आहे. आज त्या सर्व कामगारांना नेरळ प्राथमिक आरोग्य केंद्राचे कर्मचारीदेखील मदत करीत आहेत.

# रस्त्यांच्या साईडपट्ट्या अपघाताला निमंत्रण



**। रत्नागिरी । प्रतिनिधी ।**
काही दिवसांपूर्वीच शहरातील मारुती मंदिर ते माळनाकादरम्यान करण्यात आलेल्या रस्त्याच्या काँक्रिटीकरणानंतर करण्यात आलेल्या साईडपट्ट्यांवर मोठी खडी केवळ पसरवून ठेवल्याने या साईडपट्ट्या अपघातांना निमंत्रण देणाऱ्या ठरत आहेत. साईडपट्ट्यांवर रोड रोलर न फिरवल्याने वाहनचालक खरेदीसाठी जाताना आपली वाहने साईडपट्टीवर उभी करण्याऐवजी अर्ध्या रस्त्यातच उभी करत आहेत.

काही दिवसांपूर्वीच जिल्ह्याचे मुख्यालय असलेल्या रत्नागिरी शहरातील मारुती मंदिर ते माळनाका यादरम्यानच्या एका मार्गिकेवर काँक्रिटीकरणाचे काम पूर्ण करण्यात आले आहे. हे काम पूर्ण झाल्यानंतर करण्यात आलेली साईडपट्टी पादचाऱ्यांसह वाहनधारकांसाठीदेखील डोकेदुखी ठरत आहे. काँक्रिटीकरणाचा रस्ता संपल्यानंतर साईडपट्टी म्हणून बनवण्यात आलेल्या भागात मोठी खडी अक्षरशः पसरवून ठेवण्यात आली आहे. यामुळे पादचाऱ्यांना त्यावरून चालणेदेखील अवघड बनले आहे. छोट्या वाहनांना तर साईडपट्टीवरून काँक्रिटीकरणाच्या रस्त्यावर वाहने आणणे अवघड झाले आहे.

दिवाळीच्या खरेदीसाठी नागरिक दुकानांमध्ये गर्दी करू लागले आहेत. वाहनधारकांना चारचाकी वाहने साईडपट्टीवर उभी करतानादेखील कसरत करावी लागत आहे. यामुळे अनेक वाहनचालक हे आपली वाहने तकलादू साईडपट्टीवर नेण्याऐवजी अर्ध्या रस्त्यात उभी करीत आहेत.

## रत्नागिरीचा पारा चढला

**रत्नागिरी :** परतीबरोबरच अवकाळी पावसाने निरोप घेतल्यानंतर आता तापमानात ऑक्टोबर हीट जाणवू लागली आहे. पुढील दोन दिवस पावसाची उघडीप राहणार असल्याचा अंदाज हवामान विभागाने वर्तविला आहे. पुढील काही दिवस किनारपट्टी भागात पावसाच्या हलक्या सरी कोसळण्याचा अंदाज हवामान विभागाने वर्तविला आहे. मागील दोन दिवस रत्नागिरी जिल्ह्यातील बहुतांश भागात सकाळी तापमान २९ अंश होते. दुपारी साडेबारा वाजता ३० अंश सेल्सियसएवढे तापमान नोंदविले.

# फळांचे भाव घसरले, भाज्यांच्या दरात वाढ

**। रत्नागिरी । प्रतिनिधी ।**
नवरात्रौत्सवात वाढलेली फळांची आवक कायम असून, त्यामुळे दरात घसरण झाली आहे. एरवी प्रतिकिलो दोनशे रुपयांवर असलेले सफरचंदच्या किमती ६० ते १२० रुपये किलोपर्यंत खाली घसरल्या आहेत. पेरूही स्वस्त झाला असून, ५० रुपये किलोपर्यंत दर आहे. भाजीपाल्यांची आवक काहीसी मंदावली आहे, त्यात उठाव अधिक असल्याने दर तेजीत आहेत.

दिवाळीच्या तोंडावर बाजारात ग्राहकांची रेलचेल पाहावयास मिळत आहे. कडधान्य मार्केटमध्ये डाळी, खाद्य तेलासह इतर खरेदीसाठी गर्दी उसळली आहे. खरेदी वाढली असली तरी गेल्या आठवड्याच्या तुलनेत दरात फारसा चढ-उतार दिसत नाही. परतीच्या पावसाने सगळीकडेच झोडपून काढल्याने भाजीपाल्यांच्या आवकवर परिणाम झाला आहे, त्यामुळे दरात वाढ झाल्याचे व्यापाऱ्यांचे म्हणणे आहे. वांगी ८०, टोमॅटो ३० ते ५०, गवार १०० रुपये किलोपर्यंत पोहोचला आहे. इतर भाज्यांचे दरही काहीसे तेजीत आहेत. गेल्या आठवड्यात १५ ते २० रुपये पेंढी असलेल्या कोथिंबीरने मात्र भाव खाल्ला आहे. ३० रुपयांना जुडी मिळत आहे.

मेथी, पोकळा, शेपू, पालक या भाज्यांचे दरही तेजीत आहेत. मेथी १५ ते २० रुपये तर कांदा पात २० रुपये पेंढी असा दर राहिला आहे. कोबीची आवक वाढल्याने दरात काहीशी घसरण झाली आहे. कांदे-बटाट्याचे भावही वधारलेलेच आहे.

## नर्सिंग कॉलेजमध्ये पोलिओ दिन साजरा

**चिपळूण :** संजीवनी प्रशिक्षण संस्था संचलित संजीवनी डीएमएलटी नर्सिंग कॉलेजमध्ये दि. २४ ऑक्टोबर रोजी पोलिओ दिन साजरा करण्यात आला. कॉलेजमधील जीएनएम तृतीय वर्ष विभागातील विद्यार्थ्यांनी पोलिओ रोग आणि त्यापासून बचावासाठी लसीकरणाचे महत्त्व याविषयी माहिती दिली. पोलिओ हा मज्जासंस्थेवर होणारा घातक आजार आहे. पोलिओ रोगाची जनजागृती करण्यासाठी दरवर्षी २४ ऑक्टोबर या दिवशी जागतिक पोलिओ दिन साजरा केला जातो. यावेळी संजीवनी नर्सिंग कॉलेजच्या सेक्रेटरी हर्षा वाघुळदे, शिक्षक सोनाली सुर्वे, सुप्रिया माळी, शिक्षकेतर कर्मचारी आदी उपस्थित होते.

# जिल्हाधिकाऱ्यांकडून मतदारसंघाचा आढावा

**। रत्नागिरी । प्रतिनिधी ।**
जिल्हाधिकारी एम देवेंदर सिंह यांनी २६६ रत्नागिरी विधानसभा मतदारसंघातील निवडणूक प्रक्रिया तयारीच्या अनुषंगाने जिल्हाधिकारी कार्यालय सभागृहात आढावा घेतला.

यावेळी पोलीस अधीक्षक धनंजय कुलकर्णी, उपजिल्हा निवडणूक अधिकारी राहुल गायकवाड, प्रांताधिकारी जीवन देसाई, तहसीलदार राजाराम म्हात्रे तसेच संबंधित विभागाचे अधिकारी, नोडल अधिकारी उपस्थित होते.

श्री. सिंह यांनी यावेळी मतदारसंघामध्ये एसएसटी, एफएसटी पथकांकडून केलेल्या कार्यवाहीचा सविस्तर आढावा घेतला. एसएसटी, एफएसटी पथकांनी कशा प्रकारे काम करावे याबाबत त्यांना मार्गदर्शन केले. श्री. सिंह यांनी ईव्हीएम-व्हीव्हीपॅट मशीन उपलब्धता, प्रशिक्षण, मतदान साहित्य, नामनिर्देशन, टपाली मतदान प्रक्रिया आदी विषयांचाही आढावा घेतला.



बैठकीनंतर जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी एम देवेंदर सिंह यांनी मतदारसंघाच्या ईव्हीएम मशिन्स सुरक्षाकक्षाला भेट देऊन पाहणी केली व सुरक्षा व्यवस्थेचा आढावा घेतला. यावेळी पोलीस अधीक्षक श्री. कुलकर्णी, उपजिल्हा निवडणूक अधिकारी श्री. गायकवाड आणि मतदारसंघाचे निवडणूक निर्णय अधिकारी श्री. देसाई उपस्थित होते.

# खांब येथे परसबाग निर्मितीचे प्रात्यक्षिक

**। खांब । वार्ताहर ।**
रोहा तालुक्यातील खांब येथे दि.२६ रोजी परसबाग निर्मितीचे प्रात्यक्षिक कार्यक्रम संपन्न करण्यात आला.

बाळासाहेब सावंत कोकण कृषी विद्यापीठ अधिनस्त कृषी विज्ञान केंद्र रोहामार्फत आणि कृषी महाविद्यालय, दापोलीच्या ग्रामीण जागृती कार्यानुभव कार्यक्रम (रावे) अंतर्गत कार्यरत असलेल्या कृषी संजीवनी गटातील कृषीदूतांनी परसबाग निर्मितीचे प्रात्यक्षिक दाखवून परसबागेचे महत्त्व सांगितले.

या प्रात्यक्षिक कार्यक्रमांतर्गत परसबाग म्हणजेच घराच्या जवळ असलेली बाग, आपल्या आरोग्याबरोबरच पर्यावरणासाठीही महत्त्वाची ठरते. ताज्या भाज्या, मसाले आणि औषधी वनस्पतींचे उत्पादन करून, किचन गार्डन व्यक्तीला स्वयंपाकात नैसर्गिक आणि सेंद्रिय अन्न मिळवण्याची संधी देते. यामुळे अन्नाच्या गुणवत्तेत वाढ होते आणि केमिकल्सपासून दूर राहता येते. तसेच हे आरोग्यदायी आहाराचा एक भाग बनते, ज्यामुळे रोगप्रतिकारक शक्ती वाढवण्यास मदत होते. आर्थिकदृष्ट्यादेखील घरच्या बागेतले अन्न उत्पादनामुळे खर्चात बचत होते. पर्यावरणीय दृष्टीने, किचन गार्डन लागवडीमुळे वायू प्रदूषण कमी होण्यास मदत होते आणि बायोडायवर्सिटी वाढवण्यास हातभार लागतो.

या सर्व कारणांमुळे किचन गार्डनची महत्त्वता अधिक वाढली आहे, विशेषतः शहरांमध्ये जिथे लोकांना ताजे अन्न मिळवण्यासाठी पर्यायी स्रोतांची आवश्यकता असल्याची माहिती यावेळी कृषीदूतांकडून देण्यात आली. या प्रात्यक्षिकांसाठी डॉ. कुलकर्णी तसेच कृषी विज्ञान केंद्र रोहाचे डॉ. मनोज तलाठी व डॉ. आरेकर, डॉ. मांजरेकर यांचेही मार्गदर्शन लाभले.

# वसुबारस सण उत्साहात साजरा

**। आगरदांडा । प्रतिनिधी ।**
राज्यात अनेक पद्धतीने दिवाळी साजरी केली जाते. यांची सुरुवात वसुबारस या दिवसापासून केली जाते. वसु म्हणजे धन आणि बारस म्हणजे द्वादशी म्हटलं जातं. हिंदू धर्मात गायीला महत्त्वाचे स्थान आहे. या दिवशी शेतकरी गायीची पाडसासह पूजा करून वसुबारस सण उत्साहात साजरा केला जातो.

या दिवसाला गोवत्स द्वादशी असेही म्हणतात. या दिवशी गायीची पाडसासह संध्याकाळी पूजा करतात. घरात लक्ष्मीचे आगमन व्हावे या हेतूनेही या दिवशी सवत्स धेनूची पूजा करण्याची पद्धत आहे. ज्यांच्याकडे घरी गुरे, वासरे आहेत, त्यांच्याकडे या दिवशी पुरणाचा स्वयंपाक करतात. घरातील सुवासिनी गायीच्या पायावर पाणी घालून हळद-कुंकू, फुले, अक्षता वाहून फुलांची माळ त्यांच्या गळ्यात घालतात. निरांजनाने ओवाळून केळीच्या पानावर पुरणपोळी वगैरे पदार्थ वाढून गायीला खाऊ घालतात. काही ठिकाणी या दिवशी कामधेनूचे कृतज्ञतापूर्वक स्मरण करून अंगणात तुळशी वृंदावनाप अशी धेनु म्हणजेच गाय उभी करून तिचे प्रतिकात्मक रूपात पूजन केले जाते. या दिवशी आपल्या अंगणातील गायीला वासवदत्तेचे स्वरूप प्राप्त होते.

# शिक्षकांनी मुख्यालयी राहावे

## ■ जिल्हाधिकाऱ्यांचे शिक्षण अधिकाऱ्यांना आदेश

**। रत्नागिरी । प्रतिनिधी ।**
रत्नागिरी जिल्ह्यात पाच विधानसभा मतदारसंघांमध्ये केंद्राध्यक्ष व मतदान अधिकारी यांचे पहिल्या टप्प्यातील प्रशिक्षण मागील आठवड्यात झाले. दुसऱ्या टप्प्यातील प्रशिक्षण ८ ते १४ नोव्हेंबर या कालावधीत होणार असल्याच्या सूचना निवडणूक आयोगामार्फत प्राप्त झाल्यावर जिल्हाधिकारी एम. देवेंदर सिंह यांनी दि. ८ ते १४ नोव्हेंबरपर्यंत शिक्षक, शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी मुख्यालयी उपस्थित राहावे, असे आदेश दिले आहेत. जिल्हाधिकारी यांनी प्राथमिक व माध्यमिक शिक्षण अधिकाऱ्यांना तसे आदेश दिले आहेत.

रत्नागिरी जिल्ह्यात प्राथमिक शाळांना २८ ऑक्टोबर ते १३ नोव्हेंबर अशी, तर माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळांना २८ ऑक्टोबर ते ९ नोव्हेंबर अशी दीपावली सुट्टी आहे. सुट्टीच्या शेवटच्या टप्प्यात, केंद्राध्यक्ष व मतदान अधिकारी यांचे दुसरे प्रशिक्षण होणार असल्याने निवडणूक प्रक्रियेसाठी नियुक्त शिक्षक, शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना प्रशिक्षणासंदर्भातील पत्रे देणे सुलभ जावे यासाठी मुख्यालयी थांबण्याच्या सूचना दिल्या आहेत.

पहिल्या टप्यात शिक्षक, शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचे प्रशिक्षण आपापल्या विधानसभा क्षेत्रात घेण्यात आले. दुसऱ्या टप्प्यात होणारे प्रशिक्षण नियुक्त केलेल्या कर्मचाऱ्यांची ड्युटी ज्या मतदारसंघात असेल, त्या ठिकाणी होणार आहे. जिल्हाधिकाऱ्यांचे आदेश प्राथमिक व माध्यमिक शिक्षणाधिकारी यांना प्राप्त झाल्यावर प्राथमिक शिक्षणाधिकारी यांनी प्रत्येक तालुक्याच्या गटविकास अधिकाऱ्यांना पत्रक काढले आहे.

# मरवडे परिवारातर्फे विविध धार्मिक कार्यक्रम

**। खांब । वार्ताहर ।**
रोहा तालुक्यातील तळवली तर्फे अष्टमी येथील मरवडे परिवारातर्फे दि. २७ रोजी विविध प्रकारचे धार्मिक तथा अध्यात्मिक कार्यक्रम मोठ्या भक्तीभावाने संपन्न करण्यात आले.



येथील मरवडे परिवारातर्फे मागील १५ वर्षांपासून कुलदेवतेचा उत्सव व अन्य धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात येत आहे. त्याच अनुषंगाने दि.२७ रोजी आयोजित करण्यात आलेल्या कुलदेवता उत्सवानिमित्त विविध धार्मिक तथा अध्यात्मिक कार्यक्रम संपन्न करण्यात आले.

# शिवार झालं सोनेरी; बळीराजा सुखावला

**। आगरदांडा । प्रतिनिधी ।**
मुरुड पंचक्रोशी भागात भातपीक हे प्रमुख उत्पादन आहे. यंदा शेतीयुक्त पाऊस चांगला पडल्याने भातपिकाला हा पाऊस पोषक ठरला, त्यामुळे शेतातील भाताची सोनेरी रोपे आता डोलू लागली आहेत. यंदा भातपिकात वाढ होण्याची शक्यता असल्याने बळीराजा सुखावला आहे.

मुरूड तालुक्यात ३९०० हेक्टर क्षेत्रात भातपिकासाठी लागवड केली जाते. यंदा त्यापैकी ३८९० टक्के भातपिकांची लागवड करण्यात आली होती. सुरुवातीलाच पावसाने पाठ फिरवल्याने बळीराजा प्रचंड तणावाखाली होता. दुबार पीक करायला लागतंय का, हा मोठा प्रश्न बळीराजासमोर होता. जुलैच्या पहिल्या आठवड्यात वरुणराजाने एवढी कृपादृष्टी दाखवल्याने शेतात पाणीच पाणी मिळाल्याने शेतकरी सुखावला. पडणारा पाऊस भातपिकाला पोषक ठरला. त्यामुळे भाताची सोनेरी रोपे तरारुन आली. ही सोनेरी रोपे वाऱ्यावर डोलू लागली आहेत. मुरुड पंचक्रोशी भागात सर्रास शेतकरी आपल्या शेतात सुवर्णा, जया, चिंटू हे पीक घेतले जातो. जया व चिंटू पीक तयार झाले असून, जया पीक पुढील महिन्यात पूर्णतः तयार होईल. शिवारातील सोन्याने आपली भरभराट होईल, अशी आशा येथील शेतकरी करीत आहे.



**छत्रपती शिवरायांच्या शिकवणींना उजाळा देत मुलांना मार्गदर्शन**

# किल्ले बनवा, संघटित व्हा!

## ■ अनुभूती संस्थेचा अभिनव उपक्रम

**। पनवेल । प्रतिनिधी ।**
**दिवाळीची सुट्टी सुरू होताच मुलांना वेध लागतात ते किल्ले बनविण्याचे. मग त्यासाठी लागणारी माती, किल्ल्यावर ठेवण्यासाठी चिनी मातीचे मावळे, विविध प्रकारचे प्राणी खरेदी करण्याची लगबग दिसून येते. दरम्यान, पनेवल येथील अनुभूती संस्थेने 'किल्ले बनवा, संघटित व्हा!' असा अभिनव उपक्रम हाती घेत मुलांना छत्रपती शिवाजी महाराजांच्या शिकवणींना उजाळा देत मार्गदर्शन केले. नुकतीच एक कार्यशाळा पनवेलमध्ये झाली. यावेळी बच्चेकंपनी मोठ्या संख्येने उपस्थित होती.**



पनवेलमधील अनुभूती या संस्थेचा किल्ले कसे बनवावेत यासंदर्भातील एक ऑनलाईन कार्यशाळा नुकतीच पार पडली. अभ्यासपूर्ण किल्ले कसे बनवावे यासंदर्भात या कार्यशाळेमध्ये माहिती दिली गेली. किल्ल्यांचे प्रकार, आखीव रेखीव प्रमाणबद्ध कसे बनवावेत? सजावट कशी करावी? निसर्ग पूरक वस्तूंचा वापर आणि किल्ल्यांबद्दलची ऐतिहासिक भौगोलिक आणि विशेष माहिती कशी गोळा करावी, याबाबत मार्गदर्शन या कार्यशाळेमध्ये दिले गेले. ऑनलाईन कार्यशाळेसोबतच अनुभूती संस्थेतर्फे काही निवासी सोसायट्यांमध्ये मुलांना एकत्र करून हीच कार्यशाळा मुलांसमक्ष आयोजित केली गेली, ज्यामध्ये मुलांनी आवडीने भाग घेतला.

जशी दिवाळीची सुट्टी सुरू झाली तसा आम्हा सगळ्यांचा एक आवडीचा कार्यक्रम म्हणजे किल्ला बनवणे त्यावेळी लहानपणी किल्ल्यांविषयी आवड निर्माण झाली होतीच; परंतु हे किल्ले दिवाळीतच का बनवले जातात ते कारण मात्र माहित नव्हतं. मात्र जसे जसे मोठे होत गेले तसे तसे अधिक माहिती मिळाल्यानंतर त्याविषयीची सविस्तर लेख वाचला आणि उलगडा झाला महाराष्ट्राचे आराध्य दैवत छत्रपती शिवाजी महाराज यांचे कार्य पुढे चालू ठेवावे आणि लहान मुलांना आपली संस्कृती किल्ले आणि किल्ल्यांमुळे तयार झालेल्या स्वराज्य याबद्दलची माहिती त्यांच्या कोवळ्या वयातच मिळावी या हेतूने फार पूर्वी कोणीतरी किल्ले बांधायची प्रथा सुरू केली आणि त्याचा खूप चांगला फायदा लहानपणी आम्हाला दिसला, असे सुदीप आठवले यांनी सांगितले.

पाच-पंचवीस किल्ल्यांच्या पलीकडे आपल्याला किल्ले माहिती नसतात आणि ते माहिती करून घ्यायची इच्छा नाही त्यामुळे ठराविक किल्ल्यांबद्दल माहिती मिळाली, त्याचा इतिहास जाणून घेतला की आपले काम झाले, असे आजकालच्या मुलांना वाटते. अर्थात, यात सर्वतोपरी त्यांची चुकी आहे असेही नाही, असेही आठवले म्हणाले. अनुभूती संस्था पनवेल आणि आसपासच्या परिसरात मुलांना साहस, पर्यावरण जागृतीमधून एक जबाबदार नागरिक बनवण्यासाठी प्रयत्नशील आहे, असेही ते म्हणाले.

# मुरुड-तळामार्गे पुणे बस सुरू

**। तळा । वार्ताहर ।**
मुरुड-तळामार्गे पुणे बससेवा सुरू झाल्याने नागरिकांमधून समाधान व्यक्त करण्यात येत आहे. याआधी सुरू असलेली तळा ते पुणे बससेवा अचानक बंद करण्यात आल्याने या बसने प्रवास करणाऱ्या प्रवाशांची मोठी गैरसोय झाली होती.



## ■ नागरिकांकडून समाधान व्यक्त

तळा बसस्थानकातून सकाळी सात वाजता सुटणाऱ्या तळा ते पुणे बसमधून लोणेरे येथे बाटू महाविद्यालयात शिक्षण घेण्यासाठी जाणाऱ्या विद्यार्थ्यांना तसेच कामानिमित्त महाड व पुढे पुणे येथे जाणाऱ्या ज्येष्ठ नागरिकांना ही बस प्रवास करण्यासाठी सोयीची पडत होती. मात्र, अचानक ही बससेवा बंद करण्यात आल्याने या सर्व प्रवाशांना खासगी वाहनाने जास्तीचे पैसे खर्च करून प्रवास करावा लागत होता. तसेच इच्छितस्थळी वेळेत पोहोचता येत नसल्याने मनस्तापदेखील सहन करावा लागत होता. ही बससेवा पुन्हा सुरू व्हावी यासाठी प्रवासीवर्गाकडून मागणी करण्यात येत होती. ही बस तळा बसस्थानकातून सकाळी ६.४५ वा. सुटणार आहे. तसेच पुणे येथून दुपारी १.३० वा. सुटून तळा बसस्थानकात सायं. सहा वाजता पोहोचेल, अशी माहिती तळा वाहतूक नियंत्रक प्रशांत मांदुस्कर यांनी दिली.

# न्यायालयाचा ओएनजीसीला दणका

## नागाव ग्रा.पं.ला थकबाकी देण्याचे आदेश; मालमत्ता करापोटी तीन कोटींचा धनादेश सुपूर्द

**। चिरनेर । प्रतिनिधी ।**

**बारा वर्षांच्या न्यायालयीन प्रदीर्घ संघर्षानंतर आणि उच्च न्यायालयाच्या दणक्यानंतर वठणीवर आलेल्या उरण ओएनजीसीने नागाव ग्रामपंचायतीला तीन कोटींचा मालमत्ता कराचा धनादेश अदा केला आहे. या मालमत्ता करामुळे ग्रामपंचायतीच्या विकासकामांना गती मिळणार आहे.**



नागाव ग्रामपंचायतीच्या हद्दीत असलेल्या प्रकल्पाकडे मालमत्ता कराची वार्षिक ९ लाख ६५ हजार रुपये आकारणी करण्यात येते. मात्र, उरण ओएनजीसी विविध तकलादू कारणे पुढे करून २००० सालापासून २०१२ पर्यंत कोट्यवधींची मालमत्ता कराची रक्कम भरण्यास चालढकल करीत होती. उरण येथील ओएनजीसीला मालमत्ता कराच्या थकित रकमेचा भरणा करण्यासाठी वारंवार नोटीसा, स्मरणपत्र पाठविण्यात आली होती. मात्र, त्यानंतरही ओएनजीसी प्रशासनाने मालमत्ता कराची रक्कम भरण्यास तयार झाली नाही. त्यामुळे मालमत्ता कराच्या थकित वसुलीसाठी अखेर नागाव ग्रामपंचायतीने उच्च न्यायालयात धाव घेतली होती.

उच्च न्यायालयात सुनावणीदरम्यान ग्रामपंचायतीच्या वतीने भक्कमपणे बाजू मांडण्यात आली. १२ वर्षांच्या प्रदीर्घ लढाईनंतर अखेर नागाव ग्रामपंचायतीच्या २००२ पासून २०२४ पर्यंत थकित असलेल्या मालमत्ता कराची रक्कम तात्काळ अदा करण्याचे आदेश ओएनजीसी प्रशासनाला दिले आहेत. तसेच दर चार वर्षांनी मालमत्ता कराच्या रकमेत वाढ करण्याचे निर्देश दिले आहेत. उच्च न्यायालयाच्या आदेशानंतर वठणीवर आलेल्या ओएनजीसीने थकित असलेल्या मालमत्ता करापोटी तीन कोटींचा धनादेश ग्रामपंचायतीकडे नुकताच सुपूर्द केला आहे. २०२३-२४ या आर्थिक वर्षापासून मालमत्ता कराच्या रकमेत घसघशीत वाढ होणार असून, वर्षाकाठी ओएनजीसीकडून मालमत्ता करापोटी यापुढे ग्रामपंचायतीला ५४ लाख रुपये मिळणार असल्याची माहिती ग्रामपंचायतीकडून देण्यात आली. मालमत्ता कराच्या थकित रकमेच्या वसुलीसाठी उरण पंचायत समितीचे गटविकास अधिकारी समीर वाठारकर यांचीही भूमिका महत्त्वाची ठरली. त्यांचे सहकार्य आणि ग्रामपंचायतीचे सरपंच, सदस्यांनी घेतलेल्या संघर्षाच्या पवित्र्यामुळेच ग्रामपंचायतीला न्यायालयात न्याय मिळाला आहे.

मालमत्ता करासाठी परिसरातील अनेक ग्रामपंचायतींचा शासकीय प्रकल्पाबरोबर कायदेशीर लढाई सुरू आहे. उच्च न्यायालयाच्या निकालाचा फायदा या अन्य ग्रामपंचायतींनाही होणार आहे. तसेच ग्रामपंचायतीची रखडलेली कामेही मार्गी लावण्यात मदत होणार असल्याचा दावा सरपंच, सदस्य व ग्रामसेवकांनी माहिती देताना व्यक्त केला आहे.

> **पाऊणे दोन कोटी रुपये ग्रामपंचायतची पाणीपट्टी थकीत आहे. सव्वा कोटी रुपये स्ट्रीट लाईटचे वीज बिल थकीत आहे. पाणीपट्टी व वीज बिलाचे हे पैसे शासनाला भरायचे आहेत. ग्रामपंचायतीला मिळालेल्या ३ कोटी रुपयांच्या करामधून पाणीपट्टी व वीज बिल भरण्यात येणार आहे. तसेच नागाव ग्रामपंचायतला स्वतःची जागा नाही. जिल्हा परिषद शाळेच्या जागेत ग्रामपंचायतीची इमारत आहे. त्यामुळे स्वतःच्या हक्काची जागा व इमारत व्हावी अशी सर्वांची इच्छा आहे. त्या दृष्टीने प्रयत्न सुरु आहेत.**
> **– चेतन गायकवाड, सरपंच, नागाव**

> **गावाचा विकास झाला पाहिजे, गावाचे सर्व प्रश्न सुटले पाहिजेत, गावाचे नाव झाले पाहिजे अशी जनतेची इच्छा आहे. आम्ही सरपंच, उपसरपंच व सर्व ग्रामपंचायत सदस्य यांनी आजपर्यंत चांगले काम केले आहेत. सर्व जनतेला आमच्याकडून चांगल्या कार्याची अपेक्षा आहे. आम्ही जनतेच्या विकासासाठी कटिबद्ध आहोत. उच्च न्यायालयाने दिलेला निकाल आमच्यासाठी ऐतिहासिक आहे. यामुळे गावचा मोठ्या प्रमाणात विकास होणार आहे.**
> **– दिपिका पाटील, ग्रामपंचायत सदस्य, नागाव**



# पनवेलकरांची ‘दिवाळी पहाट’ होणार मंत्रमुग्ध

### प्रियांका बर्वे, आनंद भाटे यांच्या गाण्यांची मेजवानी

**। पनवेल । प्रतिनिधी ।**

लखलखत्या दिव्यांचा उत्सव असणाऱ्या दिवाळीच्या प्रारंभी पनवेलकरांसाठी महानगरपालिकेच्यावतीने शुक्रवार, दि. १ नोव्हेंबर रोजी पहाटे ५.३० वाजता आनंद गंधर्व पंडित आनंद भाटे आणि गायिका प्रियांका बर्वे यांच्या गाण्यांच्या मैफिलीचे आयोजन वडाळा तलाव परिसरात करण्यात आले आहे. त्या पार्श्वभूमीवर परिसराला रोषणाई आणि आकर्षक छत्र्यांनी सजविण्यात आले आहे.

गेल्या काही वर्षांपासून महानगरपालिकेच्या वतीने पनवेलकरांची दिवाळी सूरमयी व्हावी यासाठी ‘दिवाळी पहाट’ कार्यक्रमाचे आयोजन करण्यात येत आहे. यावर्षीही पनवेल महापालिका कार्यक्षेत्रातील नागरिकांना दिवाळीच्या प्रारंभी नाट्यसंगीत, भावसंगीत, भक्तीसंगीतावर आधारित आनंद गंधर्व पंडित आनंद भाटे आणि गायिका प्रियांका बर्वे यांच्या गाण्यांची संगीतमय मेजवानी देण्यासाठी महापालिकेच्यावतीने दिवाळी पहाट कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे.

# एसटी कर्मचाऱ्यांना सानुग्रह अनुदानाची प्रतीक्षा

**। अलिबाग । प्रतिनिधी ।**

दिवाळी अवघ्या दोन दिवसांवर येऊन ठेपली आहे. मात्र, अद्यापपर्यंत एसटी महामंडळाकडून कर्मचाऱ्यांना सानुग्रह अनुदान देण्याबाबत कोणतीही हालचाल झाली नाही. या कर्मचाऱ्यांना सानुग्रह अनुदान आणि दिवाळी बोनसची प्रतीक्षा लागून राहिली आहे. महामंडळाच्या संथ कारभारामुळे रायगड जिल्ह्यातील हजारो एसटी कर्मचाऱ्यांची दिवाळी सानुग्रह अनुदानाविना जाण्याची शक्यता आहे.

एसटी महामंडळ रायगड विभागाच्या अखत्यारित अलिबाग, पेण, कर्जत, मुरूड, महाड, श्रीवर्धन, माणगाव, रोहा असे आठ एसटी बस आगार असून, १९ बसटी बसस्थानके आहेत. जिल्ह्यामध्ये ३८० हून अधिक एसटी बस गाड्या आहेत. दिवसाला एक लाखाहून अधिक प्रवास एसटी करते. एसटीतून दिवसाला सुमारे ४० लाख रुपयांहून अधिक उत्पन्न मिळते. तीन हजारांहून अधिक एसटी कर्मचारी एसटीमध्ये काम करीत आहेत. त्यात सुमारे दीड हजारांहून अधिक चालक व वाहकांचा समावेश आहे. दरवर्षी कर्मचाऱ्यांना दिवाळीपूर्वी बोनस सहा हजार रुपये व सानुग्रह अनुदान साडेबारा हजार रुपये दिला जातो. या सणामध्ये फराळ व इतर साहित्य खरेदीसाठी प्रचंड खर्च होतो. त्यामुळे दिवाळी बोनस व सानुग्रह अनुदान दिवाळीत आर्थिक ताळमेळ ठेवण्यास उपयोगी ठरतो.

मंगळवारी २९ ऑक्टोबर रोजी धनत्रयोदशी, गुरुवारी ३१ ऑक्टोबर रोजी नरक चतुर्दशी, शुक्रवारी एक नोव्हेंबर रोजी लक्ष्मीपूजन, शनिवारी दोन नोव्हेंबर रोजी दीपावली पाडवा तथा बलिप्रतिपदा आणि तीन नोव्हेंबर रोजी भाऊबीज आहे. यंदा दिवाळी दोन दिवसांवर येऊन ठेपली आहे. कर्मचाऱ्यांना सानुग्रह अनुदान व बोनस देण्याबाबत कोणतीही हालचाल एसटी महामंडळाकडून झाली नाही. सानुग्रह अनुदानासाठी अनेकांनी कार्यालयात प्रस्ताव पाठविला आहे. तरीदेखील त्याबाबतही कोणतीही कार्यवाही झाली नसल्याची खंत एसटी कर्मचाऱ्यांकडून व्यक्त करण्यात आली आहे.

> **दिवाळीच्या आठ दिवस अगोदर सानुग्रह अनुदान व बोनस महामंडळाकडून दिला जातो. दिवाळी दोन दिवसांवर येऊनदेखील यंदा बोनस व सानुग्रह अनुदान देण्यात आला नाही. अनुदानाची प्रतीक्षा लागून राहिली आहे. कर्मचारीवर्गात नाराजीचे सूर उमटले आहेत.**
> **– दिलीप पालवणकर, सचिव, सेवा शक्ती संघर्ष**

> **सानुग्रह अनुदान व बोनस देण्याबाबत वरिष्ठ पातळीवर निर्णय घेतले जातात. अजूनपर्यंत याबाबत कोणतेही आदेश देण्यात आले नाहीत.**
> **– दिपक घोडे, विभाग नियंत्रक, रायगड विभाग एसटी महामंडळ**

> **एसटी कर्मचाऱ्यांना दिवाळी बोनस व फेस्टिवल ॲडव्हान्स देण्याबाबत कोणत्याही प्रकारची चर्चा झाली नाही. वरिष्ठांच्या सूचनेनुसार पुढील कार्यवाही केली जाईल.**
> **– जनसंपर्ककार्यालय, एसटी महामंडळ**

# दीपसंध्येने अलिबागकरांची दिवाळी सूरमयी



**। अलिबाग । प्रतिनिधी ।**

दीपावलीच्या पूर्वसंध्येला अलिबागकारांनी सुरेल संगीतबद्ध गायनाच्या सोहळा अनुभवला. अलिबाग येथील सावी फाऊंडेशन आयोजित आणि स्वरगंध निर्मित दीपसंध्या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. सुमधुर संगीत आणि गायनाने अलिबागकर मंत्रमुग्ध झालेले पहावयास मिळाले.

अलिबागनजीकच्या कुरुळ येथील क्षात्रैक्य समाजमंदिरामध्ये तिन्हीसांजेच्या कातरवेळी गायकांनी छेडलेले सूर आणि रसिक प्रेक्षकांनी त्यांच्या गायनाला दिलेली साथ यामुळे दीपावलीच्या पूर्वसंध्येला संगीतबद्ध वातावरणात टाळ्यांचा तालबद्ध आवाज सभागृहात निनादला होता.

सोनाली कर्णिक, अभिषेक मारोटकर, प्रशांत काळूंद्रेकर, स्मुग्धा माळी आणि डॉ. विशाखा मोडक या गायकांच्या आवाजातील सुमधुरता रसिकांनी अनुभवली. डॉ. विशाखा मोडक यांच्या स्वरांनी ‘मी स्वप्न पाहिले जे सांगू कुणास बाई’ या गीताने रसिकांची दाद मिळविली. या कार्यक्रमाची निर्मिती आणि संयोजन अतुल माळी, निवेदन धनश्री जोशी यांनी केले. वाद्यवृंदामध्ये असणाऱ्या गौरव मुरकर, सचिन नाखवा, भावना अंकुश, अतुल माळी यांनी गायकांच्या स्वरांना सुमधुर संगीत देऊन दीपसंध्या अधिक बहारदार बनवली.



# आवरे स्मशानभूमी प्रकाशमान

**। चिरनेर । प्रतिनिधी ।**

उरण तालुक्यातील शिवभक्त व सामाजिक कार्यात अग्रेसर असणाऱ्या सुनील ठाकूर यांनी आवरे गावातील स्मशानभूमीत स्वखर्चाने, दोन हाय पावर ५० वॅटचे हॅलोजन लॅम्प बसवून स्मशानभूमीत, रात्री पडणाऱ्या अंधाराची गैरसोय दूर केली आहे. त्यामुळे येथील नागरिकांनी समाधान व्यक्त केले आहे.

आवरे गावातील स्मशानभूमीत विजेची सोय नसल्यामुळे रात्रीच्या वेळी प्रेतावर अंत्यसंस्कार करण्यासाठी येथील नागरिकांना अंधाराच्या गैरसोयीचा सामना करावा लागत होता. ही विजेची गैरसोय लक्षात घेऊन गावातील सामाजिक कार्यकर्ते सुनील ठाकूर यांनी येथील स्मशानभूमीत विजेची व्यवस्था करण्याचा महत्त्वपूर्ण निर्णय घेतला. त्यांनी दिवाळीच्या मुहूर्तावर स्मशानभूमीत स्वखर्चाने दोन हॅलोजन लावून विजेची सोय केली आहे. त्यामुळे आता येथील स्मशानभूमी प्रकाशमान झाली असून, सुनील ठाकूर यांच्या नावाची चर्चा आवरे गावातून होत आहे. त्यांच्या या अनोख्या कार्याबद्दल आवरे ग्रामस्थांनी व इयत्ता सातवीच्या बॅचच्यावतीने त्यांना धन्यवाद दिले.

# आ. बालदींच्या उमेदवारीला शिवसेनेचा विरोध

## भाजपने विश्वासात न घेता उमेदवारी जाहीर केल्याने नाराजी

**। उरण । वार्ताहर ।**

उरण विधानसभा मतदारसंघात शिवसेना शिंदे गटातर्फे रविवारी (दि. २७) सायंकाळी ६ वाजता रत्नेश्वरी मंदिर सभागृह, जसखार, तालुका उरण येथे पदाधिकारी कार्यकर्ता मेळाव्याचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी शिवसेना जिल्हा प्रमुख अतुल भगत यांनी भाजपने उमेदवारी जाहीर करताना शिवसेनेला विश्वासात न घेतल्याने शिवसैनिक नाराज असून, महेश बालदी यांच्या उमेदवारीला जाहीर विरोध आहे. निवडणुकीत महेश बालदी यांचे काम करणार नसल्याचेही त्यांनी यावेळी सांगितले.

या मेळाव्याप्रसंगी शिवसेना शिंदे गटाचे पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते. यावेळी अतुल भगत यांनी पदाधिकारी मेळावा घेण्यामागचे कारण स्पष्ट केले. ते म्हणाले की, उरण विधानसभा मतदारसंघात भाजपने शिवसेनेला (शिंदे गटाला) विश्वासात न घेता उमेदवारी दिली. वास्तविक पाहता, उरण मतदारसंघात शिवसेनेची चांगली पकड आहे. तळागाळात शिवसेनेचा प्रचार व प्रसार चांगल्या पद्धतीने झाला आहे. शिवसेनेला येथे पोषक वातावरण आहे मात्र, एकनाथ शिंदे यांना विश्वासात न घेता भाजपने अगोदरच आपली यादी जाहीर करून महेश बालदी यांना उमेदवारी दिली आहे, त्यामुळे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे तसेच शिवसेनेचे पदाधिकारी, कार्यकर्ते या निर्णयामुळे नाराज आहेत. शिवसेनेचा महेश बालदी यांना विरोध असल्यामुळे शिवसेना बालदी यांचे काम करणार नाही, असे अतुल भगत यांनी सांगितले. शिवसेनेने आपला पदाधिकारी कार्यकर्ता मेळावा घेऊन आपली भूमिका जाहीर केल्याने महायुतीचे भाजपचे उमेदवार महेश बालदी यांच्या अडचणीत वाढ होण्याची चिन्हे दिसत आहेत.

# साखर शाळेत दिवाळीनिमित्त उपक्रम

**। अलिबाग । प्रतिनिधी ।**



अलिबाग तालुक्यातील रायगड जिल्हा परिषद शाळा साखर येथे दिवाळी सुट्टीपूर्वी विविध उपक्रमांचे आयोजन करण्यात आले. त्यामध्ये आकाश कंदील बनवणे, पणत्या रंगवणे, किल्ला बनवणे, भेटकार्ड बनवणे असे विविध उपक्रम पालकांच्या सहकार्याने घेण्यात आले. विद्यार्थ्यांनीदेखील या उपक्रमात रममाण होऊन मनमुराद आनंद घेतला.

या उपक्रमात पालक रेश्मा भूकवार, सोनाली बानकर, सुनिता गोतकर, अमिषा मुंढे, मंजुळा लाड, शिक्षक राजेंद्र पाटील, स्मिता चिखले तसेच सर्व विद्यार्थी सहभागी झाले होते. या उपक्रमाचे पालकांनी कौतुक केले.



# विद्यार्थ्यांकडून मतदान जनजागृती

**। खोपोली । प्रतिनिधी ।**

विधानसभेच्या निवडणुका जाहीर झाल्या असून, मतदानाचे महत्त्व पटवून सगळ्यांनी मतदार करावे, अशी जनजागृती आत्करगाव येथील शालेय विद्यार्थ्यांनी रॅली काढत केली.

केंद्रप्रमुख जयंत पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली ग्रुप ग्रामपंचायत आत्करगाव हद्दीतील आत्करगाव, आडोशी व आत्करगाव कातकरवाडी येथे मतदान जनजागृती रॅली आयोजित करण्यात आली.

या रॅलीद्वारे घोषणाबाजी करत आत्करगाव शाळेचे मुख्याध्यापक मच्छिंद्र खेमनर व विद्यार्थ्यांनी रॅलीमध्ये रंगत आणली. आकर्षक रांगोळी काढून आडोशी शाळेच्या मुख्याध्यापिका शिंदे आणि खेमनर मॅडम यांनी शालेय परिसर सुशोभित केला.

या कार्यक्रमाला आत्करगाव ग्रामपंचायतीच्या सरपंच शर्मिला भोईर, ग्रामपंचायत कर्मचारी, पोलीस पाटील, शाळा व्यवस्थापन समिती सदस्य, आत्करगाव कातकरवाडी शाळेच्या मुख्याध्यापिका अमृते, चारवाडीकर सर आदींसह ग्रामपंचायत हद्दीतील सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते.

क्लासिफाईड
जाहिरात छोटी, उपयुक्तता मोठी

- प्रथम, पुर्नविवाह, व्यंग, सर्वजातीय, आंतरजातीय वेबसाईटसह स्थळांसाठी रोहा गणेश महाकाळ ८८८८९३५७७५
- सन स्टोन रीयल इस्टेट साईना कॉम्प्लेक्स बायपास रोड चर्चच्या समोर N.A. प्लॉट अलिबाग परिसरात आहेत. लहान फार्म हाऊस प्लॉट स्वतंत्र ७ X १२ ८६६९००६९०२, ९२७०८८८८०३
- अलिबाग एस टी स्टॅन्डजवळ दुकान गाळा विक्री करणे आहे ९७६४५४८६७९
- आयुर्विमा ऑफीस कामासाठी महिला पाहिजे पत्ता विजयनगर-वरसोली, वरसोली नाक्याजवळ मो.९४२२४९४५९०/७५०७९२९१२८

जाहिरातीसाठी संपर्क : (०२१४१) २२२२९०/ २२२७६१

## रस्त्यावर चिखल; हजारो लीटर पाण्याची नासाडी

# रस्त्यावरील धुरळ्याला पाण्याचा उतारा

**। कोलाड । वार्ताहर ।**

**मुंबई–गोवा महामार्ग ६६ वरील कोलाड बाजारपेठ तसेच तळवली गावाजवळील रस्त्यावर उडत असलेल्या धुरळ्याला पर्याय म्हणून पाण्याची फवरणी केली जात आहे; परंतु या फवारणीमुळे रस्त्यावर चिखलाचे साम्राज्य निर्माण झाले आहे. यामुळे दुचाकी गाड्या स्लीप होऊन अपघात होत आहेत. यामुळे या मार्गावरून प्रवास करणाऱ्या प्रवाशांच्या जिवाला धोका निर्माण झाला आहे. शिवाय, हजारो लीटर पाणी वाया जात असल्याचे दिसून येत आहे.**

मुंबई-गोवा महामार्गाच्या चौपदरीकरणाचे काम १७ वर्षांपासून सुरु आहे. गणेशोत्सवानंतर या महामार्गाचे काम वेगाने सुरु असले तरी या कामात कोणतेही नियोजन नाही. कारण, एका बाजूच्या रस्त्याचे काम सुरु करण्याच्या अगोदर दुसऱ्या बाजूच्या रस्त्याचे काम चांगल्या प्रकारे केले पाहिजे होते; परंतु असे काहीच झाले नाही.




याचा नाहक त्रास प्रवासीवर्गाला भोगावा लागत आहे.

मुंबई-गोवा महामार्गावर सिमेंट काँक्रिट रस्ता, उड्डाणपूल, छोटे-मोठे ब्रिज, गटाराचे काम विविध ठिकाणी सुरु आहे. परंतु, असे असले तरी हे काम डिसेंबर २०२४ पर्यंत पूर्ण होईल याची खात्री देता येत नाही. कोलाड बाजारपेठेत तसेच तळवली येथील रस्त्यावर प्रचंड धुळीने जनता पूर्णपणे हैराण झाली असून, ही धूळ व्यावसायिकांच्या दुकानात जाऊन मोठे नुकसान होत आहे. याला पर्याय म्हणून ठेकेदाराकडून रस्त्यावर पाणी मारले जात आहे; परंतु यामुळे रस्त्यावर मोठ्या प्रमाणात चिखलाचे साम्राज्य निर्माण होत आहे. तसेच दोन तासांनी परिस्थिती जैसे थे अशीच होते, यामुळे हजारो लीटर पाणी वाया जात असून, शासनाच्या तिजोरीतील करोडो रुपये वाया जात असल्याचे दिसून येत आहे.

> **मुंबई–गोवा महामार्गावरील महामार्गाचे काम १७ वर्षांपासून सुरु असून, हे काम केव्हा पूर्ण होईल हे सांगता येत नाही. परंतु, निकृष्ट दर्जाच्या रस्त्यामुळे या महामार्गावर दररोज अपघात होऊन असंख्य प्रवाशांचा नाहक बळी गेला, अनेकांचे कुटुंब उद्ध्वस्त झाले असून, याला जबाबदार कोण?**
> **– चंद्रकांत लोखंडे, सामाजिक कार्यकर्ते**

# १२५ डेसीबलपेक्षा जास्त आवाजाच्या फटाक्यांना मनाई

**। पनवेल । वार्ताहर ।**

नवी मुंबई पोलिसांनी आपल्या कार्यक्षेत्रात शांतता-सुव्यवस्था राखण्याच्या दृष्टीने दीपावली सणाच्या कालावधीत नागरिकांना रस्त्यावर फटाके फोडण्यास तसेच १२५ डेसीबल पेक्षा जास्त आवाज करुन ध्वनी प्रदुषण करणारे, मोठ्या आवाजाचे फटाके फोडण्यास मनाई केली आहे. तसेच रात्री १० ते सकाळी ६ या कालावधीत कोणत्याही प्रकारचे फटाके फोडण्यास देखील मनाई करण्यात आली आहे. नवी मुंबई पोलिसांच्या विशेष शाखेच्या पोलीस उपायुक्त रश्मी नांदेडकर यांनी २३ ऑक्टोबरपासून याबाबतचे आदेश नवी मुंबईत लागू केले आहेत.

येत्या २८ ऑक्टोबर ते ३ नोव्हेंबर या कालावधीत दीपावली उत्सव सर्वत्र साजरा होत आहे. दीपावली उत्सवाच्या कालावधीत देशविघातक आणि देशद्रोही व्यक्ती मोठ्या आवाजाचे फटाके किंवा शोभेच्या फटाक्यांच्या आड, तसेच त्याच्या आवाजाचा फायदा घेवून स्फोटकांचा स्फोट घडवून नागरिकांच्या जीवितास तसेच सार्वजनिक मालमत्तेस धोका निर्माण करण्याची शक्यता नाकारता येत नाही. त्यामुळे नवी मुंबई पोलिसांनी आपल्या कार्यक्षेत्रात शांतता-सुव्यवस्था राखण्याच्या दृष्टीने दीपावली उत्सवामध्ये नागरिकांनी रस्त्यावर किंवा रस्त्यापासून ५० फुटांच्या आत कोणतेही फटाके उडविण्यास मनाई करण्यात आली आहे. तसेच १२५ डेसीबल पेक्षा जास्त आवाज निर्माण करणाऱ्या फटाक्यांचे उत्पादन आणि विक्री करण्यास तसेच फटाके फोडण्यास मनाई करण्यात आली आहे. त्याचप्रमाणे ध्वनी निर्माण करुन आवाजाचे प्रदुषण करणाऱ्या फटाक्यांवर रात्री १० ते सकाळी ६ वाजेपर्यंत संपूर्णतः मनाई करण्यात आली आहे. विशेष शाखेने याबाबतचे आदेश लागू केले आहेत.

## हवेत प्रज्वलीत आकाश कंदील उडवण्यावर बंधने

**दिवाळी सणांमध्ये आकाश कंदील प्रज्वलित करुन हवेत सोडण्यात येत असतात. परिणामी, एखादे पेटते कंदील खाली पडून एखादी अनुचित गंभीर स्वरुपाची घटना घडण्याची शक्यता नाकारता येत नाही. त्यामुळे नवी मुंबई पोलीस आयुक्तालयातील सर्व पोलीस स्टेशनच्या हद्दित प्रज्वलित केलेले आकाश कंदील हवेत उडविण्यावर, विक्री करण्यावर तसेच साठा करण्यास बंदी घालण्यात आली आहे. त्यासाठी नवी मुंबई पोलिसांनी मनाई आदेश लागू केले आहेत. या आदेशाचे उल्लंघन करणाऱ्यांवर भारतीय न्याय संहिता २०२३ चे कलम २२३ अन्वये कारवाई करण्यात येईल, असा इशारा पोलिसांकडून देण्यात आला आहे.**

# माथेरानमध्ये अवतरली थंडी

**। माथेरान । वार्ताहर ।**

राज्यात अजूनही ऑक्टोबरची हिट म्हणजेच उष्णता सर्वत्र जाणवत असून माथेरान पर्यटनस्थळी थंडीची चाहूल लागली आहे. त्यामुळे माथेरान शहरात दिवाळी हंगामाच्या सुरवातीला थंडी अवतरली असून येणाऱ्या पर्यटकांना या गुलाबी थंडीची आनंद घेता येणार आहे.

प्रसिद्ध पर्यटनस्थळ असलेल्या माथेरान शहरात गुलाबी थंडीची चाहूल जाणवू लागली आहे. पहाटेच्यावेळी सर्वत्र धुक्याची दुलई नजरेस पडत आहे. माथेरानमध्ये थंडी अवतरली असल्याने दिवाळी हंगामात येणाऱ्या पर्यटकांना माथेरानच्या गुलाबी थंडीचा आनंद लुटला येणार आहे.नवविवाहित जोडप्यांसाठी येथील आल्हाददायक निसर्ग आणि गुलाबी थंडी त्यांचे मन मोहित करून टाकणारे आहे. थंडी अवतरली असल्याने येथील व्यावसायिक देखील खुश झाले आहेत. माथेरानमधील गुलाबी थंडीचा अनुभव घेण्यासाठी पर्यटक दाखल होणार आहेत.

### जाहीर नोटीस

तमाम लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, माझे पक्षकारांनी खालील परिशिष्टात वर्णन केलेली जमीन मिळकत श्रीमती. रेवती भिमसेन साळोखे व इतर यांचे कडून विकत घेण्याचे ठरविले आहे.

**मिळकतीचे वर्णन**
**मौजे-सावरगाव, ता. कर्जत, जि. रायगड**

| सर्व्हे नं./ हिस्सा नं. | क्षेत्रफळ (हे.आर.पॉ.) | आकार (रू. पै.) |
|---|---|---|
| ६३/१०/२ | ०.४२.००<br>पो. ख. ०.०४.००<br>एकूण ०.४६.०० हे. आर. पॉ.<br>यापैकी दिलेले क्षेत्र ०.१९.०० हे. आर. पॉ. | ०.०० |

तरी सदर मिळकतीपैकी कोणत्याही व्यक्तीचा अथवा संस्थेचा गहाण, दान, बक्षीस, खरेदी, साठेकरार, कुळहक्क, वहिवाटीचा हक्क, ताबा, भाडेपट्टा पोटगी, मृत्यूपत्र, बोजा अथवा कोणत्याही प्रकारचा कायदेशीर हक्कसंबंध असल्यास, त्याच्या लेखी हरकती आणि त्याच्या हरकती नमुद केलेल्या हक्कांबाबत प्रथम दर्शनी योग्य त्या कागदोपत्री पुराव्यासह खाली सही करणार यांजकडे ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ (चौदा) दिवसांच्या मुदतीत प्रत्यक्ष अथवा रजिस्टर पोस्टाने पाठवाव्यात. याप्रमाणे मुदतीत हरकत न आल्यास सदर मिळकत निर्वेध, बोजारहित आहेत असे समजून आमचे अशील सदर मिळकतीचा खरेदीचा, विक्रीचा व्यवहार पुर्ण करतील व वरील मुदतीनंतर आलेली कोणतीही हरकत आमच्या अशिलांवर बंधनकारक राहणार नाही.

ठिकाण : कर्जत
दिनांक : २९/१०/२०२४

**ॲड. निता नरेश बैलमारे**
मो. ९२२६३३१५२६
ऑफीस : गाळा नं. १५, सनराईज अपार्टमेंट, कचेरी रोड, दत्त मंदिर जवळ, कर्जत, जि. रायगड-४१०२०१.

### जाहीर सुचना

तमाम जनतेस या जाहीर नोटीसद्वारे कळविण्यात येते की, मौजे तलवडे, ता. अलिबाग, जि. रायगड येथील खालील परिशिष्टात नमूद केलेल्या शेतजमिन मिळकतीमध्ये **श्रीमती सुशिला वसंत कवळे,** राहणार परहूर, ता. अलिबाग, **श्रीमती रश्मी रमाकांत वार्डे, राहणार सारळ, ता. अलिबाग, श्री. चिंतामण भाऊ पाटील, श्री. प्रमोद भाऊ पाटील, श्री. विनोद भाऊ पाटील, श्री. अशोक भाऊ पाटील,** राहणार मुनवली, पो. मापगाव,ता. अलिबाग, जि. रायगड, **श्रीमती वर्षा विष्णू राऊळ,** राहणार सातिर्जे, पो. मापगाव, **श्रीमती सारिका सचिन पाटील,** राहणार वेश्वी, ता. अलिबाग, यांचा एकत्रित ३/५ इतका अविभक्त हिस्सा असून, त्यांच्या एकत्रित ३/५ अविभक्त हिश्श्याची ०-२५-०० (हे.आर) जमिन मिळकत त्यांच्या निर्वेध मालकी हक्काची असून, सदर मिळकत, सदर मिळकतीच्या विद्यमान मालकांकडून, माझ्या अशिलांनी कायमस्वरुपी खरेदी करण्याचे मान्य व कबूल केले असून, त्या आशयाची बोलणी सदर मिळकतीचे विद्यमान मालक व माझे अशिला दरम्यान झाली आहेत. सदरील शेतजमिन मिळकत पूर्णतः निर्वेध व बिनजोखमी असल्याबाबतचा हवाला सदर मिळकतीच्या विद्यमान मालकांनी माझे अशिलांस दिला आहे.

खालील परिशिष्टामध्ये नमुद केलेल्या मिळकतीवरील **श्रीमती सुशिला वसंत कवळे, श्रीमती रश्मी रमाकांत वार्डे, श्री. चिंतामण भाऊ पाटील, श्री. प्रमोद भाऊ पाटील, श्री. विनोद भाऊ पाटील, श्री. अशोक भाऊ पाटील, श्रीमती वर्षा विष्णू राऊळ, श्रीमती सारिका सचिन पाटील,** यांच्या मालकी हक्काचा तपास करुन, मालकी हक्क निर्वेध असलेबाबतचा दाखला त्यांस देणेचा आहे. तरी ज्या व्यक्ती/संस्था यांचा परिशिष्टात नमूद मिळकतींमध्ये गहाण, दान, बक्षिस, फरोक्त, लिज, लियन, चार्ज, अन्नवस्त्र, पोटगी, करारपत्र, मृत्यूपत्र, वहिवाट वा अन्य कोणत्याही तऱ्हेचा हक्क हितसंबंध असल्यास ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १० (दहा) दिवसांचे आत त्यासंबंधी लेखी हरकती खालील पत्त्यावर कागदोपत्री पुराव्यानिशी पाठवाव्यात. सदरच्या मुदतीत कोणाचीही कसल्याही तऱ्हेची हरकत न आल्यास वर नमूद मिळकत निर्वेध आहे असे समजून तसा दाखला माझे अशिलांना देण्यात येईल व माझे अशिल त्यांचा सदर मिळकतीचा खरेदी व्यवहार पूर्ण करतील व मागाहून येणारी कोणतीही हरकत माझे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही, याची कृपया सर्वांनी नोंद घ्यावी. हे सर्वांस कळावे.

वर नमूद केलेल्या मिळकतीचे परिशिष्ट

| मौजे | भूमापन क्रमांक व उपविभाग | क्षेत्र (हे.आर) | आकार (रु.पैसे) |
|---|---|---|---|
| तलवडे, ता.अलिबाग. | २०४/१ | ०-०१-०० एकूण | ०-०२ |
| तलवडे, ता.अलिबाग. | २०४/२ | ०-४०-१०<br>०-०१-०० पो.ख.<br>०-४१-१० एकूण | ५-०८ |

सदर शेतजमिन मिळकतीमधील श्रीमती सुशिला वसंत कवळे, श्रीमती रश्मी रमाकांत वार्डे, श्री. चिंतामण भाऊ पाटील, श्री. प्रमोद भाऊ पाटील, श्री. विनोद भाऊ पाटील, श्री. अशोक भाऊ पाटील, श्रीमती वर्षा विष्णू राऊळ, श्रीमती सारिका सचिन पाटील, यांच्या एकत्रित ३/५ इतक्या अविभक्त हिश्श्याची सुमारे ०-२५-०० आर्स शेतजमिन मिळकत.

अलिबाग,
दिनांक : २८/१०/२०२४

सही/
**(ॲड. संजय म.भगत)**
हिराबाग सोसायटी, अे विंग, टिळक रोड, अलिबाग-रायगड.
खरेदीदारांचे वकील

# दहा फुटी अजगराला जीवदान



**पाली :** पालीतील धुंडीविनायक नगर येथील रस्ता क्रमांक ८ मधील सोहम गडगे यांच्या घराजवळ रविवारी (दि.२७) सकाळी साडेदहा वाजताच्या सुमारास एक दहा फुटी अजगर आला होता. त्या अजगराला येथील सर्पमित्र अमित निंबाळकर यांनी पकडले आणि सुधागड तालुका वनविभागाच्या मार्गदर्शनाखाली सुखरूप सुरक्षित अधिवासात सोडून दिले.

अजगर आल्याची माहिती येथील राहिवासी राहुल महाजन यांनी सर्पमित्रांना दिली. अजगराला पकडतांना सर्पमित्र अमित निंबाळकर यांना संदेश तेलंगे यांनी सहकार्य केले. घरात, घराजवळ किंवा मानवी वस्तीमध्ये साप आल्यास कोणीही घाबरून न जाता जवळच्या सर्पमित्राला बोलवावे, असे आवाहन सर्पमित्र अमित निंबाळकर यांनी केले.

### कोंकण रेल्वे कॉर्पोरेशन लिमिटेड
(भारत सरकारचा उपक्रम)
सादर सेवा
**निविदा सूचना**

कोंकण रेल्वे कॉर्पोरेशन लिमिटेड यांचे वतीने, प्रादेशिक सिग्नल आणि दूरसंचार अभियंता, रत्नागिरी यांचे द्वारे खालील कामांसाठी अनुभवी कंत्राटदारांकडून ई-निविदा मागविण्यात येत आहे :

**अ.क्र. : 1. निविदा सूचना क्र.: केआर-आरएन-एसजी-टी-05-2024-25, दि.: 29.10.2024**, "कोंकण रेल्वेच्या नातूवाडी बोगद्यावरील टीव्हीसीआर कनेक्टिव्हिटीचे काम कायमस्वरूपी पुनर्संचयित करणे". **बोली सादर करण्याची शेवटची तारीख आणि वेळ**: 19.11.2024 रोजी 15.00 वा. पर्यंत. **कामाचा अंदाजित खर्च**: रु. 5.77 लाख, जीएसटी वगळता. **ईरठे रक्कम**: रु. 11,600/-.

**अ.क्र. : 2. निविदा सूचना क्र. : केआर-आरएन-एसजी-टी-06-2024-25, दि. 29.10.2024**, "दोन वर्षांच्या कालावधीसाठी वरिष्ठ सिग्नल आणि दूरसंचार अभियंता माणगाव (एसएसटीई/माणगाव) सेक्शन (एक्स. रोहा ते उक्शी) अंतर्गत रत्नागिरी प्रदेशामध्ये विविध किरकोळ कामे, दुरुस्ती आणि देखभालीसाठी झोनल दर करार". **बोली सादर करण्याची अंतिम तारीख आणि वेळ**: 19.11.2024 रोजी 15.00 वा. पर्यंत. **कामाचा अंदाजित खर्च**: रु. 34.00 लाख, जीएसटी वगळता. **ईरठे रक्कम**: रु. 68,000/-.

**अ.क्र. : 3, निविदा सूचना क्र. : केआर-आरएन-एसजी-टी-07-2024-24, दि. : 29.10.2024**, दोन वर्षासाठी सहाय्यक सिग्नल आणि दूरसंचार अभियंता कणकवली (एएसटीई/कणकवली) सेक्शन (एक्स. उक्शी ते मडूरे) अंतर्गत रत्नागिरी प्रदेशामध्ये विविध किरकोळ कामे, दुरूस्ती आणि देखभालीसाठी झोनल दर ठेका. **बोली सादर करण्याची अंतिम तारीख आणि वेळ**: 19.11.2024 रोजी 15.00 वा. पर्यंत. **कामाचा अंदाजित खर्च**: रु. 34.00 लाख, जीएसटी वगळता. **ईरठे रक्कम**: रु. 68,000/-.

अधिक माहितीसाठी कृपया **www.ireps.gov.in** पहा

### जाहीर नोटीस

तमाम जनतेस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, आमचे अशिलांनी मौजे परहुर, ता. अलिबाग, जि. रायगड येथील खालील वर्णनाची भातशेती मिळकत, त्या मिळकतीचे विद्यमान मालक श्री. अनंत धोंडू शिंदे रा. तळवडे, पो. कामार्ले, ता. अलिबाग, जि. रायगड यांचेकडून कायम मालकी हक्काने विकत घेण्याचे ठरविले आहे. तसा साठेकरार ही स्वाक्षरीत झाला आहे.

**मिळकतीचे वर्णन**

| मौजे | गट नं. | क्षेत्र (हे.आर.) | आकार (रु.पै.) |
|---|---|---|---|
| परहुर | ९१ | ०-६२-६०<br>०-१३-००<br>०-७५-६०<br>पो. ख. ०-०६-८०<br>०-८२-४० | १६.७५ |

पैकी श्री. अनंत धोंडू शिंदे यांच्या मालकीची ० हे. १८.८० आर एवढी मिळकत व सदर मिळकतीमध्ये जाण्यायेण्याकरीता मौजे परहुर गट नं. ८८ क्षेत्र ० हे. ३९ आर आकार ८ रूपये २३ पैसे या मिळकती मधून ४ मीटर रूंद व सुमारे ० हे. ९ आर एवढ्या क्षेत्रफळाचा निरंतर वहिवाटीचा रस्त्याचा हक्क

सदर मिळकत व रस्त्याच्या वहिवाटीचा हक्क हा त्यांचे निर्वेध मालकी हक्काचा व प्रत्यक्ष ताबेकब्जा वहिवाटीतील असून तो विकणेचा त्यांस हक्क अधिकार असल्याबाबतचा निर्वाळा विद्यमान मालकांनी आमच्या अशिलांस दिलेला आहे. मात्र तरी देखील वर वर्णन केलेल्या मिळकतीवर अथवा तिचे कोणत्याही भागावर कुणाचाही विक्री, गहाण, भाडेपट्टा, विक्रीचा करार, दान, वारसाहक्क, लिज, लिएन, चार्ज, पोटगी, ताबा, वहिवाट, इजमेंटरी हक्क, या अथवा अन्य कोणत्याही प्रकारचा हक्क-हितसंबंध असल्यास अथवा कोणत्याही तऱ्हेने सदर मिळकतीचे विक्री व्यवहारास हरकत असल्यास त्यांनी त्यांच्या हरकती अगर तक्रारी ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ दिवसांचे आत खाली दिलेल्या आमचे पत्त्यावर कागदोपत्री पुराव्यांसहित लेखी स्वरूपात आणून द्याव्यात. मुदतीत कुणाचीही, कोणत्याही प्रकारची तक्रार अथवा हरकत न आल्यास सदरची मिळकत ही विद्यमान मालकांच्या निर्वेध व निजोखमी मालकी हक्कांची आहे व तिचेवर अन्य कुणाचाही कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध नाही अथवा तसा हक्क असूनही तो त्यांनी विद्यमान मालकांच्या तसेच आमच्या अशिलांच्या लाभांत सोडून दिला आहे, असे गृहित धरून आमचे अशिल व्यवहार पूर्ण करतील व मागाहून मुदतीनंतर आलेली कुणाचीही तक्रार अगर हरकत विचारात घेतली जाणार नाही, हे सर्वांस कळावे.

अलिबाग
तारीख : २९/१०/२०२४

**ॲड. माधवी नारायण ठाकूर**
सी-३०१, 'क्लिफ हेवन' को. ऑप. हा. सोसायटी, स्टेट बँक ऑफ इंडियाच्या बाजूला, कोर्ट रोड, अलिबाग, रायगड, ४०२ २०१.


# ऐश्वर्य ज्वेल कलेक्शन

*१ ग्रॅम सोन्याचे प्लेटींग दागिने-नविन डिझाइन्स*



मोत्याचे दागिने- तन्मणी, चींचपेटी, बांगड्या, बाजुबंद. गॅरंटीचे दागिने- मंगळसूत्र, बांगड्या, पाटल्या, हार, माळ. डायमंड- कुंदन- पोलकी-सेट- मॅचिंग बांगड्या- कानातले. सर्व नामांकित कंपन्यांची कॉस्मेटीक्स, परफ्यूम, डीओ. वाजवी भाव आणि भरपूर व्हरायटीसाठी प्रसिद्ध दुकान.

**२/१२ पी.एन.पी. नगर, अलिबाग.**
**मोबाईल : ९८६०६५८५६५**


दिनांक : २८/१०/२०२४

### जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, मौजे वायशेत, ता. अलिबाग, जि. रायगड येथील सर्व्हे नं. १/५/अ, क्षेत्र ०-१३-१० हे. आर., पो. ख. ०-०२-०० हे.आर, एकूण क्षेत्र ०-१५-१० हे. आर., आकार ३.६३ रू.पै. या भातशेती मिळकतीपैकी सुषमा नितीन पाटील यांचा असलेला अविभक्त हिस्सा तसेच गट ग्रामपंचायत थळ हद्दीतील मौजे वायशेत, मालमत्ता क्र. ४२६, क्षेत्र १०९.२० चौ. मीटर ही घर मिळकत, ही घर व भातशेती मिळकत, या मिळकतीचे विद्यमान मालक सुषमा नितीन पाटील रा. ०४, गणेश कृपा अपार्टमेंट, पाटीलवाडी, सावरकर नगर, ठाणे, जेकेग्राम ४००६०६ यांच्याकडून आमच्या अशिलांनी सर्व हक्कांसह विकत घेण्याच्या ठरविलेल्या आहेत. सदरहू मिळकती निर्वेध असल्याचा भरवसा मिळकतीचे विद्यमान मालक यांनी आमचे अशिल यांस दिला आहे. याउपरही सदरहू मिळकतीत कोणाचाही गहाण, दान, बक्षिस, फरोक्त, साठेकरार, कब्जा, बोजा, वहिवाटीचे हक्क, वारसाहक्क व हितसंबंध वा दुरान्वये देखील संबंध असल्यास अशा व्यक्तींनी आपल्या हरकती लेखी स्वरूपात कागदोपत्री पुराव्यासह खाली सही करणार खरेदीदार यांचे वकिल यांजकडे ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ दिवसांच्या मुदतीत सादर कराव्यात. मुदतीत कुणाचीही कोणत्याही प्रकारची हरकत न आल्यास मिळकत निर्वेध आहे, असे समजून आमचे अशिल खरेदीखताचा व्यवहार पूर्ण करतील. मागाहून कोणाचीही, कसलीही हरकत विचारात घेतली जाणार नाही याची नोंद घ्यावी.

अलिबाग,
तारीख : २८/१०/२०२४

**(ॲड. संजय द.म्हात्रे )**
पत्ता-श्रुती सारंग को.ऑप.हौ.सो.,ए विंग, रूम नं. ५, युनियन बँकेच्या समोर, ब्राम्हण आळी, अलिबाग, ता. अलिबाग जि. रायगड.

### जाहीर नोटीस

तमाम जनतेस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, आमचे अशिलांनी मौजे खानाव, ता.अलिबाग, जि.रायगड येथील खालील परिशिष्टात नमूद केलेल्या मिळकती, त्या मिळकतीचे विद्यमान मालकांकडून कायम मालकी हक्काने विकत घेण्याचे ठरविले आहे.

**परिशिष्ट**
**मौजे खानाव, ता.अलिबाग, जि.रायगड**

| विद्यमान मालकाचे नाव | स.नं/हि.नं | क्षेत्र हे.आर | आकार रू.पैसे |
|---|---|---|---|
| श्री.चेतन जगदीशचंद्र पटेल | २०/१ | ०-१९-५०<br>पो.ख.०-०४-८०<br>एकूण ०-२४-३० | ३.५० |
| श्री.चेतन जगदीशचंद्र पटेल | २२/२/ड | ०-३९-००<br>पो.ख.०-०२-७०<br>एकूण ०-४१-७० | ३.१२ |
| श्री.चेतन जगदीशचंद्र पटेल | २३/१/२ ३/४/ब | ०-३६-००<br>पो.ख ०-०१-००<br>एकूण ०-३७-०० | ३.७५ |
| श्री.चेतन जगदीशचंद्र पटेल | २३/१/२ ३/४/क | ०-४२-५०<br>पो.ख. ०-०१-५०<br>एकूण ०-४४-०० | ४.२५ |
| श्री.चेतन जगदीशचंद्र पटेल | २३/१/२ ३/४/ई | ०-३४-४०<br>पो.ख. ०-००-५०<br>एकूण ०-३४-९० | ३.६२ |
| श्री.चेतन जगदीशचंद्र पटेल | २३/६ | ०-१५-४०<br>पो.ख. ०-००-५०<br>एकूण ०-१५-९० | १.१९ |
| श्री.चेतन जगदीशचंद्र पटेल | २४/४/अ | ०-०२-००<br>पो.ख. ०-००-५०<br>एकूण ०-०२-५० | ०.१९ |
| श्री.चेतन जगदीशचंद्र पटेल | २४/४/ब | ०-०८-१०<br>पो.ख. ०-००-५०<br>एकूण ०-०८-६० | ०.५६ |
| शिल्पा प्रताप गंभीर | ४१/२ | ०-५६-००<br>०-०५-००<br>०-६१-००<br>पो.ख.०-०४-००<br>एकूण ०-६५-०० | ६.३७ |
| शिल्पा प्रताप गंभीर तनया प्रताप गंभीर | ४२/२ | ०-२५-१०<br>०-२५-००<br>०-५०-१०<br>पो.ख. ०-०५-५०<br>एकूण ०-५५-६० | ४.४४ |
| शिल्पा प्रताप गंभीर तनया प्रताप गंभीर | ४३/५ | ०-३१-००<br>पो.ख. ०-०७-००<br>एकूण ०-३८-०० | ७.७५ |

सदरच्या मिळकती या त्यांचे निर्वेध मालकी हक्कांच्या व प्रत्यक्ष ताबेकब्जा वहिवाटीतील असून त्याविकणेचा त्यांस हक्क अधिकार असल्याबाबतचा निर्वाळा विद्यमान मालकांनी आमच्या अशिलांस दिलेला आहे. मात्र तरी देखील वर वर्णन केलेल्या मिळकतीवर अथवा त्यांचे कोणत्याही भागावर कुणाचाही विक्री, गहाण, दान, भाडेपट्टा, विक्रीचा करार, वारसा हक्क, लिज, लिएन, चार्ज, पोटगी, ताबा, वहिवाट, इजमेंटरी हक्क, रस्त्याच्या वहिवाटीचा निरंतर हक्क अथवा अन्य कोणत्याही प्रकारचा हक्क-हितसंबंध असल्यास अथवा अन्य कोणत्याही तऱ्हेने सदर मिळकतींचे विक्री व्यवहारास हरकत असल्यास, त्यांनी त्यांच्या हरकती अगर तक्रारी ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ (चौदा) दिवसांचे खाली दिलेल्या आमचे पत्त्यावर कागदोपत्री पुराव्यांसहित लेखी स्वरूपात आणून द्याव्यात. मुदतीत कुणाचीही, कोणत्याही प्रकारची तक्रार अथवा हरकत न आल्यास सदरच्या मिळकती या विद्यमान मालकांच्या निर्वेध व निजोखमी मालकी हक्कांच्या आहेत व त्यांचेवर अन्य कुणाचाही कोणत्याही प्रकारचा हक्कहितसंबंध नाही अथवा तसा हक्क असूनही तो त्यांनी विद्यमान मालकांच्या तसेच आमच्या अशिलांच्या लाभांत सोडून दिला आहे, असे गृहित धरून आमचे अशिल व्यवहार पूर्ण करतील व मागाहून मुदतीनंतर आलेली कुणाचीही तक्रार अगर हरकत विचारात घेतली जाणार नाही, हे सर्वांस कळावे.

अलिबाग
तारीख : २९/१०/२०२४

सही/-
**ॲड. गणेश गोविंद पाटील**
अे/१,२, तळमजला, 'श्रुतीसारंग' को. ऑप. हा. सोसायटी, युनियन बँकेसमोर, ब्राह्मण आळी, अलिबाग, रायगड, ४०२ २०१.


## वाचकांसाठी निवेदन

कृषीवल वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची शहानिशा करुनच वाचकांनी संबंधितांशी व्यवहार करावेत. वर्तमानपत्रातून प्रसिद्ध जाहिरातीतील उत्पादने, सेवा किंवा त्यासंदर्भातील दावे यांची नागेश पब्लिशर्स प्रा. लि. कोणतीही हमी घेत नाही. त्या मजकुराच्या अथवा दाव्याच्या पूर्ततेसंदर्भातील कोणतीही जबाबदारी नागेश पब्लिशर्स प्रा.लि.चे मुद्रक, प्रकाशक, संपादक किंवा मालक यांच्यावर राहणार नाही, याची कृपया वाचकांनी नोंद घ्यावी.

-मुख्य संपादक


### MAHATRANSCO
Maharashtra State Electricity Transmission Co. Ltd.

## SRM E –TENDER NOTICE (THIRD CALL)

**MSETCL invites online bids (E-Tender) from reputed & registered Electrical contractors on Mahatransco Website https://srmetender.mahatransco.in for the following Tender specification.**

| Sr. No. | Tender/Notice No. | Particulars of Tender | Estimated Cost of Tender |
|---|---|---|---|
| 1. | **Tender No:-** EE/EHV (O&M)/DIVN/MHD/ Tech /Third Call/ Tender-33/ 2024-25 Dtd. 29.10.2024 RFX No.7000032472 | **Sub:-** Third Call for SRM E-Tender for repairing of 22 kV Current Transformer at 100 KV Roha Substation under EHV (O&M) Division Mahad. | Rs. 2,31,879/- (Including GST) |

EMD will be the 1% of the estimated cost or 5000/- whichever is the highest & tender fee will be the 500/- + GST.

Bid submission is from 29.10.2024 @ 00:00 hrs to 04.11.2024 @23:59Hrs for above tender For further details visit our website:- **https://srmetender.mahatransco.in.**

**Contact Person:-** The Addl.Executive Engineer, (O) : Phone No.7373101089

Note: All eligible Supplier / Contractors are mandated to get enrolled on SRM E-Tenders (New) portal of MSETCL

**-Sd/-**
**Executive Engineer (I/c) EHV(O&M) Dn. Mahad**

### PUBLIC NOTICE

Notice is hereby given to public at large that my client has agreed to Purchase Flat Property from below mentioned Flat Owner which is in their actual and physical possession at village-New Panvel East, Taluka-Panvel, Dist. Raigad. Description of Flat property.

| Flat Owner name | Description of Flat property. | Area |
|---|---|---|
| Mr. NEWTON JANA | FLAT NO. 201, on Second Floor "SHREE SAI GULMOHAR CO. OP. HSG SOCIETY LTD." Situated on Plot No.146, 147 & 148, Sector No.10, NEW PANVEL (E), TAL- PANVEL, DIST-RAIGAD | Built-Up area of 583 Sq.Feet (54.18 Sq. Mtrs.) AND Super Built-Up area of 832 Sq. Feet. |

Any person or persons, Company, Bank, Financial Institution claiming any interest, dispute over the aforesaid Flat Property or any part there of by the way of Sale, Transfer, Exchange, Lease, License, Lien, Tenancy, Gift, Trust, inheritance, Bequest, Mortgage, Possession or otherwise are hereby required to communicate, intimate the same with in 15 (Fifteen) days from the date hereof at my office address or otherwise the said sale will be completed and any reference as regard to any such purported claim or interest, which shall be deemed to have waived to all intense and purposes.

Date: 28/10/2024

Sing/
**ADV. PRATAP R. PATIL**
B.A. LL.B.
Off. Shop No. 1, Shree Ganesh Murari, Plot No. 35 & 131, Sector No.10, D.A.V. School Road, New Panvel (E)-410 206, Mob-9322027757

### जाहीर नोटीस

सर्व नागरिकांना या जाहीर नोटीसीद्वारे सुचित करण्यात येते की, आमचे अशिल यांनी खालील वर्णन केलेल्या जमीन मिळकतींचे विद्यमान मालक श्री. संजय काशिनाथ धुमाळ व इतर यांचेकडुन विकत घेण्याचे ठरविलेले आहे. त्या मिळकतीचे वर्णन पुढीलप्रमाणे,

**मौजे बार्णे, ता. कर्जत, जि. रायगड**

| सर्व्हे नं./हिस्सा नं. | क्षेत्रफळ हे. आर. पॉ. | आकार रु. पै. |
|---|---|---|
| ११/१/अ | ०-८१-६०<br>पो.ख. ०-०६-३०<br>एकुण ०-८७-९० | ८-३० |

सदरची जमीन मिळकत ही वरील मालकाच्या निर्वेध मालकी हक्काच्या व प्रत्यक्ष ताबेकब्जा वहिवाटीची असून ती विकत देण्याचा त्यांना हक्क अधिकार असल्याने त्यांनी सदरील मिळकत ही तदंगभूत हक्क हितसंबंधासह मला विकत देण्याचे ठरविले आहे. तरी वर वर्णन केलेली मिळकत संदर्भात इतर कोणाचाही गहाण, दान, बक्षिस, फरोक्त, साठेकरार, मृत्यूपत्रांकित दान, कुळवहिवाट, बोजा, वगैरे कोणतेही प्रकारचा हक्कहितसंबंध असल्यास त्यांनी ही जाहीर नोटीस प्रसिद्ध झालेपासून १४ दिवसांचे आत खाली सही करणार माझ्याकडे (खरेदीदार यांचेकडे) प्रथमदर्शनी पुराव्यासह लेखी हरकती नोंदवाव्यात. मात्र दिलेल्या मुदतीत कोणाचीही हरकत न आल्यास खरेदीखताचा व्यवहार पुर्ण करतील व मुदतीनंतर येणाऱ्या हरकती आमचेवर कोणत्याही प्रकारे बंधनकारक राहणार नाहीत याची सर्वांनी नोंद घ्यावी.

ठिकाण : कर्जत
दि. २९/१०/२०२४

अशिलातर्फे
**ॲड. धनश्री रघुनाथ ताम्हाणे**
मु. नेवाळी, ता. कर्जत, जि. रायगड
मोबा.नं.९५२७२५५४२०

दिनांक: २८/१०/२०२४

### जाहीर सावधान नोटीस

तमाम जनतेस या जाहीर नोटिसीद्वारे कळविण्यात येते की, माझ्या अशिलांनी खालील वर्णन केलेली मिळकत मौजे तलवडे, ता. अलिबाग, जि. रायगड येथील मिळकत त्या मिळकतीचे विद्यमान मालक/कब्जेदार श्री. अनंत लक्ष्मण सावंत रा. १९, सुदर्शन सीएचएस, समाज कल्याण केंद्र जवळ, इकलाबनगर, मुंबई, महाराष्ट्र ४०००६० यांच्या मालकी हक्कात व ताबेकब्जा असलेली खालील वर्णन मिळकत ही जमीन मिळकत आमच्या अशिलांना विकत देण्याचे ठरविले असून त्या आशयाचा दिनांक १२/०१/२०२४ रोजीचा साठेकरार विद्यमान मालकांनी आमच्या अशिलांना लिहून दिलेला आहे.

**मिळकतीचे वर्णन**

| मौजे | भूमापन क्र . व उपविभाग | क्षेत्र हे.आर. (आर.चौ.मी) | आकार (रू.पै.) | मिळकतीचे मालक |
|---|---|---|---|---|
| तलवडे, ता.अलिबाग | १८१ | क्षेत्र ०-४१-४०<br>पो.ख.०-००-००<br>एकूण क्षेत्र ०-४१-४० | ४.०३ | श्री. अनंत लक्ष्मण सावंत |

वर नमुद केलेली मिळकत आमचे अशिलांनी खरेदी करण्याचे ठरविले असून वर नमुद केलेल्या व्यक्तीने तसा साठेकरार आमचे अशिलांचे लाभात दिनांक १२/०१/२०२४ रोजी स्वाक्षरीत करून दिलेला आहे. सदर साठेकरारापोटी मोबदला म्हणून बयाणा रक्कम आमचे अशिलांनी धनादेशाद्वारे अदा केलेली आहे. व वरील बयाणा/मोबदला जमीन मालकांनी आमच्या अशिलांकडून स्विकारून सदर साठेकरार मान्य व कबुल केलेला आहे.

परंतु असे असूनही वर नमुद व्यक्ती आमचे अशिलांचे अपरोक्ष सदर मिळकत अन्य त्रयस्थ व्यक्तींना विक्री करण्याच्या प्रयत्नात असल्याची खात्रीशीर माहिती आमचे अशिलांस मिळालेली आहे.

तरी वर वर्णन केलेल्या मिळकतीबाबत कोणीही कोणत्याही प्रकारचा खरेदी विक्री व्यवहार व अन्य प्रकारचा कोणताही व्यवहार किंवा दस्त करू नये. त्यास आमच्या अशिलांची सक्त हरकत आहे. या उपरोक्तही आमचे अशिलांची हरकत डावलून बेकायदेशीर मार्गाचा अवलंब करून जर कोणी वर नमुद केलेल्या मिळकतीसंदर्भात विक्री/खरेदी अथवा तत्सम प्रकारचा व्यवहार केल्यास तो आमच्या अशिलांवर बंधनकारक राहणार नाही व त्याबाबत अलहिदा संबंधितांवर दिवाणी व फौजदारी स्वरूपाची कायदेशीर कोर्ट कारवाई करण्यात येईल. याची तमाम जनतेने नोंद घ्यावी.

कळावे.

अलिबाग,
तारीख : २८/१०/२०२४

**ॲड. सागर विजय पाटील**
पत्ता-मु. घर नं. १६०६, लालबाग, ब्राम्हण आळी, ता. अलिबाग, जि. रायगड
मो.नं. ९९२२५६७८९१

## निवडक

### रोहित शर्माचे कौतुक

**नवी दिल्ली :** बॉर्डर-गावसकर करंडक बहुप्रतिक्षित कसोटी मालिकेपूर्वी ऑस्ट्रेलियाच्या काही स्टार खेळाडूंनी त्यांच्या वर्ल्ड इलेव्हनमध्ये सलमीवीर म्हणून कोणाला घ्यायला आवडेल, यावर मत मांडले आहे. विशेष म्हणजे या जागेसाठी त्यांनी भारताच्या रोहित शर्माची निवड केली आहे. रोहितची निवड मार्नस लॅब्युशेन, स्टीव्ह स्मिथ, नॅथन लायन, जोश हेजलवूड, उस्मान ख्वाजा यांनी केली आहे. यावेळी त्यांनी रोहितच्या प्रतिभेचे तोंडभरून कौतुकही केले आहे.

### हर्षित राणाचे चोख उत्तर

**नवी दिल्ली :** भारतीय संघाला बॉर्डर-गावसकर करंडक स्पर्धा ही ५ सामन्यांची कसोटी मालिका खेळायची आहे. या बहुप्रतिक्षित मालिकेसाठी भारतीय संघात २२ वर्षीय हर्षित राणाचीही निवड झाली असल्याने आता त्याला कसोटी क्रिकेटमध्येही पदार्पणाची संधी मिळू शकते. दरम्यान, त्याच्याकडे प्रथम श्रेणीचा कमी अनुभव असल्याने त्याच्या निवडीवर अनेकांनी शंका घेतली होती. मात्र, नुकतेच रणजी ट्रॉफीमध्ये अष्टपैलू कामगिरी करत त्याने टीकाकारांना सध्यातरी चोख उत्तर दिले आहे.

### अग्नीचे दुसरे द्वीशतक

**नवी दिल्ली :** मिझोराम संघाकडून देशांतर्गत क्रिकेट खेळणारा अग्नी चोप्रा मागील काही वर्षांपासून सातत्यपूर्ण कामगिरी करून मैदान गाजवत आहे. मिझोराम संघाचा स्टार फलंदाज अग्नीने रणजी करंडक स्पर्धेच्या प्लेट लीगमध्ये सलग दुसरे द्विशतक झळकावले आहे. त्याने मणिपूर संघाविरुद्धच्या सामन्यात पहिल्या डावात २६९ चेंडूंत २९ चौकार व १ षटकाराच्या मदतीने २१८ धावांची खेळी केली आहे. या मोसमातील हे त्याचे तीन सामन्यांतील तिसरे शतक आहे.

### संघाला कलात्मकतेचा अभाव

**नवी दिल्ली :** रोहित शर्माच्या नेतृत्वात मैदानात उतरणाऱ्या भारतीय क्रिकेट संघावर न्यूझीलंडविरुद्ध कसोटी मालिका गमावण्याची आपत्ती ओढवली असून मायदेशातील आपल्या वर्चस्वाला सुरुंग लागला आहे. एक महत्त्वपूर्ण घटना या लाजिरवाण्या पराभवाला कारणीभूत ठरली आहे. भारतीय क्रिकेटपटूंच्या सरावात कलात्मकतेचा अभाव याप्रसंगी प्रकर्षाने दिसून आला. न्यूझीलंडच्या खेळाडूंना कशाप्रकारे सामोरे जायचे याबाबतचा सरावच भारतीय संघाकडून करण्यात आला नाही.

### रणजीत खेळणे गरजेचे

**पुणे :** विराट कोहली २०१२ मध्ये दिल्लीकडून शेवटचा रणजी सामना खेळला होता. २०२४ मध्ये दिल्लीच्या रणजी संघासाठीच्या संभाव्य खेळाडूंमध्ये त्याचे नाव होते, परंतु तो खेळला नाही. पण, आता त्याने पुन्हा देशांतर्गत क्रिकेटमध्ये खेळण्याची गरज व्यक्त केली जात आहे. न्यूझीलंडविरुद्धच्या कसोटी सामन्यात विराटचा स्पिनर्ससमोर संघर्ष सुरू आहे आणि तो अडखळत आहे. पुणे कसोटी पराभवामुळे भारताला १२ वर्षांनंतर घरच्या मैदानावर कसोटी मालिका गमवावी लागली आहे.

## एमर्जिंग टी-२० आशिया चषक २०२४

# अफगाणिस्तान संघाने रचला इतिहास

**। ओमान । वृत्तसंस्था ।**

एमर्जिंग टी-२० आशिया चषक २०२४ अफगाणिस्तान 'अ' संघाने जिंकत इतिहास रचला आहे. अफगाणिस्तानने स्पर्धेच्या इतिहासात प्रथमच चषक जिंकण्यात यश मिळवले आहे. अफगाणिस्तानने रविवारी (दि.२७) अंतिम सामन्यात श्रीलंका 'अ' संघाला ७ गडी राखत पराभूत केले आहे. अफगाणिस्तानने याआधी उपांत्य फेरीत भारताला पराभूत करत अंतिम सामन्यात प्रवेश केला होता. आता त्यांनी अंतिम सामन्यात श्रीलंकेला पराभूत करत आशिया चषकावर आपले नाव कोरले आहे.






- **स्पर्धेत प्रथमच चषक जिंकण्यात यश**
- **भारतानंतर श्रीलंकेलाही चारली धूळ**

श्रीलंकेच्या १३३ धावांच्या लक्ष्याचा पाठलाग करण्यासाठी उतरलेल्या अफगाणिस्तान संघाला पहिला धक्का पहिल्याच चेंडूवर बसला होता. झुबेद अकबरीला सहन अर्रचिगेने पहिल्याच चेंडूवर बाद केले होते. पण यानंतर सदिकल्ला अटल आणि कर्णधार दार्विश रसुली यांनी डाव सावरला. रसुली २० चेंडूत २४ धावा करून बाद झाला. परंतु, करिम जनतने अटलला तोलामोलाची साथ दिली. यामुळे अफगाणिस्तानसाठी विजयाचा मार्ग सुकर झाला. यातच १५ व्या षटकात करिम जनत २७ चेंडूत ३३ धावांवर बाद झाला. पण एक बाजू अटलने सांभाळलेली होती. त्याच्याबरोबर फलंदाजीला आलेल्या मोहम्मद इशाकने एक षटकार आणि एक चौकार मारून अफगाणिस्तानचा विजय सोपा केला. अखेर १९ व्या षटकात अफगाणिस्तानने विजय निश्चित केला. इशाक ६ चेंडूत १६ धावांवर नाबाद राहिला, तर अटल ५५ चेंडूत ५५ धावांवर नाबाद राहिला. श्रीलंकेकडून सहन अर्रचिगे, दुशन हेमंता आणि इशान मलिंगा यांनी प्रत्येकी १ बळी घेतला.

तत्पुर्वी, श्रीलंकेने नाणेफेक जिंकून प्रथम फलंदाजी करण्याचा निर्णय घेतला होता. परंतु, अफगाणिस्तानच्या बिलाल सामी आणि आल्ला घझनफर यांच्या गोलंदाजीपुढे श्रीलंकेची सुरुवात खराब झाली. त्यांनी पहिले ४ बळी अवघ्या १५ धावांवर गमावले होते. पण यानंतर पवन रथनायके आणि सहन अर्रचिगे यांनी डाव सावरत ५० धावांची भागीदारी केली. पण पवन २० धावांवर धावबाद झाला. यानंतर निमेश विमुक्तीने अर्रचिगेची चांगली साथ दिली. यामुळे श्रीलंकेने १०० धावांचा टप्पा पार केला होता. पण निमेशही १९ चेंडूत २३ धावांवर धावबाद झाला. याच षटकात आर मेंडिसही शुन्यावर बाद झाला. पण सहन अर्रचिगेने आक्रमक खेळत श्रीलंकेला समाधानकारक धावसंख्येपर्यंत पोहचवले. श्रीलंकेने २० षटकात ७ बाद १३३ धावा केल्या. सहन अर्रचिगे ४७ चेंडूत ६४ धावांवर नाबाद राहिला. दुशन हेमंता ६ धावांवर नाबाद राहिला.

# जवाहरलाल नेहरू स्टेडियमवर खेळाडूंच्या भविष्याशी खेळ

**। नवी दिल्ली । वृत्तसंस्था ।**

प्रसिद्ध गायक दिलजीत दोसांझ याचे कॉन्सर्ट दिल्लीच्या जवाहरलाल नेहरू स्टेडियमवर आयोजित करण्यात आले होते. दोन दिवसांच्या कॉन्सर्टनंतर भारतातील सर्वोत्तम क्रीडा सुविधा असलेल्या स्टेडियमची झालेली अवस्था खेळाडूंना पाहवत नव्हती. आता यावरून आयोजकावर टीका सुरू झाली आहे.

दोन दिवसांच्या या कॉन्सर्टला प्रती दिवस ३५ हजाराहून अधिक लोकांनी उपस्थिती लावली होती. पण, यानंतर स्टेडियमची साफसफाई करताना कर्मचाऱ्यांची दमछाक झालेली दिसत आहे. एका ग्राऊंड रिपोर्टमध्ये या मैदानावर सर्वत्र कचरा दिसत आहे, तर काही ठिकाणी दारूच्या बाटल्या दिसत आहेत, ट्रॅकवरही अन्न पडलेले दिसत आहे. ट्रॅकच्या पृष्ठभागाचे अनेक भाग द्रव आणि डागांमध्ये भिजलेले होते. या ठिकाणी खेळाडू प्रशिक्षण घेत असतात पण इथे लोकांनी दारू पीऊन पार्टी केली आहे. यासाठी रविवार पर्यंत स्टेडियम बंद ठेवण्यात आले होते.

या स्टेडीयमवरील ॲथलेटिक्स उपकरणे तोडल्याचा आरोप माजी युवा आशियाई सुवर्णपदक विजेता बेअंत सिंग यांनी सोशल मीडियावरून केले आहेत. तसचे, अडथळ्यांच्या शर्यतीसाठी वापरण्यात येणारी उपकरणे अडगळीत फेकली गेली आणि त्यापैकी काही तुटली असल्याचे एका खेळाडूने सांगितले आहे. त्या उपकरणांची काळजी न घेता एका खोलीत फेकून दिली होती.

याच मैदानावर १ नोव्हेंबरला पंजाब एफसीचा इंडियन सुपर लीगमधील सामना होणार आहे. परंतु, मैदानातही खड्डे झाल्याचे दिसले आहे. ही जी उपकरणे तुटली गेली आहेत. यातील काही उपकरणे खेळाडूंनी स्वतःच्या पैशांनी आणल्याचे बेअंत सिंग यांनी सांगितले आहे. या प्रकारावर अद्याप आयोजकांकडून कोणतीच प्रतिक्रिया देण्यात आलेली नाही.

# कुस्तीपटू चिरागचा भीम पराक्रम

## अजिंक्यपद स्पर्धेत सुवर्णपदकाला गवसणी

**। अल्बेनिया । वृत्तसंस्था ।**

भारताचा १८ वर्षीय कुस्तीपटू चिराग चिक्काराने भीम पराक्रम केला आहे. त्याने २३ वर्षांखालील जागतिक कुस्ती अजिंक्यपद स्पर्धेत सुवर्णपदकाला गवसणी घातली आहे. चिरागने मुलांच्या फ्री स्टाईल ५७ किलो वजनी गटात सुवर्णपदक जिंकण्याचा कारनामा केला आहे. अल्बेनियातील तिराना येथे झालेल्या या स्पर्धेत अंतिम सामन्यात चिरागने किर्गिस्तानच्या अब्दिमालिक काराचावचा ४-३ अशा फरकाने पराभव केला आहे.

चिरागने सुरुवातीपासूनच त्याचा चांगला खेळ केला होता. पहिल्या फेरीत त्याने जपानच्या गाटुको ओझावाला ६-१ अशा फरकाने पराभूत केले होते. त्याने उपांत्यपूर्व फेरीत अझरबैजानच्या लुनूस लावबातिरोवला १२-२ अशा फरकाने पराभवाचा धक्का दिला होता. त्याने उपांत्य फेरीत कझाकस्तानच्या ॲलन ओरालबेक याला पराभूत करत अंतिम फेरीत धडक मारली होती. विशेष म्हणजे चिराग १६ वर्षांखालील राष्ट्रीय अजिंक्यपद स्पर्धा खेळताना दुखापतग्रस्त झाला होता. त्याच्या गुडघ्याला झालेल्या दुखापतीमुळे त्याला जवळपास ३ वर्षे स्पर्धात्मक कुस्तीपासून दूर रहावे लागले होते. परंतु, त्याने २३ वर्षांखालील जागतिक कुस्ती अजिंक्यपद स्पर्धेत पुनरागमन करत थेट सुवर्णपदकाला गवसणी घातली.



### सुवर्णपदक जिंकणारा दुसराच पुरुष

चिराग हा जागतिक कुस्ती अजिंक्यपद स्पर्धेत सुवर्णपदक जिंकणारा भारताचा दुसराच पुरुष कुस्तीपटू ठरला आहे. यापूर्वी २३ वर्षांखालील जागतिक कुस्ती अजिंक्यपद स्पर्धेत सर्वात पहिल्यांदा सुवर्णपदक २०२२ साली अमन सेहरावतने जिंकले होते. त्याच्यानंतर आता चिरागनेही सुवर्णपदक जिंकले आहे. तथापि, भारताच्या रितिका हुडाने महिला गटात २३ वर्षांखालील जागतिक कुस्ती अजिंक्यपद स्पर्धेत २०२३ साली सुवर्णपदक जिंकण्याचा कारनामा केलेला आहे.

# मजगावचे मास्टर्स केरळमध्ये चमकले

**। कोर्लई । वार्ताहर ।**

केरळ येथे संपन्न झालेल्या मास्टर्स चषक २०२४ या राष्ट्रीय कराटे स्पर्धेत छत्रपती शिवाजी नूतन विद्यालयच्या विद्यार्थ्यांनी चमकदार कामगिरी करून दोन रौप्य व चार कांस्यपदके पटकावली आहेत. यात मजगावचे ध्रुव कळके, रेश्मा भोईर आणि काव्या या खेळाडूंचा समावेश आहे.




मास्टर्स चषक ही राष्ट्रीय कराटे स्पर्धा नुकत्याच केरळ राज्यात वायनाड जिल्ह्यातील सुलतान बत्तेरी येथे रविवारी (दि.२७) संपन्न झाली. यात महाराष्ट्रातील सात कराटेपटूंची निवड करण्यात आली होती. यावेळी महाराष्ट्राने चमकदार कामगिरी करत दोन सुवर्ण, दोन रौप्य आणि नऊ कांस्यपदके पटकावली आहेत. यात मुरूड तालुक्यातील मजगाव येथील छत्रपती शिवाजी नूतन विद्यालयात शिकणारे ध्रुव कळके, रेश्मा भोईर, काव्या नाक्ती यांचा देखील समावेश आहे.

या सर्व कराटेपटूंना आंतरराष्ट्रीय पंच क्योशी विजय चंद्रकांत तांबडकर यांच्या अध्यक्षतेखाली प्रशिक्षक रेन्शी अभिषेक गजानन तांबडकर व सेन्सई आकांक्षा विजय तांबडकर यांचे मार्गदर्शन लाभले आहे. त्यांच्या या यशानंतर शाळेचे मुख्याध्यापक, शिक्षक व शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी यांच्याकडून अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

# पाकिस्तानची धुरा रिझवानच्या खांद्यावर

**। लाहोर । वृत्तसंस्था ।**

पाकिस्तान क्रिकेट संघ पुढील महिन्यात ऑस्ट्रेलिया आणि झिम्बाब्वे दौऱ्यावर जाणार आहे. दोन्ही दौऱ्यामध्ये पाकिस्तान एकदिवसीय आणि टी-२० मालिका खेळणार आहेत. यासाठी रविवारी (दि.२७) पाकिस्तान क्रिकेट संघाच्या निवड समितीने संघनिवड केली आहे. दरम्यान, पाकिस्तानचे एकदिवसीय आणि टी-२० संघांचे नेतृत्व कोण करणार, हे स्पष्ट केले नव्हते. मात्र, रविवारी पाकिस्तान बोर्डाने याचे उत्तर दिले आहे. संघ निवड जाहीर केल्यानंतर साधारण ४ तासांनी पाकिस्तान बोर्डाने नव्या एकदिवसीय आणि टी-२० कर्णधाराची घोषणा केली आहे. पाकिस्तानने ही जबाबदारी स्टार खेळाडू मोहम्मद रिझवान याच्या खांद्यावर सोपवली आहे. यामुळे बाबर आझमनंतर आता पाकिस्तान संघाचे कर्णधारपद मोहम्मद रिझवान सांभाळताना दिसणार आहे. त्याच्यासाठी कर्णधार म्हणून पहिलाच दौरा ऑस्ट्रेलियाचा असणार आहे.



### ऑस्ट्रेलिया दौऱ्यासाठी पाकिस्तान संघ

**एकदिवसीय :** आमीर जमाल, अब्दुल्ला शफीक, अराफत मिन्हास, बाबर आझम, फैसल अक्रम, हॅरिस रौफ, हसीबुल्ला, कामरान गुलाम, मो. हसनैन, मो. रिझवान (कर्णधार), मो. इरफान खान, नसीम शाह, सईम आयुब, आगा सलमान, शाहीन शाह आफ्रिदी. **टी-२० :** अराफत मिन्हास, बाबर आझम, हॅरिस रौफ, हसीबुल्ला, जहांदद खान, मो. अब्बास आफ्रिदी, मो. रिझवान (कर्णधार), मु. इरफान खान, नसीम शाह, ओमेर बिन युसूफ, साहिबजादा फरहान, आगा सलमान, शाहीन शाह आफ्रिदी, सुफयान मोकीम, उस्मान खान.

# भारतीय महिलांची अपयशी झुंज

**। अहमदाबाद । वृत्तसंस्था ।**

न्यूझीलंड महिला संघाने भारतीय महिला संघाविरुद्ध रविवारी (दि.२७) झालेल्या दुसऱ्या एकदिवसीय सामन्यात ७६ धावांनी विजय मिळवला आहे. या विजयासह या मालिकेत न्यूझीलंडने १-१ अशी बरोबरी साधली आहे. पहिल्या सामन्यात भारताने मोठा विजय मिळवला होता. परंतु, दुसऱ्या सामन्यात न्यूझीलंडने पुनरागमन करत विजय मिळवला आहे. या सामन्यात न्यूझीलंडने भारतासमोर २६० धावांचे लक्ष्य ठेवले होते. या लक्ष्याचा पाठलाग करताना भारतीय महिला संघाला ४७.१ षटकात सर्वाबाद १८३ धावाच करता आल्या. यावेळी भारताच्या राधा यादवने तिच्या अष्टपैलू खेळाने सर्वांचे लक्ष वेधले होते. परंतु, तिची झुंज अपयशी ठरली.



न्यूझीलंडने दिलेल्या लक्षाचा पाठलाग करण्यासाठी भारताकडून सलामीला खेळण्यासाठी शफाली वर्मा आणि स्मृती मानधना उतरले होते. मात्र, पहिल्याच षटकात स्मृती मानधना शुन्यावर बाद झाली. त्यापाठोपाठ शफलीही ११ धावा करून बाद झाली, तर यास्तिकालाही ली ताहुहूने १२ धावांवर माघारी धाडले. यानंतर जेमिमा रोड्रिग्स आणि कर्णधार हरमनप्रीत कौर यांनी डाव सावरण्याचा प्रयत्न केला. परंतु, सोफी डिव्हाईनने या दोघींनाही बाद केले. हरमनप्रीतने २४ धावा केल्या, तर जेमिमाने १७ धावा केल्या. यानंतरही अष्टपैलू दीप्ती शर्मा आणि तेजल हसबनीस यांनी झुंज देण्याचा प्रयत्न केला, पण त्या देखील खेळपट्टीवर स्थिर झाल्यानंतर बाद झाल्या. दोघींनाही प्रत्येकी १५ धावाच करता आल्या.

यानंतर अरुंधती रेड्डीही २ धावांवर बाद झाली. शेवटी राधा यादवने अफलातून झुंज दिली. तिने सायमा ठाकोरसह ९ व्या बळीसाठी तब्बल ७० धावांची भागीदारी केली. परंतु, अखेर त्यांची ही भागीदारी ४४ व्या षटकात जेस केरने मोडली. तिने सायमाला २९ धावांवर बाद केले. तसेच, राधा यादवची झुंज ४८ व्या षटकात सोफी डिव्हाईनेच संपवली. राधाने ६४ चेंडूत ४८ धावांची खेळी केली. तिच्या बळीसह भारताचा डावही संपला.

# जयपूर, तमीळची बरोबरी

**। हैद्राबाद । वृत्तसंस्था ।**

प्रो कबड्डी लीगमध्ये रविवारी (दि.२७) जयपूर पिंक पँथर्स व तमीळ थलैवाज यांच्यात झालेला लढतीत ३०-३० अशी बरोबरी झाली. यावेळी जयपूर व तमीळ यांच्यामध्ये अटीतटीची लढाई रंगली होती. पूर्वार्धात जयपूर संघाकडे २१-१६ अशी आघाडी होती. उत्तरार्धात मात्र तमीळ संघाने झोकात पुनरागमन केले. तमीळ संघाने १४ गुणांची, तर जयपूर संघाने फक्त ९ गुणांची कमाई केली. जयपूरकडून अर्जुन देशवालने ७ गुणांची, तर विकास कंडोलाने ६ गुणांची कमाई केली. तमीळ संघासाठी सचिनने उल्लेखनीय कामगिरी केली.

## राज्य अजिंक्यपद, निवड चाचणी खो-खो स्पर्धा

# सोलापूर, रत्नागिरीची विजयी सलामी

**। धाराशिव । प्रतिनिधी ।**

महाराष्ट्र खो-खो असोसिएशन व उस्मानाबाद जिल्हा खो-खो असोसिएशनच्या संयुक्त विद्यमाने ही स्पर्धा ३० ऑक्टोबरपर्यंत जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्थेच्या मैदानावर आयोजित करण्यात आली आहे. रविवारी (दि.२७) सुरू झालेल्या या स्पर्धेत सलामीच्या दिवशी सर्व सामने एकतर्फी झाले. या खो-खो स्पर्धेत सोलापूर, रत्नागिरी व नाशिक या संघाच्या मुलं व मुलींच्या संघाने सुवर्ण महोत्सवी कुमार व कुमारी राज्य अजिंक्यपद व निवड चाचणी स्पर्धेत विजयी सलामी दिली आहे.



सोलापूरच्या मुलांनी जालन्यावर २१-८ तर मुलींनी बीडवर १७-५ असा एक डाव राखून दणदणीत विजय मिळविला आहे. रत्नागिरीच्या मुलांनी लातूरचा १७-७ व मुलींनी नांदेडचा १९-६ असा एक डावाने धुव्वा उडवला. तर, नाशिकच्या मुलांनी हिंगोलीला २६-४ तर मुलींनी नंदुरबारला २०-४ असे एका डावाने नमवले आहे. मुलींच्या गटात धाराशिव, जालना व मुलांच्या गटात सांगली, बीड यांनीही प्रतिस्पर्धी संघावर शानदार विजय मिळविला.

### अन्य निकाल :

- **कुमार गट : अहिल्यानगर विरुद्ध नांदेड २२-८**
- **बीड विरुद्ध परभणी १२-११**
- **सांगली विरुद्ध जळगाव २२-८**
- **कुमारी गट : जालना विरुद्ध हिंगोली १२-२**
- **धाराशिव विरुद्ध परभणी १२-६**
- **पालघर विरुद्ध जळगाव १२-५**

### चमकलेले खेळाडू

**कुमार गट :** मच्छिंद्र वाघमारे (अहिल्यानगर, ३.१० मिनिटे संरक्षण व ६ गुण), आशिष बालाडे (रत्नागिरी, ६ व ३ मिनिटे नाबाद), अभिषेक हिवाळे (बीड, ३.५० मिनिटे व २ गुण), प्रेम दळवी (सांगली, १ मिनिटे नाबाद व ८ गुण), सोलापूर (कृष्णा बनसोडे २.३५ मिनिटे व ३ गुण), शुभम चव्हाण, ३ मिनिटे नाबाद व २ गुण). **कुमारी गट :** समृद्धी सुरवसे (सोलापूर, ४.२० मिनिटे), अनुष्का पवार (५ गुण), मृण्मयी नागवेकर (रत्नागिरी, ४.२० मिनिटे), युवा पालवे (५ गुण), तेजल सहारे (नाशिक, ५.१० मिनिटे व ५ गुण), अश्विनी शिंदे (धाराशिव, ३ मिनिटे व ४ गुण), प्रणाली काळे (१.३० नाबाद, ३.३० मिनिटे व २ गुण).

# आता भारताचे मिशन 'मुंबई'

**। मुंबई । प्रतिनिधी ।**

बंगळूर कसोटीत न्युझीलंड विरूद्धच्या कसोटी सामन्यात पहिल्या दिवशी वेगवान गोलंदाजांना साथ देणाऱ्या खेळपट्टीवर भारतीय फलंदाज ढेपाळले होते. यानंतर पुण्यातील फिरकी गोलंदाजांना पोषक असलेल्या खेळपट्टीवर मिचेल सँटनरच्या प्रभावी गोलंदाजीपुढे पुन्हा एकदा भारतीय फलंदाजांकडून निराशा झाली. आता मुंबईत १ नोव्हेंबरपासून तिसरा कसोटी सामना रंगणार आहे. या कसोटीतील खेळपट्टीकडे लक्ष असणार आहे.



कसोटी मालिका गमावण्याची आपत्ती भारतीय संघावर कोसळली आहे. आता मायदेशात व्हाईटवॉशची नामुष्की ओढवण्याचे संकट रोहित शर्माच्या ब्रिगेडवर घोंघावत आहे. यामधून भारतीय संघ बाहेर येतो का, याचे उत्तर आगामी काळात मिळेल. मुंबईतील वानखेडे स्टेडियमची खेळपट्टी ही नेहमी फलंदाजी व गोलंदाजी अशी दोन्हीला मदत करणारी म्हणून ओळखली जाते. या स्टेडियमच्या खेळपट्टीवर लाल मातीचा थर असतो. येथे चेंडूला उसळी मिळते. तसेच, चेंडूला फिरकही मिळते. शिवाय, वानखेडे स्टेडियमच्या आऊटफिल्डवर चेंडू वेगवान जात असल्यामुळे फलंदाजांना धावाही करण्यास मदत होते. तसेच, धावांचा पाऊसही येथे पडतो.

कृषीवल हे पत्र नागेश पब्लिशर्स प्रा. लि.साठी मुद्रक, प्रकाशक **सौ. चित्रलेखा पाटील** यांनी नागेश पब्लिशर्स, वेश्वी, अलिबाग, जि. रायगड ४०२ २०९ येथे छापून येथेच प्रसिद्ध केले. आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७ I MH-MR-RGD-RNP/16/2022-23 (31-12-2025)
दूरध्वनी : ०२१४१-२२२२९०/२२२७६१, संपादकीय विभाग-email : krushivalnews@gmail.com / जाहिरात विभाग- email : raigadkrushival@gmail.com मुंबई कार्यालय : ए-५ आयओनिक १८, आॅर्थर बंदर रोड, कुलाबा, मुंबई ४०० ००५. दूरध्वनी : ०२२-२२८८४५३८.
■ **संस्थापक-संपादक : स्व. प्रभाकर पाटील** ■ **सल्लागार संचालक : सौ. सुप्रिया पाटील** ■ **व्यवस्थापकीय संचालक : सौ. चित्रलेखा पाटील** ■ **कार्यकारी संपादक : माधवी माणिक सावंत*** ■ **सल्लागार संपादक : प्रसाद वासुदेव केरकर**
(* या पत्रातील मजकुराच्या निवडीसाठी पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे.)